

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# वार्षिक अहवाल
# २०१३ - २०१४

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## वार्षिक अहवाल
## २०१३-१४

# अनुक्रमणिका


अध्यक्षांचे मनोगत ........ ०१

आयोगाची स्थापना व कार्ये ........ ०२

आयोगाचा संरचनात्मक तक्ता ........ ०३

- आयोगाच्या आस्थापनेवरील कर्मचारी ........ ०३
- सल्लागार ........ ०३

राज्य सल्लागार समिती (एस ए सी) ........ ०४

महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्रातील परिस्थिती ........ ०६

महत्वाचे प्रश्न ........ १०

- नूतनशील ऊर्जेच्या वाढीस चालना देणे ........ १०
- वीज मागणी व्यवस्थापन ........ १०
- पारेषण नियोजन ........ १२
- स्मार्ट ग्रिड समन्वय समिती ........ १४
- मंजूर केलेले परवाने ........ १४

वीज दराचे व अन्य निवडक आदेश ........ १६

- वार्षिक महसूली गरज, वीज दराचे निश्चितीकरण आणि अचूक समायोजन ........ १६
- नूतनशील ऊर्जा ........ २५
- वीज खरेदी करार ........ २६
- पारेषण ........ २७
- अन्य निवडक आदेश ........ २८

ग्राहक आधार कक्ष आणि ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणा ........ ३२

विद्युत क्षेत्रात क्षमता वृध्दीसाठी पुढाकार ........ ३६

वार्षिक लेखे – एक दृष्टीक्षेप ........ ३७

**परिशिष्टे**

- परिशिष्ट १– सन २०१३–१४ मध्ये आयोगाने पारित केलेले आदेश ........ ३९
- परिशिष्ट २– दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता आय–व्यय पत्रक ........ ६१

# अध्यक्षांचे मनोगत

आयोगाने या वर्षात केलेल्या सर्व प्रयत्नांचा एकमेव उद्देश, मुंबईतील वितरण व्यवसायात स्पर्धा सुरु करीत असताना, स्वस्त विजेच्या तरतुदीचा लाभ, सामान्य वर्गवारीला विशेषत: विजेचा कमी वापर असणाऱ्या ग्राहकांना, होईल याची काळजी घेणे, हाच होता. तसेच, टाटा पॉवर वितरण कंपनीच्या कमी वीज दराचा लाभ न्यूनतम ग्राहकांच्या वर्गवारीस मिळावा म्हणन, आयोगाच्या निर्देशांनुसार, टाटा पॉवर वितरण कंपनीने त्यांच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील ११ समुहांमध्ये वितरण जाळे उभारण्याच्या कामात केलेल्या प्रगतीचा, आयोगाने स्वत: पुढाकार घेऊन, आढावा घेतला.

आयोगास या वर्षात ज्या नवीन प्रश्नांना सामोरे जावे लागले त्यात खनिज इंधनाच्या विशेषत: देशांतर्गत कोळशाच्या पुरवठ्यात निर्माण झालेली तीव्र टंचाई, हा एक होता, त्यामुळे महागडा आयात कोळसा घेण्याची गरज भासू लागली. कोल इंडिया लि. आणि तिच्या उप-कंपन्यांकडून होणाऱ्या देशांतर्गत कोळशाच्या पुरवठ्यातील तुटवड्यामुळे, महानिर्मिती कंपनी, केंद्रीय वीज निर्मिती केंद्रे आणि राज्यातील अन्य खाजगी वीज निर्मात्यांच्या विद्युत निर्मिती संचांसाठी लागणाऱ्या महागड्या आयात कोळशाच्या मागणीत वाढ झाली. इंधनाच्या पुरवठ्यातील तूट आणि त्यामुळे वीज खरेदीच्या खर्चावर होणाऱ्या परिणामाच्या प्रश्नावर राष्ट्रीय स्तरावर चर्चा होण्याची गरज आहे. केंद्रीय विद्युत मंत्रालयाच्या दिनांक ३१ जुलै, २०१३ च्या पत्राने या दिशेने पहिले पाऊल टाकण्यात आले असल्याचे दिसते. या संदर्भात, नजिकच्या काळात आणखी बरेच काही करण्याची गरज आहे ज्यामुळे महाराष्ट्रातील ग्राहकांना सातत्याने, भरवशाचा व परवडेल अशा दराने विजेचा पुरवठा होण्याची खात्री मिळेल.

शहरीकरणामध्ये वेगाने वाढ होत असल्याने आणि नूतनशील ऊर्जा निर्मिती वाढविण्यावर भर देण्यात येत असल्याने, वातावरण-पुरक तंत्रज्ञानावर आधारित नगरपालिकेच्या घन कचऱ्यातून वीज निर्मिती करण्याऱ्या प्रकल्पांच्या विकासाला चालना देण्याचे आयोगाने ठरविले आहे.

राज्यातील सर्व ग्राहकांनी ठराविक कालावधीत मीटर बसवून घेण्याबाबत आयोग आग्रही आहे.

आयोगाने प्रथमच महाराष्ट्र राज्यातील विद्युत कंपन्यांकरिता बहु-वर्षीय वीज दराचे आदेश पारित केले आहेत ज्यामध्ये विजेचे दर तीन वर्षांच्या कालावधीसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

आयोगाने २०१३-१४ या आर्थिक वर्षात एकूण १७९ आदेश पारित केले आहेत.

महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी आयोग, विद्युत अधिनियम, २००३ ने आयोगावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास आणि त्यात उल्लेखलेल्या सुधारणा घडवून आणण्यास कटिबध्द आहे.

**चंद्रा अय्यंगार**

# आयोगाची स्थापना व कार्ये

विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ च्या अंतर्गत महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ ऑगस्ट, १९९९ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची स्थापना केली असून आयोगात अध्यक्ष व दोन सदस्य आहेत. आयोगाकडे (एक) अर्ध-न्यायिक, (दोन) अर्ध-वैधानिक आणि (तीन) कार्यकारी स्वरुपाची कामे सोपविण्यात आली आहेत. सदर अधिनियमांतर्गत आयोगाकडे खालील कार्ये सुरुवातीला सोपविण्यात आली होती:-

अ) राज्यांतील घाऊक, ठोक, ग्रिड किंवा किरकोळ विक्रीचे विजेचे दर, जसे असेल तसे, निश्चित करणे.

ब) पारेषण सुविधेचा वापर करण्यासाठी, पारेषण दर निश्चित करणे.

क) राज्यातील विजेचे पारेषण, विक्री, वितरण आणि पुरवठा करण्यासाठी निर्मिती कंपन्या, किंवा अन्य स्त्रोतांकडून ज्या किंमतीने वीज प्राप्त करुन घेण्यात येईल त्या किंमतीसह पारेषण कंपन्या आणि वितरण कंपन्यांच्या विजेची खरेदी किंवा वीज प्राप्त करुन घ्यावयाच्या प्रक्रियेचे नियमन करणे.

ड) या अधिनियमाची उद्दिष्टे व हेतू साध्य करण्यासाठी, वीज उद्योगांत स्पर्धा, कार्यक्षमता व काटकसरीस चालना देणे.

सन २००३ मध्ये, विद्युत अधिनियम, २००३ दि. १० जून, २००३ रोजी अंमलात आल्यानंतर विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ रद्द झाला व आयोगाकडे खालील अतिरिक्त कार्ये सोपविण्यात आली:-

अ) विजेचे राज्यांतर्गत पारेषण व वहन सुकर करणे.

ब) विजेचे पारेषण, वितरण आणि विजेचा व्यापार करण्यासाठी परवाना देणे.

क) नूतनशील उर्जा स्त्रोतांपासून सह-निर्मितीस आणि वीज निर्मितीस चालना देणे.

ड) परवानेधारक आणि वीज निर्मिती कंपन्या यांच्यामधील आणि परवानाधारकांमधील आप-आपसातील वादासंबंधी अभिनिर्णय देणे आणि कोणताही वाद लवादाकडे संदर्भ करणे.

इ) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता शुल्क लावणे.

फ) राज्य ग्रिड संहिता विनिर्दिष्ट करणे.

ग) परवानाधारकांच्या सेवेची गुणवत्ता, सातत्त्य व विश्वासार्हता यांची मानके विनिर्दिष्ट करणे किंवा अंमलात आणणे.

ह) राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी, आवश्यक वाटल्यास, नफ्याचे प्रमाण निश्चित करणे.

ज) या अधिनियमाखाली सोपविण्यात येणारी अन्य कार्ये पार पाडणे.

य) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(२) अंतर्गत राज्य शासनास सल्ला देणे.

# आयोगाचा संरचनात्मक तक्ता

## आयोगाच्या आस्थापनेवरील कर्मचारी

महाराष्ट्र शासनाने विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ अंतर्गत आयोगावर सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी आयोगाच्या आस्थापनेवर सुरुवातीला जून, २००० मध्ये २४ पदे मंजूर केली. त्यानंतर, मार्च, २०१० मध्ये आयोगावर विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत सोपविण्यात आलेल्या व्यापक कार्यांतून निर्माण झालेली वाढीव कामे पार पाडण्यासाठी शासनाने आयोगास अतिरिक्त ३९ पदे मंजूर केली. या मंजूर पदांपैकी भरलेली पदे व रिक्त पदे यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**कर्मचाऱ्यांची माहिती**

| अनु क्र. | पदाचे नांव | मंजूर पदांची संख्या | भरलेली पदे | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | | नामनिर्देशाने | प्रतिनियुक्तीने | |
| १. | सचिव | १ | - | १ | - |
| २. | कार्यकारी संचालक | १ | - | - | १ |
| ३. | संचालक (विद्युत अभियांत्रिकी) | २ | १ | - | १ |
| ४. | संचालक (वीज दर) | २ | १ | - | १ |
| ५. | संचालक (विधी) | १ | - | - | १ |
| ६. | संचालक (प्रशासन व वित्त) | १ | - | - | १ |
| ७. | उप संचालक (तांत्रिक) | ८ | ७ | १ | - |
| ८. | उप संचालक (विधी) | ४ | ३ | - | १ |
| ९. | उप संचालक (प्रशासन व वित्त) | ४ | २ | १ | १ |
| १०. | अवर सचिव | १ | - | - | १ |
| ११. | सहाय्यक संचालक | ४ | ३ | - | १ |
| १२. | कक्ष अधिकारी | २ | २ | - | - |
| १३. | संगणक प्रणाली प्रशासक | १ | १ | - | - |
| १४. | डेटाबेस/वेब प्रशासक | १ | १ | - | - |
| १५. | सहाय्यक लेखा अधिकारी | १ | - | १ | - |
| १६. | स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी) | ३ | ३ | - | - |
| १७. | स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी) | २ | १ | - | १ |
| १८. | उच्च श्रेणी लघुटंलेखक (इंग्रजी) | १ | - | - | १ |
| १९. | उच्च श्रेणी लघुटंलेखक (मराठी) | १ | - | - | १ |
| २०. | स्वागतकार-नि-दूरध्वनी चालक-नि-कार्यालय सहाय्यक | १ | १ | - | - |
| २१. | लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यक | ७ | ४ | - | ३ |
| २२. | ग्रंथपाल-नि-कार्यालयीन सहाय्यक | १ | १ | - | - |
| २३. | वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक | ५ | ४ | - | १ |
| २४. | शिपाई | ८ | ३ | - | ५ |
| | एकूण | ६३ | ३८ | ०४ | २१ |

## सल्लागार

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ९१(४) अंतर्गत, आयोग आपली कर्तव्ये पार पाडण्यात त्यास मदत करण्यासाठी कुशल सल्लागारांची नियुक्ती, विहित करण्यात येतील त्या अटी व शर्तींवर, करु शकतो. आयोगाने मविनिआ (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ अधिसूचित केले आहेत. या विनियमातील तरतुदींनुसार, आयोग, आवश्यक असेल तेव्हा, विविध तांत्रिक, वित्तीय, कायदेविषयक व प्रशासकीय स्वरुपाची कार्ये पार पाडताना त्यास मदत करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करतो.

# राज्य सल्लागार समिती (एस ए सी)

राज्य सल्लागार समितीची स्थापना आयोगाकडून विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८७ अंतर्गत करण्यात आली आहे. राज्य सल्लागार समिती स्थापण्यामागचे उद्देश (एक) महत्त्वाच्या धोरणात्मक प्रश्नांवर; (दोन) परवानाधारकांच्या सेवेचा दर्जा, सातत्य आणि व्याप्तीशी संबंधित बाबींबाबत; (तीन) परवानाधारकांनी त्यांच्या परवान्याच्या अटी व आवश्यकतांचे पालन करण्याबाबत; (चार) ग्राहक हिताचे रक्षण करण्याबाबत आणि (पाच) विद्युत कंपन्यांच्या ऊर्जा पुरवठा आणि त्यांच्या एकूण कामगिरीच्या दर्जाबाबत, आयोगास सल्ला देणे, हे आहेत. राज्य सल्लागार समिती (एस ए सी) दर दोन वर्षांनी पुनर्गठित करण्यात येते. आयोगाचे अध्यक्ष हे राज्य सल्लागार समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतात व आयोगाचे सदस्य हे या समितीचे पदसिध्द सदस्य असतात. आयोगाचे सचिव हे राज्य सल्लागार समितीचे सदस्य-सचिव आहेत.

राज्य सल्लागार समितीची पुनर्घठना खालील सदस्यांसह २२-०८-२०१२ रोजी करण्यात आली:-

१. अध्यक्ष, मविनिआ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पदसिध्द अध्यक्ष

२. सदस्य, मविनिआ (एक) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पदसिध्द सदस्य

३. सदस्य, मविनिआ (दोन) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पदसिध्द सदस्य

४. सचिव, मविनिआ . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पदसिध्द सदस्य-सचिव

५. सचिव, . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पदसिध्द सदस्य
अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

६. सचिव (ऊर्जा), . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . पदसिध्द सदस्य
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

७. सह सचिव, . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य
अ-पारंपरिक व नूतनशील ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

८. परिमंडल व्यवस्थापक (पश्चिम परिमंडल), . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य
ग्रामीण विद्युतिकरण महामंडळ मर्यादित, मुंबई

९. महाव्यवस्थापक / मुख्य अभियंता (विद्युत), . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य
मध्य रेल्वे, मुंबई

१०. सदस्य, (उर्जा ग्रुप) प्रयास, पुणे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

११. अध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत, मुंबई . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

१२. अध्यक्ष, ठाणे-बेलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन, नवी मुंबई, . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

१३. अध्यक्ष, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, नागपूर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

१४. संचालक, आय आय टी, (विद्युत अभियांत्रिकी विभाग) मुंबई . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

१५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक शेतकरी सभा, जिल्हा-कोल्हापूर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

१६. अध्यक्ष/निमंत्रक (ऊर्जा मंच), इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), पुणे स्थानिक केंद्र, पुणे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

१७. अध्यक्ष, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲन्ड ॲग्रिकल्चर, पुणे . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

१८. संचालक, निंबकर ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्युट, फलटण . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . सदस्य

राज्य सल्लागार समितीच्या बैठका सर्वसाधारणपणे दर तीन महिन्यातून एकदा घेण्यात येतात. आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये २८ जून, २०१३ रोजी एक बैठक घेण्यात आली होती. आयोगाच्या अध्यक्षांचे पद रिक्त असल्यामुळे अन्य कोणत्याही बैठका घेता आल्या नाहीत.

राज्य सल्लागार समितीच्या बैठकीत खालील प्रश्नांवर चर्चा करण्यात आली–

## १. पारेषण नियोजन पध्दती

सदर बैठकीत विजेचे पारेषण, अल्प-कालीन वीज खरेदीतील कल, पारेषण नियोजनाची पध्दत, या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. श्री. राघव उपाध्या, आयपीपीएआय, यांनी "विजेचे पारेषण" या विषयावर एक सादरीकरण केले.

## २. भारतासाठी स्मार्ट ग्रिडकरिता कालबध्द कार्यक्रम

श्री. प्रफुल्ल वऱ्हाडे, संचालक (विद्युत अभियांत्रिकी), यांनी एक सादरीकरण केले. महापारेषणच्या प्रतिनिधीने महापारेषणने पारेषणासाठी तयार केलेल्या स्मार्ट ग्रिडकरिता कालबध्द कार्यक्रमाची माहिती दिली. अशा कार्यक्रमामध्ये वितरणावर भर देण्यात आला असला तरी पारेषण व निर्मितीवर देखील भर देणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्रातील परिस्थिती

## वीज निर्मिती

राज्याची विजेची गरज महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, खाजगी वीज निर्मिती कंपन्या, स्वतंत्र वीज निर्माते (आयपीपी), केंद्रीय क्षेत्राकडून मिळणारा वाटा आणि नूतनशील ऊर्जा निर्माते यांच्याकडून भागविण्यात येते. राज्याची ऊर्जेची गरज आर्थिक वर्ष २०१३-१४ करिता १२६५५१ दशलक्ष युनिट्स इतकी होती व त्यापैकी ३६ टक्के महानिर्मिती कंपनी, १९ टक्के स्वतंत्र वीज निर्माते, ३ टक्के नूतनशील ऊर्जा निर्माते यांच्याकडून आणि ३० टक्के केंद्रीय क्षेत्राच्या वाट्यामधून भागविण्यात आली. राज्याची एकूण स्थापित क्षमता १७,८२५ मेगावॉट्स (३१-०३-२०१४ रोजी) होती ज्यामध्ये महानिर्मिती कंपनीचा सुमारे ६० टक्के इतका वाटा मोठा म्हणजे १०,७३७ मेगावॉट्स होता. यामध्ये औष्णिक निर्मिती क्षमता ७,४८० मेगावॉट्स, जल-निर्मिती क्षमता २५८५ मेगावॉट्स, वायु-निर्मिती क्षमता ६७२ मेगावॉट्स (३१-०३-२०१४ रोजी) समाविष्ट होती. महानिर्मिती कंपनीची निर्मिती केंद्रे राज्यभर पसरली असून त्यामध्ये चंद्रपूर, कोराडी, पारस, परळी, भूसावळ, खापरखेडा, आणि नाशिक या औष्णिक केंद्रांचा, उरण येथील वायुवर आधारित प्रकल्पाचा आणि कोयना, वैतरणा, भिमा, घाटघर (पंप स्टोअरेज) या जल-विद्युत प्रकल्पांचा समावेश होतो. महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीबरोबर (महावितरण) दीर्घ-कालीन वीज खरेदी करार केला आहे.

महानिर्मिती आणि महावितरण कंपनीमध्ये झालेल्या विद्यमान वीज खरेदी करारात खालील निर्मिती संचांची भर पडली आहे:-

| महानिर्मिती प्रकल्प | क्षमता (मेगावॉट) |
|---|---|
| पारस औष्णिक वीज निर्मिती केंद्र (संच-५) | २५०×१=२५० |
| दोंडाइचा विद्युत प्रकल्प ( संच- १,२,३,४,५) | ६६०×५ =३३०० |

**महानिर्मिती कंपनीची निर्मिती क्षमतेत ३७५० मेगावॉट क्षमतेची प्रस्तावित भर**

| केंद्राचे नांव | आर्थिक वर्ष २०१३-१४ | आर्थिक वर्ष २०१४-१५ | आर्थिक वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|
| भुसावळ संच क्र. ५ | ५०० मेगावॉट | | |
| चंद्रपूर संच क्र. ८ | ५०० मेगावॉट | | |
| चंद्रपूर संच क्र. ९ | | ५०० मेगावॉट | |
| परळी संच क्र. ८ | २५० मेगावॉट | | |
| कोराडी संच क्र. ८ | | ६६० मेगावॉट | |
| कोराडी संच क्र. ९ | | ६६० मेगावॉट | |
| कोराडी संच क्र. १० | | | ६६० मेगावॉट |
| एकूण | १२५० मेगावॉट | १८२० मेगावॉट | ६६० मेगावॉट |

महनिर्मिती कंपनीशिवाय, काही स्वतंत्र वीज निर्मात्यांनी (आय पी पी) राज्यातील वितरण परवानाधारकांबरोबर वीज पुरवठ्याचे करार केले आहेत. राज्यातील प्रमुख स्वतंत्र वीज निर्माते खालीलप्रमाणे आहेत:-

| स्वतंत्र वीज निर्माते (आय पी पी) | स्थापित क्षमता (मेगावॉट) |
|---|---|
| अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड, तिरोडा, नागपूर | ३३०० |
| जेसड्ब्ल्यु एनर्जी लि., रत्नागिरी | १२०० |
| इंडियाबुल्स रिअलटेक लि., नाशिक | १३५० |
| इंडियाबुल्स पॉवर लि., अमरावती | १३५० |
| वर्धा पॉवर कंपनी प्रा. लि. , चंद्रपूर | ५४० |
| अभिजित एम ए डी सी नागपूर एनर्जी प्रा. लि., नागपूर | २४६ |
| उर्जांकुर श्री दत्त पॉवर कंपनी लि. कोल्हापूर | ३६ |
| आय एस एम टी लि., चंद्रपूर | ४० |
| गुप्ता एनर्जी प्रा. लि. चंद्रपूर | १२० |

राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळाच्या (एन टी पी सी) कोर्बा, विंध्याचल, कावास, गंधार, सिपत इ. आणि भारताचे अणुशक्ती विद्युत महामंडळ लि. (एन पी सी आय एल) च्या तारापूर येथील प्रकल्पामधून केंद्रीय क्षेत्रातील विजेचा वाटा पुरविण्यात आला होता. आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये एकूण ३८०८४ दशलक्ष युनिट्स केंद्रीय क्षेत्रातील वाट्यामधून पुरविण्यात आले.

## विजेचे पारेषण

विजेचे पारेषण हे एक महत्त्वाचे कार्य असते ज्यामुळे वीज बाजारपेठेतील विजेचा पुरवठा आणि मागणी जोडले जातात. विविध पारेषण परवानाधारकांच्या पारेषण यंत्रणांना एकत्रितपणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा असे म्हणण्यात येते. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन करण्याची जबाबदारी राज्य पारेषण कंपनी (एस टी यु )ची असते. राज्यात खालीलप्रमाणे ८ पारेषण परवानाधारक आहेत–

| अनु क्र. | परवानाधारक | परवाना क्र. | परवान्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | महापारेषण कंपनी | मानीव परवानाधारक | |
| २ | टाटा पॉवर कंपनी (टीपीसी) | मानीव परवानाधारक<br>(दि. १५-०८-२०१४ पर्यंत वैध) | |
| ३ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्स्चर (आर-इन्फ्रा) | २०११ चा १ | ११ ऑगस्ट, २०११<br>(दि. १६ ऑगस्ट २०११ पासून अमलात येईल) |
| ४ | जयगड पॉवर ट्रान्समिशन लि. (जेपीटीएल) | २००९ चा १ | ८ फेब्रुवारी, २००९ |
| ५ | अदानी पॉवर महाराष्ट्र लि. (एपीएमएल ) | २००९ चा २ | ६ जुलै, २००९ |
| ६ | महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एमइजीपीटीसीएल ) | २०१० चा १ | २१ सप्टेंबर, २०१० |
| ७ | इंडियाबुल्स सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एसपीटीसीएल) | २०१० चा २ | २८ डिसेंबर, २०१० |
| ८ | इंडियाबुल्स अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एपीटीसीएल) | २०१० चा ३ | ३० डिसेंबर, २०१० |

विद्यमान आणि नव्याने उभारलेल्या निर्मिती प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या विजेचे निष्कासन करण्याकरिता, केंद्रीय विद्युत प्राधिकरण आणि पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (पीजीसीआयएल) यांच्याबरोबर समन्वयाने हाती घेण्यात आलेल्या यंत्रणा अभ्यासावर आधारित, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन, जिचा वर उल्लेखलेले पारेषण परवानाधारक एक भाग आहेत, राज्य पारेषण कंपनीकडून करण्यात येते.

महाराष्ट्रातील पारेषण वाहिन्या आणि बेज यांचा ३१ मार्च, २०१४ अखेरपर्यंतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परवानाधारकाचे नाव | सर्किट-किमी वाहिनी | उप-केंद्र संख्या | ट्रान्सफॉर्मेशन क्षमता (एमव्हीए) |
|---|---|---|---|---|
| १ | महापारेषण कंपनी | ४४५५९.०४ | ६११ | १०५५९४.५ |
| २ | टीपीसी | १२८९ | १७ | ७५८७.५ |
| ३ | आर-इन्फ्रा | ५३८.७५ | ८ | २९७५.५ |
| ४ | जेपीटीएल | ३३० | ० | ० |
| ५ | एपीएमएल | ४३८ | ० | ० |
| ६ | एपीटीसीएल | ७ | ० | ० |
| ७ | एमइजीपीटीसीएल | ० | ० | ० |
| ८ | एसपीटीसीएल | ० | ० | ० |
| | एकूण | ४७१६१.७९ | ६३६ | ११६१५७.५० |

## विजेचे वितरण

महाराष्ट्रातील ग्राहकांची विजेची गरज चार वितरण परवानाधारक भागवितात. हे परवानाधारक पुढीलप्रमाणे आहेत– महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी), आर–इन्फ्रास्ट्रक्चर लि. (आर–इन्फ्रा), टाटा पॉवर कंपनी (टीपीसी) आणि बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट). बेस्ट, आर–इन्फ्रा आणि टीपीसी या कंपन्या बहुतांश मुंबई शहर आणि त्याच्या उपनगरांना वीज पुरवितात तर उर्वरित महाराष्ट्रात, आणि मुंबई उपनगरातील (छोट्याशा क्षेत्राला) वीज पुरवठा महावितरण कंपनीद्वारे करण्यात येतो.

राज्यातील विजेच्या वितरणाची स्थिती खालील तक्त्यात दाखविण्यात आली आहे:–

| तपशील | महावितरण २०१२–१३ | टीपीसी २०१३–१४ | आर–इन्फ्रा २०१३–१४ | बेस्ट २०१३–१४ |
|---|---|---|---|---|
| ग्राहक संख्या (दशलक्ष मध्ये) | २१९.२४ | ०.४१६ | २.८० | १.०२ |
| विक्री (दशलक्ष युनिट) | ८९५५६ | ६८८३ | ६५९४ | ४७५८ |
| वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च (रुपये प्रति युनिट) | ५.५६ | ६.३५ | ७.९८ | ९.९७ |
| वीज खरेदीचा सरासरी खर्च (रुपये प्रति युनिट) | ३.३९ | ५.३२ | ४.६५ | ४.७५ |
| आनुषंगिक सर्वोच्च मागणी (मेवॉ) | १४६९८ | ७९२ | ११७४ | ७९२ |

## नूतनशील ऊर्जा

महाराष्ट्राची नूतनशील ऊर्जा निर्मितीची संभाव्य क्षमता ८८४० मेगावॉट आहे जी राष्ट्रीय क्षमतेच्या (८९२०० मेगावॉट) १० टक्के आहे. खालील तक्त्यात नूतनशील आणि अ–पारंपरिक स्रोतांपासून (पवन, सौर, बायोमास, ऊसाच्या चिपाड्यांपासून सह–निर्मिती इ. सह) ऊर्जा निर्मितीची सद्यस्थिती दाखविण्यात आली आहे:–

| स्रोत | भारत | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|
| | संभाव्य क्षमता (मेगावॉट) | एकत्रित साध्य (मेगावॉट) (३१.०३.२०१४पर्यंत) | संभाव्य क्षमता (मेगावॉट) | एकत्रित साध्य (मेगावॉट) (३१.०३.२०१४पर्यंत) |
| पवन ऊर्जा | ४८५०० | २११३६.३ | ५४३९ | ४०७९.६६ |
| सौर ऊर्जा | ४–७ युनिट/चौ.मी. प्रति दिवशी | २६४७.०० | ४–७ युनिट्स/चौ.मी. प्रति दिवशी | २३०.२५ |
| बायोमास | १८००० | १३६५.२ | ७८१ | १९०.० |
| ऊसाच्या चिपाड्यांपासून सह–निर्मिती | ५००० | २६४८.४ | १२५० | १३५४.७ |
| लघु–जल विद्युत | १५००० | ३८०३.७ | ७३३ | २७८.६ |
| कचऱ्यातून ऊर्जा | २७०० | १०६.६ | ६३७ | ११.७३ |
| एकूण (मेगावॉट मध्ये) | ८९२०० | ३१७०७.२ | ८८४० | ६१४४.९४ |

देशाच्या एकूण निर्मितीशी तुलना करता, महाराष्ट्राची नूतनशील स्रोतांपासून ऊर्जा निर्माण करण्याची संभाव्य क्षमता जरी १० टक्के असली तरी महाराष्ट्राची प्रत्यक्ष निर्मिती १९ टक्के आहे. राज्याने नूतनशील ऊर्जा निर्मिती क्षमतेमध्ये सन २०१३–१४ मध्ये प्रत्यक्ष घातलेली भर १५४३ मेगावॉट होती. मागील १० वर्षांमध्ये विविध स्रोतांपासून ऊर्जा निर्मिती क्षमतेमध्ये प्रत्यक्ष घातलेली भर खालील तक्त्यामध्ये दाखविण्यात आली आहे:–

| अनु. क्र. | नूत्यनशील ऊर्जेचा प्रकार | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ | ३१ मार्च २०१४ पर्यंत एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पवन ऊर्जा | *४५६ | ५४५ | ४८५ | २६८ | १७८ | १३९ | २३९ | ४०७.०६ | २८८.६ | १०७४ | ४०७९.६६ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | बायोमास | ८ | ० | १० | १६ | ६१ | २० | ४० | ० | १५ | २० | १९० |
| ३ | ऊसाच्या चिपाड्यापासून सह-निर्मिती | **८४.५ | १७.५ | ५७.५ | ८१.५ | ३० | २९ | ३२३.५ | २७२.९ | १९२.३ | २६६ | १३५४.७ |
| ४ | कचऱ्यातून ऊर्जा | ० | ० | ० | ० | ० | ० | ४.७ | ० | ४ | ३ | ११.७३ |
| ५ | लघु-जल प्रकल्प | ***२०० | ० | २ | ६ | १.५ | ६ | ३६.९ | १९.९ | ६.३ | ० | २७८.६ |
| ६ | सौर ऊर्जा | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १९ | ३०.१५ | १८०.१० | २३०.२५ |
| | **एकूण** | **७४८.५** | **५६२.५** | **५५४.५** | **३७१.५** | **२७०.५** | **१९४** | **६४५.१३** | **७१८.८६** | **५३६.३५** | **१५४३.१** | **६१४४.९४** |

**टीप:-** सन २००४-०५ मध्ये क्षमतेमध्ये प्रत्यक्ष घातलेली भर फक्त ७४.२५ मेगावॉट्स होती.

* या क्षमतेमध्ये सन २००४-०५ पूर्वी सुरु झालेले ४०७ मेगावॉट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.

** या क्षमतेमध्ये सन २००४-०५ पूर्वी सुरु झालेले ६७ मेगावॉट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.

*** या क्षमतेमध्ये सन २००४ पूर्वी सुरु झालेले २०० मेगावॉट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.

## महत्वाचे प्रश्न

### नूतनशील उर्जेच्या वाढीला चालना देणे

विद्युत अधिनियम २००३ आणि वातावरणातील बदला संबंधीच्या राष्ट्रीय कृती आराखड्याच्या अनेक उद्दिष्टांपैकी नूतनशील उर्जेच्या विकासाला चालना देणे, हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ८६ (१) (इ) अंतर्गत नूतनशील उर्जेच्या विकासाला चालना देण्यासाठी राज्य विद्युत नियामक आयोगाला संबंधित वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात नूतनशील ऊर्जा खरेदी करण्याची किमान टक्केवारी विनिर्दिष्ट करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार आयोगाने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० हे विनियम ७ जून, २०१० रोजी अधिसूचित केले आहेत. सदर विनियमांमध्ये बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांकरिता आर्थिक वर्ष २०१०-११ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीत त्यांनी नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण झालेल्या ऊर्जेतून करावयाच्या किमान विजेच्या खरेदीचे परिमाण खालील टक्केवारीत विहित केले आहे:-

| वर्ष | नूतनशील ऊर्जा स्तोत्रांपासून (युनिट मधील सममूल्य ऊर्जा) किमान वीज खरेदीचे परिमाण (टक्केवारीत) | | |
|---|---|---|---|
| | सौर | बिगर सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) | एकूण |
| २०१०-११ | ०.२५ टक्के | ५.७५ टक्के | ६.० टक्के |
| २०११-१२ | ०.२५ टक्के | ६.७५ टक्के | ७.० टक्के |
| २०१२-१३ | ०.२५ टक्के | ७.७५ टक्के | ८.० टक्के |
| २०१३-१४ | ०.५० टक्के | ८.५० टक्के | ९.० टक्के |
| २०१४-१५ | ०.५० टक्के | ८.५० टक्के | ९.० टक्के |
| २०१५-१६ | ०.५० टक्के | ८.५० टक्के | ९.० टक्के |

वितरण परवानाधारकांनी त्यांच्यावरील नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनापैकी आर्थिक वर्ष २०१०-११ ते आर्थिक वर्ष २०१२-१३ या कालावधीत प्रत्येक वर्षी बिगर सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) खरेदी ०.१टक्का आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीत प्रत्येक वर्षी बिगर सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) खरेदी ०.२ टक्क्यांपर्यंत करण्याच्या बंधनाचे, लघु-जल किंवा सूक्ष्म विद्युत जल-प्रकल्पामधून वीज खरेदी करुन, पालन करावे.

नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी, बंधन असलेल्या संस्था/व्यक्तींनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या पूर्ततेसाठी केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदीचा आढावा ठराविक कालावधीने घेणे महत्वाचे आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने (मेडा) नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाचा चार वितरण परवानाधारकांच्या घेतलेल्या हिशोबपूर्ती अहवालाच्या आधारे, आयोगाने, या परवानेधारकांनी आर्थिक वर्ष २०१०-११ ते आर्थिक वर्ष २०१२-१३ या तीन वर्षात नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी करण्यासाठी स्वत: पुढाकार घेऊन कार्यवाही सुरु केली आहे.

### वीज मागणी व्यवस्थापन

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करावयाची चौकट) विनियम, २०१० आणि मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१०, हे दोन विनियम अधिसूचित केले असून वीज मागणी व्यवस्थापनासंबंधी विनियम अधिसूचित करणारा राज्य आयोग हा देशात पहिला विद्युत नियामक आयोग झाला आहे.

या विनियमांचा उद्देश हा विद्युत कंपन्यामार्फत कार्यक्षम ऊर्जा व ऊर्जा संवर्धनासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना चालना देणे, हा आहे. या विनियमांमुळे परवानाधारकांवर वीज मागणी व्यवस्थापन हे त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा एक भाग करणे बंधनकारक झाले आहे. परवानाधारक वीज मागणी व्यवस्थापनावर होणारा त्यांचा खर्च हा शेवटी ग्राहकांकडून वसूल करावयाचा खर्च म्हणून तो एकूण महसुली गरजेत समाविष्ट करु शकतात.

वीज मागणी व्यवस्थापनास पध्दतशीरपणे प्रोत्साहन मिळावे आणि हे कार्यक्रम कमी खर्चिक राहतील याची काळजी घेण्यासाठी, आयोगाला मदत करण्याकरिता या विनियमांखाली वीज मागणी व्यवस्थापन सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे.

आयोगाने अधिसूचित केलेल्या मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मधील विनियम ७.३ अंतर्गत वितरण परवानाधारकांनी कार्यक्षम ऊर्जा आणि वीज मागणी व्यवस्थापन योजनांखाली ठरवून देण्यात आलेले लक्ष्यांक विचारात घेऊन किती वीज खरेदी करावी लागेल त्याचा अंदाज काढणे, आवश्यक आहे.

## सन २०१३-१४ मधील वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमाखाली झालेली प्रगती

आयोगाने वीज मागणी व्यवस्थापनांतर्गत प्रोत्साहनांवर आधारित विविध कार्यक्रम मंजूर केले आहेत. या कार्यक्रमांतर्गत प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:

### जुन्या ट्युबलाईट टी-५ एफ टी एलने बदलणे

टी-५ फ्ल्युरोसंट ट्युबलाईटचा कार्यक्रम बेस्ट आणि टीपीसीने कार्यान्वित केला. दोघांनाही ५०००० चा लक्ष्यांक दिलेला असताना बेस्टने ५००० टी-५ फ्ल्युरोसंट ट्युबलाईट्स बसविल्या तर टीपीसी वितरणने ४१३० बदलल्या.

### जुने पंखे ५ तारांकित सिलिंग पंख्यांनी बदलणे

आर-इन्फ्रा वितरण कंपनीने या कार्यक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यांत ५००० सिलिंग फॅन बदलण्याचा लक्ष्यांक साध्य केला आहे. या कार्यक्रमाखाली दुसऱ्या टप्प्याचे काम अद्याप चालू असून या टप्प्याखाली २०००० पंखे बदली करण्याचे लक्षांक असताना आर-इन्फ्राने १०४०० पंखे बदलले आहेत. या कार्यक्रमाखाली ७,६९,२१० युनिटसची बचत झाली आहे. टीपीसी-वितरणने १३,२७९ पंखे बदलले अहेत. बेस्ट उपक्रमाने ही योजना राबविण्यास वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत सुरुवात केली असून त्यांनी २००० जुने पंखे बदलले आहेत.

### जुनी वातानुकुलित यंत्रे पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांनी बदलणे

आर-इन्फ्राने या कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील अंमलबजावणी सुरु केली असून त्यांना जुनी १५०० वातानुकुलित यंत्रे पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांनी बदलण्याचा लक्ष्यांक आहे. टीपीसीने २० वातानुकुलित यंत्रे बदलली आहेत. दोन्ही परवानाधारकांनी या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी या योजनेमध्ये निवासी ग्राहकांचा देखील समावेश करण्याचे प्रस्तावित केले आहे.

### औष्णिक ऊर्जा साठवणूकीचा (टी इ एस) कार्यक्रम

आयोगाने मार्च, २०१० मध्ये २५०० टीआर च्या लक्ष्यांकासह औष्णिक ऊर्जा साठवणुकीसाठी एक पथदर्शक कार्यक्रम मंजूर केला. वरील कार्यक्रमाची रचना अशी करण्यात आली आहे की, औष्णिक ऊर्जा साठ्याच्या यंत्रणेचा वापर करुन दिवसाच्या वेळेतील सर्वोच्च मागणीचा भार रात्रीच्या वेळी सर्वोच्च मागणी नसतानाच्या काळात वर्ग करता येतो. असे दिसून आले आहे की, औष्णिक ऊर्जा साठ्याच्या यंत्रणेत काही सुविधा यापूर्वीच बसविण्यात आल्या होत्या. परंतु अनेक कारणांमुळे त्यांचा परिणामकारपणे वापर करण्यात येत नव्हता. यामुळे, क्षमतेच्या आधारे नव्हे तर औष्णिक ऊर्जा साठवणुकीच्या यंत्रणेच्या आधारे दिवसाच्या सर्वोच्च मागणीच्या काळातील भार रात्रीच्या वेळेत सर्वोच्च मागणी नसतानाच्या काळात वर्ग केलेल्या भारावर रिबेट रु. १.०० प्रति युनिट याप्रमाणे १ वर्ष रिबेट देण्यात येतो.

यासाठी रु. ५९ लाखांच्या अंदाज-पत्रकास मंजुरी देण्यात आली होती. टीपीसीने सर्वोच्च मागणीच्या काळातील १६०० केव्हीए भार सर्वोच्च मागणी नसतानाच्या काळात वर्ग करुन ३५,९५,३६८ युनिटस सर्वोच्च मागणी नसतानाच्या काळात वर्ग केले. या योजनेत सहभागी झालेल्या ग्राहकांना रु.१३.२१ लाख रिबेट अदा करण्यात आला.

### जुने रेफ्रिजरेटर पंचतारांकित रेफ्रिजरेटरने बदलणे,

हा कार्यक्रम मार्च, २०१२ मध्ये मंजूर करण्यात आला. आर-इन्फ्राने ५००० रेफ्रिजरेटर्स बदलण्याचा लक्ष्यांक असताना ३०७३ जुने रेफ्रिजरेटरर्स पंचतारांकित रेफ्रिजरेटरर्सनी बदलले. आर-इन्फ्राने या योजनेमुळे ३,०१,९४० युनिटसची बचत केली. टीपीसीने हा कार्यक्रम सुरु केला आहे.

### मागणी प्रतिसाद कार्यक्रम

आयोगाने मागणी प्रतिसाद या संकल्पनेची व्याख्या मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करावयाची चौकट) विनियम, २०१० मध्ये केली आहे. टीपीसी-ने हस्तचलित पथदर्शक मागणी प्रतिसाद कार्यक्रम कार्यान्वित करुन सर्वोच्च मागणीच्या काळातील २,८१,८१२ युनिट्सचा भार सर्वोच्च मागणी नसतानाच्या काळात वर्ग केला आहे. या कार्यक्रमात काही माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (आयटी/आयटीइएस) कंपन्या, सीवेज पंपिंग केंद्रे आणि काही औद्योगिक भार ग्राहक सहभागी झाले होते. या ग्राहकांनी टीपीसीला आवश्यकता असेल तेव्हा भार कमी करण्यासाठी वेगवेगळ्या पध्दती वापरल्या. त्यांच्या या कृतीमध्ये वातानुकुलित संयंत्राचे तापमान बदलणे, कामाच्या वेळा बदलणे, प्रकाश झोतासाठी वीज पुरवठा वेगवेगळ्या वेळी करणे, पंपाच्या कामाच्या तासात बदल करणे, इमारत व्यवस्थापन यंत्रणेचा वापर करुन भार कमी करणे आणि राखीव निर्मिती सुरु करणे, या बाबींचा समावेश होतो. वीज मागणी व्यवस्थापन सल्लागार समितीने, स्वयंचलित मागणी प्रतिसाद कार्यक्रमासाठी चौकट तयार करण्याकरिता आय आय टी, मुंबई, येथील प्रा. सूर्यनारायण डोला यांच्या नेतृत्वाखाली एक मागणी प्रतिसाद उप-समिती नेमली आहे.

**ऊर्जा लेखापरीक्षण कार्यक्रम**

ऊर्जेच्या लेखापरीक्षण कार्यक्रमांतर्गत जास्त वीज वापर करणाऱ्या सहभागी होणाऱ्या ग्राहकांना, जर त्यांना सूचित करण्यात येणाऱ्या उपाययोजना त्यांनी स्वीकारल्या तर त्यांना, लेखापरीक्षण शुल्काच्या ७५ टक्के रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. आठ ग्राहकांचे ऊर्जा लेखापरीक्षण करण्यात आले असून या आठ ग्राहकांकडून दर वर्षात २३,९५,५०० ऊर्जा युनिटसची बचत होईल असा, अंदाज व्यक्त करण्यात आला. टीपीसी कडून ६४ ऊर्जा लेखापरीक्षणे पूर्ण करण्यात आली असून त्यांच्याकडून रु. ४९.२६ लाख रिबेट अदा करण्यात आला.

**प्रमाण देकार कार्यक्रम**

टीपीसीने ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पामध्ये गुंतवणूक करणाऱ्या औद्योगिक आणि वाणिज्यिक ग्राहकांना पाठींबा देण्यासाठी "प्रमाण देकार" नावाचा एक कार्यक्रम सुरु केला आहे. या "प्रमाण देकार" योजनेंतर्गत, रविवार आणि अन्य सुट्ट्यांचे दिवस वगळून, सकाळी ८.०० ते रात्री ८.०० या कालावधीत केलेल्या ऊर्जा बचतीच्या प्रत्येक युनिटकरिता रु.१ या प्रमाणे प्रोत्साहन-अधिदान देण्यात येते. आयोगाने या कार्यक्रमांतर्गत एक पथदर्शक प्रकल्प जानेवारी २०१३ मध्ये रु. ४२.५० लाखाच्या अंदाज-पत्रकीय तरतुदीसह मंजूर केला आहे. या योजनेत सहभागी झालेल्या ग्राहकांनी प्रत्यक्ष वापरलेल्या उर्जेच्या युनिटसच्या नोंदी ठेवण्याचे काम, प्रकल्पाचे संनियंत्रण आणि पडताळणी करण्याच्या कामासह प्रगती पथावर आहे.

**ग्राहक जागरुकता आणि शिक्षण**

आर-इन्फ्रा आणि टीपीसीकडून विविध कार्यक्रम ग्राहकांसाठी आणि शाळांकरिता हाती घेण्यात आले.

## पारेषण नियोजन

भारतातील पारेषण यंत्रणेत आंतर-राज्य आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणांचा समावेश असतो. आंतर-राज्य आणि आंतर-प्रादेशिक पारेषण यंत्रणा ही मुख्यत्वेकरुन पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (पीजीसीआयएल) च्या मालकीची आहे. आंतर-राज्य पारेषण यंत्रणा, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा आणि समर्पित पारेषण वाहिन्या यांची आंतर-जोडणी झालेली असते आणि या सर्व एकत्र मिळून पारेषण ग्रिड तयार होते.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण हे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ७३ (अ) मधील तरतुदींनुसार संभाव्य निर्मिती आणि पारेषण आराखडे तयार करण्यासाठी आणि नियोजन एजन्सींच्या कामकाजात सुसूत्रता राखण्यासाठी जबाबदार आहे. केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु) ही एक कार्यक्षम आणि समन्वित आंतर-राज्य पारेषण यंत्रणा विकसित करण्यासाठी जबाबदार राहील तर राज्य पारेषण कंपनी (एस टी यु) ही त्याचप्रमाणे एक कार्यक्षम आणि समन्वित राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा विकसित करण्यासाठी जबाबदार राहील.

राज्य पारेषण कंपनी (एस टी यु) ही, केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु), केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीइए), प्रादेशिक विद्युत समिती (आरपीसी), विद्युत संयंत्र विकासक इ. यांचेशी विचार-विनिमय करुन, पारेषण नियोजनाच्या निकषांवरील नियमावलीनुसार, आवश्यक यंत्रणा अभ्यास करुन, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या जाळ्याच्या मजबुतीकरणासाठी, राज्यांतर्गत निर्मिती प्रकल्पामधून विजेच्या निष्कासनासाठी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या ठिकाणांतून वीज खेचण्यासाठी, प्रस्ताव तयार करील. या अभ्यासात ग्रिडची मानके, ग्रिडला जोडणीची तांत्रिक मानके आणि अन्य संबंधित मानके/विनियम विचारात घेण्यात येतात. महत्वाच्या राज्यांतर्गत योजनांचे नियोजन समन्वित रितीने करण्यात येते. आणि त्यावर स्थायी समितीमध्ये चर्चा करण्यात येते.

अति गर्दीच्या नागरी/अर्धनागरी क्षेत्रात, अवघड भूप्रदेश इ. बाबतीत, वहिवाटीचे हक्क व खर्च इष्टतम स्तरावर ठेवून, पारेषण वाहिन्यांसाठी जागेचे आरक्षण करण्यात येते. हे करण्यासाठी, अंतिम यंत्रणेसाठी उच्च व्होल्टेजची पातळी स्वीकारुन आणि सुरुवातीच्या टप्प्यावर एक पातळी कमी स्तरावर काम करुन, किंवा भविष्यात अतिरिक्त सर्किटमध्ये वाहिनी टाकणे शक्य होण्यासाठी बहु-सर्किट मनोऱ्यांचा किंवा एचव्हीडीसी, जीआयएस इ. सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ३९ नुसार, राज्य पारेषण कंपनी ही, राज्य पारेषण कंपनीच्या ग्रिडला जोडलेल्या/जोडावयाच्या राज्यांतर्गत वीज निर्माते आणि वितरण परवानाधारक यांच्याशी समन्वय साधून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या नियोजनासाठी, एक नोडल एजन्सी म्हणून कार्य करते. राज्य पारेषण कंपनी ही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा नियोजनासाठी एकल बिंदू संपर्क असते आणि ती सर्व राज्यांतर्गत विद्युत कंपन्यांच्या वतीने, त्यांच्या राज्यातील निर्मिती केंद्रांमधून विजेचे निष्कासन करण्यासाठी, वितरण कंपन्यांच्या आवश्यकता भागविण्यासाठी आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या आराखड्यास अनुसरुन राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधून वीज खेचण्यासाठी, जबाबदार असते. राज्य पारेषण कंपनी, नागरी नियोजन एजन्सीज, विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) विकासक,

औद्योगिक विकासक इ. यांचे बरोबर, त्यांच्या दिर्घ–कालीन गरजा भागविण्यासाठी पारेषण यंत्रणा उभारणीकरिता आणि नवीन उप–केंद्रांकरिता जागेसाठी पुरेशी तरतूद करण्यासाठी, समन्वय साधते.

या यंत्रणेचे नियोजन, नेहमीच्या सामान्य परिस्थितीत तसेच संभाव्य विश्वासार्ह आकस्मिक घटना घडल्यानंतर काम करु शकेल अशा रितीने, अनुज्ञेय मर्यादांमध्ये काम करण्यासाठी, करण्यात येते. तथापि यंत्रणेला आकस्मिक घडणाऱ्या टोकाच्या घटनांना क्वचित सामोरे जावे लागेल आणि अशा घटनांना तोंड देण्यासाठी यंत्रणेचे नियोजन करण्यात आलेले नसू शकेल. ग्रिडची सुरक्षितता राखण्यासाठी टोकाच्या/क्वचित घडणाऱ्या परंतु विश्वासार्ह आकस्मिक घटना वेळोवेळी निश्चित करण्यात याव्यात आणि त्यांचा विपरित परिणाम शिथिल करण्यासाठी सुयोग्य बचाव पध्दत, जसे- भार–नियमन, निर्मितीचे फेरनिर्धारण, आयर्लॅन्डिंग, यंत्रणा संरक्षक योजना इ. तयार करण्याची गरज आहे.

नियोजित पारेषण क्षमता मर्यादित आहे आणि पूर्व नियोजन न केलेल्या दिशेने जर मोठ्या प्रमाणावर विजेचे पारेषण करायचे असेल तर नक्कीच अतिभार निर्माण होऊ शकतो.

नवीन उपकेंद्राकरिता आणि निर्मिती केंद्राकरिता उचित संपर्क यंत्रणांचे नियोजन केंद्रीय पारेषण कंपनी (सी टी यु)/राज्य पारेषण कंपनी (एस टी यु) यांचेकडून करण्यात येते आणि त्याची अंमलबजावणी केंद्रीय पारेषण कंपनी (सी टी यु)/राज्य पारेषण कंपनी (एस टी यु)/वीज निर्मात्यांकडून करण्यात येते ज्यामुळे अशा यंत्रणा, केंद्र सुरु करण्याच्या वेळेस तयार होऊन उपलब्ध असतील.

यंत्रणेचे नियोजन, खालीलपैकी एक किंवा अनेक विद्युत यंत्रणा अभ्यासांच्या आधारे, करण्यात येते. जसे की- १) वीज प्रवाहाचा अभ्यास, २) शॉर्ट सर्किटचा अभ्यास, ३) स्थिरता अभ्यास ४) इएमटीपी अभ्यास (स्विचिंग/ डायनॅमिक ओव्हर–व्होल्टेजेज, इन्सुलेशन को–ऑर्डिनेशन इ.करिता)

दीर्घ–कालीन मुक्त प्रवेशाची आवश्यकता विचारात घेऊन, विद्युत केंद्रापासून सुरु होऊन जवळच्या ग्रीड बिंदूपर्यंत जाणाऱ्या नवीन पारेषण वाहिन्यांचे, निर्मात्यांशी विचार–विनिमय करुन निर्मिती केंद्रांची जादा भार क्षमता विचारात घेऊन, नियोजन करण्यात येते. यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या नवीन पारेषण वाहिन्यांचे नियोजन, वाहिन्या आणि ट्रान्सफॉर्मर्सच्या औष्णिक लोडिंग मर्यादेत १० टक्क्यांची मार्जिन ठेवून, करण्यात येते.

विजेचे निष्कासन करणाऱ्या खालील योजनांचे नियोजन, महापारेषण कंपनीकडून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी करण्यात आले आहे:-

**राज्य पारेषण कंपनीने आर्थिक वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ करिता नियोजित केलेल्या निष्कासन योजना (ज्या महापारेषण कंपनीकडून कार्यान्वित करण्यात येतील)**

| | | | |
|---|---|---|---|
| ४००/२२० केव्ही कोराडी–२ उप–केंद्र (१×६६० मेवॉ) (२०१३–१४) (२×६६० मेवॉ) (२०१४–१५) | ४०० केव्ही मालेगांव (सौदाणे) (२०१५–१६) | ७६५/४०० केव्ही लोणार उप–केंद्र (२०१६–१७) | परली औष्णिक विद्युत केंद्र–विस्तारामधून विजेचे निष्कासन करण्याकरिता (१×२५० मेवॉ) (२०१३–१४) |
| ४००/२२० केव्ही चंद्रपूर–२ उप–केंद्र स्विचिंग केंद्रासह (चंद्रपूर २×५०० मेवॉ) (२०१३–१४) | ४०० केव्ही नंदगांव पेठ (आयपीपी उप–केंद्र) (२०१५–१६) | ४०० केव्ही उप–केंद्र, नेर, जिल्हा–यवतमाळ, जिम्बुविश करिता (२०१६–१७) | उरण जी.टी. येथील विस्तार प्रकल्पामधून विजेचे निष्कासन करण्याकरिता १) ब्लॉक क्र. १–७०० मॅवॉ (२०१३–१४) २) ब्लॉक क्र. २– ३४० मॅवॉ (२०१४–१५) |
| ७६५/४०० केव्ही लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. साठी वर्धा पूलिंग केंद्र (२×६६० मेवॉ) (२०१६–१७) | ४०० केव्ही भूसावळ रेप्लेसमेंट्पासून विजेचे निष्कासन करण्यासाठी भूसावळ नवीन उप–केंद्र १×६२ मेवॉ बाय, १×६६० मेवॉ (२०१६–१७) | ४०० केव्ही नाशिक (एकलहरे) उप–केंद्र | ४०० केव्ही धुळे दोन उप–केंद्र (दोंडाइचे) (२०१५–१६) (२०१६–१७) |

## स्मार्ट ग्रिड समन्वय समिती

भारताच्या गरजा विचारात घेऊन स्मार्ट ग्रिडची रचना करण्यात आली असून त्यामध्ये असे उपाय योजण्यात आले आहेत की, ज्यामुळे विद्युत क्षेत्रातील काही महत्त्वाची आव्हाने, जसे वीज पुरवठ्यातील हानि, विश्वासार्हता आणि दर्जा, सोडवणे शक्य होते. राज्यातील विद्युत कंपन्यांच्या कार्यक्षम ऊर्जेच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी आणि राज्यात स्मार्ट विजेचे जाळे विकसित करण्यासाठी, मे २०१२ मध्ये महाराष्ट्र स्मार्ट ग्रिड समन्वय समितीची (महा-एसजीसीसी) स्थापना करण्यात आली. सदर समिती राज्याकरिता स्मार्ट ग्रिडची एक व्यूहरचना विकसित करण्याबरोबरच राज्याची अल्प-कालिन, मध्यम कालिन व दीर्घ-कालिन उद्दिष्टे निश्चित करुन एक कृती आराखडा तयार करील. या समितीमध्ये विद्युत कंपन्या, ग्राहक संस्था, आय आय टी मुंबई, आणि व्ही जे टी आय मुंबई, यासारख्या शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, उत्पादक व सल्लागार आहेत.

महाराष्ट्र स्मार्ट ग्रिड समन्वय समिती (महा-एस जी सी सी) चे पालकत्व श्री. रेजी कुमार, अध्यक्ष, इंडिया स्मार्ट ग्रिड फोरम आणि श्री. विजय ल. सोनवणे, सदस्य, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांच्याकडे जाते. महा-एस जी सी सी चे सचिव श्री.राजेंद्र आंबेकर, संचालक (वीज दर), हे आहेत. या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

अ) स्मार्ट ग्रिडचा विकास सुकर करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, विद्युत कंपन्या आणि हितसंबंधितांनी करावयाच्या कृती निश्चित करणे व त्यांना मार्गदर्शन करणे.

ब) राज्याच्या विद्युत यंत्रणेची भावी काळातील आव्हाने निश्चित करणे, ज्यामध्ये स्मार्ट ग्रिडचा कार्यक्षम वापर करण्यासाठी असणाऱ्या तांत्रिक व आर्थिक मर्यादा व त्या दूर करण्यासाठी करावयाच्या उपाय-योजनांचा समावेश असेल.

क) महत्त्वाच्या हितसंबंधितांमध्ये माहितीचे व ज्ञानाचे आदान-प्रदान सुकर करणे.

ड) स्मार्ट ग्रिड उद्योगातील भावी घडामोडी सर्व हितसंबंधितांना अधिक चांगल्या रितीने समजणे शक्य व्हावे याकरिता त्यांना मदत करणे .

इ) आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील स्मार्ट ग्रिडच्या संबंधातील घटनांचा मागोवा घेणे व अशा घडामोडींसाठी महत्वाचे उत्प्रेरक तयार करणे.

फ) स्मार्ट ग्रिडसाठी प्रारुप विनियम तयार करणे.

**खालीलप्रमाणे कार्यकारी गट स्थापन करण्यात आले आहेत:-**

१) स्मार्ट ऊर्जा धोरण/स्मार्ट ग्रिड कालबध्द कार्यक्रम

२) प्रगत मीटरींग इंटरफेस आणि स्मार्ट मीटरींग

३) स्मार्ट ग्रिडकरिता संदेशवहन

४) नूतनशील ऊर्जा स्त्रोत, मायक्रो ग्रिडस आणि ऊर्जा साठवणूक यंत्रणा यांचे एकत्रीकरण

५) सर्वोच्च भार नियंत्रण आणि मागणी प्रतिसाद

६) स्मार्ट पारेषण यंत्रणा

आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये, महाराष्ट्र स्मार्ट ग्रिडच्या समन्वय समितीच्या १४ मे, २०१३, ४ डिसेंबर, २०१३ आणि ६ जानेवारी, २०१४ रोजी ३ बैठका घेण्यात आल्या.

## मंजूर केलेले परवाने

आयोगाला विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ अंतर्गत विजेचे पारेषण, वितरण आणि व्यापार करण्यासाठी परवाना मंजूर करण्याचे अधिकार आहेत. आयोगाने आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये परवान्याशी संबंधित खालील प्रकरणे हाताळली:-

### सेझ विकासकांशी संबंधित बाबी

विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४ (बी) अंतर्गत, सेझ विकासक हे त्यांच्याशी संबंधित सेझ क्षेत्रात मानीव वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने खालील चार सेझ विकासकांनी सादर केलेल्या याचिका हाताळल्या आणि त्यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी अधिसूचित केल्या.

| अ.क्र. | परवानाधारकाचे नाव | सेझचा प्रकार | ठिकाण | परवान्याचा वैधता कालावधी | परवान्याच्या विशिष्ट अटी विनियमांचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | सिरिन प्रॉपर्टीज प्रा.लि. | माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा | ऐरोली, नवी मुंबई | २ नोव्हेंबर, २००७ ते २ नोव्हेंबर, २०३२ | २१ ऑगस्ट, २०१३ |
| २. | महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी, (एमएडीसी) | बहुविध उत्पादन करणारा सेझ | मिहान, नागपूर | २९ मे, २००७ ते २९ मे, २०३२ | ३ डिसेंबर, २०१३ |
| ३. | इक्झोरा कन्सन्ट्रक्शन्स प्रा.लि. | बहुविध सेवा देणारा सेझ | पनवेल, जि-रायगड | १९ फेब्रुवारी, २००९ ते १९ फेब्रुवारी, २०३४ | १० एप्रिल, २०१४ |
| ४ | क्वॅड्रॉन बिझनेस पार्क लि. | माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा | हिंजेवाडी, पुणे | १४ सप्टेंबर, २००७ ते १४ सप्टेंबर २०३२ | ७ एप्रिल, २०१४ |

### वीज व्यापार परवाना मंजूरी

आयोगाने आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये मे. डी. एम. कॉर्पोरेशन यांना महाराष्ट्र राज्यात राज्यांतर्गत १०० दशलक्ष युनिट पर्यंतच्या विजेच्या व्यापारासाठी पंचवीस (२५) वर्षांकरिता परवाना मंजूर केला.

### दि टाटा पॉवर कंपनीच्या क्षेत्रात वितरण परवान्याकरिता स्वारस्य देकार

दि टाटा पॉवर कंपनीला रद्द करण्यात आलेल्या कायद्यांखाली देण्यात आलेला परवाना १५ ऑगस्ट, २०१४ रोजी संपणार होता. विद्युत अधिनियम २००३ खाली, परवान्याच्या नूतनीकरणासाठी कोणतीही तरतूद नाही. परवाना मंजूर करण्यासाठी आयोगाला अधिनियमाच्या कलम १५ खाली देण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबवावी लागते आणि ९० दिवसांच्या आत आयोगाने परवाना मंजूर करणे आवश्यक असते. त्यानुसार, आयोगाने दि टाटा पॉवर कंपनीच्या क्षेत्रात वितरण परवाना मिळण्यासाठी इच्छुक असलेल्या संस्थांकडून १ जानेवारी, २०१४ रोजी स्वारस्य देकार आमंत्रित केले. दि टाटा पॉवर कंपनी लि., महावितरण कंपनी आणि मे. इंडिया पॉवर कार्पोरेशन लि. या तीन कंपन्यांनी स्वारस्य देकार सादर केले. त्यानंतर, आयोगाने या कंपन्यांना परवाना मंजूरीसाठी अर्ज सादर करण्यास कळविले. दि टाटा पॉवर कंपनी आणि महावितरण कंपनी लि. या कंपन्यांनी विहित कालावधीत परवान्यासाठी अर्ज दाखल केले आणि या अर्जांची आयोगाने पुढील छाननी केली.

# वीज दराचे आणि अन्य निवडक आदेश

## वार्षिक महसूली गरज, वीज दराचे निश्चितीकरण आणि अचूक समायोजन-

**विदर्भ इंडस्ट्रिज पॉवर लि.ने (व्हीआयपीएल) त्यांच्या ६०० मेवॉ विद्युत प्रकल्पाकरिता आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता तात्पुरता वीज दर निश्चित करण्यासाठी दाखल केलेली याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र.९१)**

व्हीआयपीएल आणि आर-इन्फ्रा यांनी व्हीआयपीएलच्या ६०० मेवॉ (२×३०० मेवॉ) बुटीबोरी (जिल्हा-नागपूर) विद्युत प्रकल्पाकरिता आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता तात्पुरता वीज दर निश्चित करण्यासाठी २४ जुलै, २०१३ रोजी याचिका सादर केली. आयोगाने आपल्या २० फेब्रुवारी, २०१३ च्या आदेंशान्वये, व्हीआयपीएलच्या बुटीबोरी विद्युत प्रकल्पाच्या संच क्रमांक २ मधून दीर्घ-कालीन तत्त्वावर ३०० मेवॉ वीज खरेदीसाठी आणि १९ जुलै २०१३ च्या आदेशान्वये, संच क्रमांक १ मधून आणखी ३०० मेवॉ वीज खरेदीसाठी, आर-इन्फ्रा वितरण आणि व्हीआयपीएल यांच्यामधील वीज खरेदी कराराला तत्वत: मंजुरी दिली.

आयोगाने आपल्या १७ जानेवारी २०१४ च्या आदेशाने व्हीआयपीएलच्या बुटीबोरी विद्युत प्रकल्पाच्या आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता तात्पुरत्या वीज दरास मंजुरी दिली. आयोगाने अशी नोंद केली की, आयोगाने या प्रकल्पातील तात्पुरता भांडवली खर्च निश्चित केलेला नाही. हा खर्च, वाणिज्यिक कामकाजास सुरूवात झाल्याच्या दिनांका रोजी असलेल्या लेखापरीक्षित भांडवली खर्चाच्या आधारे काळजीपूर्वक छानणी केल्यानंतर, वीज दर ठरविताना, निश्चित करण्यात येईल. या आदेशात व्हीआयपीएल यांना असे निर्देश देण्यात आले की, त्यांनी भविष्यात परकिय चलनाच्या विनिमय दरातील चढ-उतारामुळे उद्भवणाऱ्या जोखमीपासून संरक्षणाकरिता विविध पर्यायांचा आणि त्याचबरोबर वीज दरावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करावा. आयोगाच्या या आदेशाची अन्य ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:-

१) आयोगाने, लेखापरीक्षण करण्यात आलेल्या भांडवली खर्चाच्या आधारे तात्पुरते स्थिर आकार मंजूर करण्यासाठी खालील टप्पे निश्चित केले:-

| अ. क्र. | प्रकल्पाच्या वाणिज्यिक कामकाजास सुरूवात झाल्याच्या दिनांका पर्यंतच्या एकूण अंदाजित प्रकल्प खर्चाच्या टक्केवारीत (%) लेखापरीक्षित भांडवली खर्च | याचिकाकाराने मागणी केलेल्या वार्षिक स्थिर आकारांच्या टक्केवारीत (%) अनुज्ञेय तात्पुरते वार्षिक स्थिर आकार |
|---|---|---|
| १ | ७५ टक्क्यांपर्यंत | तात्पुरत्या वार्षिक स्थिर आकारांना मंजुरी नाही |
| २ | ७५ टक्क्यांपेक्षा जास्त आणि ८० टक्क्यांपर्यंत | याचिकाकाराने मागणी केलेल्या वार्षिक स्थिर आकारांच्या ७५ टक्के |
| ३ | ८० टक्क्यांपेक्षा जास्त आणि ८५ टक्क्यांपर्यंत | याचिकाकाराने मागणी केलेल्या वार्षिक स्थिर आकारांच्या ८० टक्के |
| ४ | ८५ टक्क्यांपेक्षा जास्त आणि ९० टक्क्यांपर्यंत | याचिकाकाराने मागणी केलेल्या वार्षिक स्थिर आकारांच्या ८५ टक्के |
| ५ | ९० टक्क्यांपेक्षा जास्त | याचिकाकाराने मागणी केलेल्या वार्षिक स्थिर आकारांच्या ९० टक्के |

व्हीआयपीएलने आर्थिक वर्ष २०१४-२०१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-२०१६ करिता केलेल्या मागणीच्या ९० टक्के इतके तात्पुरते वार्षिक स्थिर आकार आयोगाने मंजूर केले.

२) आयोगाने व्हीआयपीएल यांना इंधन पुरवठा करार (एफ एस ए) करण्याची प्रक्रिया त्वरेने पूर्ण करण्याचे निर्देश दिले ज्यामुळे १ एप्रिल २०१४ पासून पुरवठा सुरु करण्याचा दिनांका रोजी कोळसा उपलब्ध असण्याची खात्री करण्यात येईल.

३) आयोगाने बहु-वर्षीय वीज दर विनियमांनुसार डिझाईन स्टेशन उष्मांक दर विचारात घेतला आणि व्हीआयपीएल यांना कामगिरीच्या हमीचा चाचणी अहवाल ती पूर्ण झाल्यानंतर सादर करण्याचे निर्देश दिले.

४) आयोगाने अतिरिक्त ०.१३ टक्के सहाय्यकारी वापर विचारात घेतला आणि व्हीआयपीएल यांना निर्देश दिले की त्यांनी आर ओ संयत्राकरिता आणि अतिरिक्त जल पंपींग यंत्रणेकरिता सहाय्यकारी वीज वापराचा मासिक तपशील वेगवेगळा ठेवावा.

५) इंधनावरील प्रत्यक्ष खर्चातील कोणतीही तफावत ही इंधन खर्च समायोजन पध्दतीमध्ये समायोजित होणार असल्यामुळे, आयोगाने २०१५-१६ करिता इंधनाच्या खर्चाचा अंदाज काढताना त्यात इंधनाच्या किंमतीत होणारी वाढ विचारात घेतली नाही.

६) आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता १०० टक्के देशी कोळशावर आधारित, तात्पुरता ऊर्जा आकार रु.१.२३ पैसे प्रति युनिट इतका मंजूर केला.

७) तात्पुरत्या ऊर्जा आकारांची परिगणना करण्यासाठी कोळशाची किंमत आणि कोळशाचे एकूण कॅलरीफिक मूल्य यांच्या मान्यता दिलेल्या मूल्यात कोणतीही तफावत झाली तर अशी तफावत, ऊर्जा आकारांच्या दराच्या माध्यमातून समायोजन करुन वसूलीयोग्य राहील.

**महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.ने (महानिर्मिती कंपनी) आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता त्यांच्या खापरखेडा संच क्र.५ चा भांडवली खर्च आणि वीज दर निश्चितीकरणासाठी दाखल केलेली याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र.४४)**

महानिर्मिती कंपनीने त्यांच्या खापरखेडा औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या संच क्र.५ करिता भांडवली खर्च आणि वीज दर निश्चितकरणासाठी याचिका २२ मार्च, २०१३ रोजी सादर केली. आयोगाने तांत्रिक वैधता बैठकांनंतर १६ जुलै, २०१३ रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली. आयोगाने ४ सप्टेंबर, २०१३ रोजी पारित केलेल्या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:-

१) आयोगाने भांडवली खर्च रु.३३४०.४१कोटी मंजूर केला आणि महानिर्मिती कंपनीला अनिश्चित वीज पुरवठ्याकरिता वसूल न केलेला इंधनावरील खर्च रु.२८.०५ कोटी नंतर वेगळा वसूल करण्यास परवानगी दिली. त्यामुळे, वाणिज्यिक कामकाज सुरु झाल्याच्या दिनांका रोजी इंधन खर्च आणि ५० टक्के लिक्विडेटेड डॅमेजीज वजा केल्यानंतर भांडवली खर्च रु.३१९६.९९ कोटी इतका येतो. महानिर्मिती कंपनीने करार पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदारांकडून वसूल केलेल्या अंतिम लिक्विडेटेड डॅमेजीजची माहिती सादर केल्यानंतर, वाणिज्यिक कामकाजास सुरुवात झाल्याच्या दिनांका रोजीच्या अंतिम भांडवली खर्चात, सुधारणा करण्यात येईल.

२) आयोगाने आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता रु.५९६.१२ कोटीच्या वार्षिक स्थिर आकारांना मंजुरी दिली. आयोगाने स्थिरता कालावधीसाठी रु.३.२१ प्रति युनिट आणि स्थिरतेनंतरच्या कालावधीसाठी रु.२.७८ प्रति युनिट ऊर्जा आकारांना मंजुरी दिली.

३) आयोगाने, महानिर्मिती कंपनीने आकारलेला तात्पुरता वीज दर आणि आयोगाने आदेशाव्दारे मंजूर केलेल्या वीज दरानुसार वसूली-योग्य फरकाची रक्कम महानिर्मिती कंपनीला ऑक्टोबर २०१३ पासून ६ समान मासिक हप्त्यात वसूल करण्यास परवानगी दिली.

४) आयोगाने बांधकाम चालू असतानाच्या काळातील (आयडीसी) वाढीपैकी फक्त ५० टक्के रकमेस मंजूरी दिल्याने, या टप्प्यावर आयोगाने भांडवली खर्चामधून लिक्विडेटेड डॅमेजीस करिता रिटेंन्शनच्या रकमेपैकी ५० टक्के रक्कम वजा केली.

५) महावितरण कंपनीला आर्थिक वर्ष २०१३-१४ चा वीज दर अंतिमत: मंजूर करण्यात येईल तोपर्यंत, आयोगाने महानिर्मिती कंपनीला महावितरण कंपनीच्या आदेशात मंजूर केलेला स्थिर खर्च आणि ऊर्जा आकार वसूल करण्यास परवानगी दिली. महावितरण कंपनी, महानिर्मिती कंपनीने महावितरण कंपनीला देयकात आकारलेल्या ऊर्जा आकारांच्या घटकातील तफावत ग्राहकांकडून इंधन समायोजन खर्चाच्या माध्यमातून आणि स्थिर आकारांच्या घटकामधील तफावत ग्राहंकाकडून संबंधित ग्राहक वर्गवारीच्या सरासरी आकारणी दराच्या प्रमाणात वसूल करु शकेल.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने (आर-इन्फ्रा निर्मिती) त्यांच्या वीज निर्मिती व्यवसायाकरिता आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील वार्षिक महसुली गरज आणि वीज दर निश्चीतीकरणासाठी दाखल केलेली याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्रमांक १)**

आर-इन्फ्रा निर्मितीने त्यांच्या निर्मिती व्यवसायाकरिता ३१ डिसेंबर २०१२ रोजी याचिका दाखल केली. आयोगाने तांत्रिक वैधता बैठकीनंतर आणि याचिका दाखल करून घेतल्यांनंतर, ५ एप्रिल २०१३ रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली. आयोगाने आपल्या १३ जून २०१३ च्या आदेशात, कामगिरीचे मापदंड व्यवसाय आराखड्याच्या आदेशानुसार आणि बहु-वर्षीय वीज दर विनिमयानुसार मंजूर केले. आयोगाने एफजीडी संयंत्रांकरिता अतिरिक्त सहाय्यकारी वीज वापर देखील विचारात घेतला. एप्रिल-नोव्हेंबर २०१२ या कालावधीतील कोळशाच्या किंमती आणि कोळशाची कॅलरीफीक व्हॅल्यू (जी सी वी) विचारात घेतली. आयोगाने आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता मंजुरी दिलेल्या वार्षिक स्थिर आकार आणि ऊर्जा आकारांबाबतीची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे:-

| तपशील | आ.व. २०१३-२०१४ | आ.व. २०१४-२०१५ | आ.व. २०१५-२०१६ |
|---|---|---|---|
| वार्षिक स्थिर आकार (रुपये कोटीत) | २१७.६६ | २८८.०१ | ३११.९७ |

| तपशील | युनिट | आ.व.२०१३-२०१४ | आ.व.२०१४-२०१५ | आ.व. २०१५-२०१६ |
|---|---|---|---|---|
| इंधनाचा एकूण खर्च | रुपये कोटीत | १,०९२.०२ | १,११२.६५ | १,१३७.३० |
| नक्त निर्मिती | दशलक्ष युनिट | ३,७८७.६० | ३,७८७.६० | ३,७९८.१३ |
| ऊर्जा आकार | रुपये प्रति युनिट | २.८८ | २.९४ | २.९९ |

**जयगड पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडने (जे पी टी एल) आर्थिक वर्ष २०११-१२ करिता एकूण महसुली गरजेच्या अचूक समायोजनासाठी आणि दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरिता एकूण महसुली गरजेच्या मंजुरीसाठी दाखल केलेली याचिका (सन २०१३ प्रकरण क्र. २७)**

जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेडने १८ फेब्रुवारी २०१३ रोजी त्यांची याचिका दाखल केली. तांत्रिक वैधता बैठकीनंतर आणि याचिका दाखल करुन घेण्यात आल्यानंतर, ३० मे २०१३ रोजी जाहिर सुनावणी आयोजित करण्यात आली. आयोगाने आपल्या १६ ऑगस्ट, २०१३ च्या आदेशान्वये आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता खालीलप्रमाणे एकूण महसुली गरज मंजूर केली :-

| तपशील | मंजूर रक्कम (रुपये कोटीत) | | | |
|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१२-२०१३ | आर्थिक वर्ष २०१३-२०१४ | आर्थिक वर्ष २०१४-२०१५ | आर्थिक वर्ष २०१५-२०१६ |
| एकूण पारेषण यंत्रणा आकारांच्या आदेशांतर्गत पारेषण आकार वसूलीसाठी विचारात घेतलेली नक्त वार्षिक एकूण महसूली गरज | ११२.८६ | १२३.७५ | १०१.९४ | ९८.८५ |

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने त्यांच्या पारेषण व्यवसाया (आर इन्फ्रा-टी)करिता दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरिता एकूण महसुली गरजेच्या मंजुरीसाठी दाखल केलेली याचिका (सन २०१२ प्रकरण क्र. १४१)**

आर इन्फ्राने २८ डिसेंबर २०१२ रोजी याचिका सादर केली. तांत्रिक वैधता बैठकीनंतर आणि याचिका दाखल करुन घेण्यात आल्यानंतर, या प्रकरणी जाहीर सुणावणी ५ एप्रिल २०१३ रोजी आयोजित करण्यात आली. आयोगाने दि. १३ जून २०१३ आदेशान्वये आर इन्फ्रा-टी ला दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरीता खालीलप्रमाणे वार्षिक महसूली गरज मंजूर केली

(रु. कोटीत )

| तपशील | आरइन्फ्रा-टी | | | | मंजूर रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष १३ | आर्थिक वर्ष १४ | आर्थिक वर्ष १५ | आर्थिक वर्ष १६ | आर्थिक वर्ष १३ | आर्थिक वर्ष १४ | आर्थिक वर्ष १५ | आर्थिक वर्ष १६ |
| पारेषण दरामधून वसूल करावयाची एकूण महसुली गरज | - | ४५२.३० | ३५४.५२ | ४४४.४१ | - | ४११.५२ | ३१८.२३ | ३९९.७५ |

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने त्यांच्या पारेषण व्यवसायाकरिता (आर इन्फ्रा-टी) आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ या कालावधीकरिता अचूक समायोजनासाठी दाखल केलेली याचिका (सन २०१२ प्रकरण क्र. १२३)**

आर इन्फ्राने त्यांची याचिका १ नोव्हेंबर २०१२ रोजी सादर केली. आयोगाने तांत्रिक वैधता बैठकीनंतर याचिका दाखल करुन घेतली व जाहीर सुनावणी २० फेब्रुवारी २०१३ रोजी आयोजित केली. आयोगाने दि.२ एप्रिल २०१३ च्या आदेशाने अचूक समायोजनास खालीलप्रमाणे मंजुरी दिली.

(रु. कोटीत )

| अ. क्र. | तपशील | आ.व.२०१०-११ | आ.व. २०११-१२ |
|---|---|---|---|
| १ | पारेषण दरामधून एकूण महसूली गरज | ९१.४६ | १३०.१६ |
| २ | एकूण महसूल | ८०.९६ | ९१.११ |
| ३ | महसूल तूट (शिल्लक) | १०.५० | ३९.०५ |

**दि टाटा पावर कंपनी लिमिटेड कंपनीने त्यांच्या निर्मिती व्यवसायाकरिता (टी पी सी-जी) आर्थिक वर्ष २०११-१२ करिता एकूण महसुली गरज आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता वीज दर मंजुरीसाठी दाखल केलेली याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. १७७)**

टीपीसी ने वीज दराच्या मंजुरीसाठी २२ ऑक्टोबर २०१२ रोजी याचिका सादर केली. त्यानंतर सुधारित याचिका सादर केली. याचिका दाखल करुन घेण्यात आल्यानंतर, १८ फेब्रूवारी २०१३ रोजी जाहिर सुनावणी आयोजित करण्यात आली. आर्थिक वर्ष २०११-१२ करीता महसुली तूट रु. ६९.४३ कोटी निश्चित करण्यात आली. आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीज दराच्या आदेशावर टीपीसीने केलेल्या अपिलावर, विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालपत्राचा विचार करुन आयोगाने रु. २३०.२२ कोटीची वसुली करण्यास परवानगी दिली.

खालीलप्रमाणे प्रति युनिट ऊर्जा आकार मंजूर करण्यात आले:-

| संच | इंधन | आव २०१२-१३ | आव २०१३-१४ | आव २०१४-१५ | आव २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| संच क्र. ४ | तेल | १३.९८ | १४.०१ | १४.०४ | १४.०६ |
| संच क्र. ५ | वायू | २.६६ | २.६७ | २.६५ | २.६५ |
| | तेल | १३.७२ | १३.७६ | १३.६७ | १३.७१ |
| | कोळसा | ३.९१ | ३.९२ | ३.९० | ३.९१ |
| संच क्र. ६ | तेल आणि वायू | १०.५४ | १०.५६ | १०.५९ | - |
| | कोळसा | - | - | - | ३.७८ |
| संच क्र. ७ | वायू | २.०१ | २.०१ | २.०१ | २.०२ |
| | आर एल एन जी | ६.१८ | ६.१९ | ६.२० | ६.२१ |
| संच क्र. ८ | कोळसा | ३.८५ | ३.८५ | ३.८५ | ३.८५ |

खालीलप्रमाणे वार्षिक स्थिर आकार मंजूर करण्यात आले:-

(रुपये कोटीत)

| संच | आव २०१२-१३ | आव २०१३-१४ | आव २०१४-१५ | आव २०१५-१६ |
|---|---|---|---|---|
| संच क्र. ४ | १०.६१ | १२.२५ | १८.१३ | ९.२३ |
| संच क्र. ५ | ३५७.९० | ३६४.२५ | ४०१.४४ | ३८६.८० |
| संच क्र. ६ | २४२.२१ | २८३.५२ | ३३८.९९ | ४१४.१३ |
| संच क्र. ७ | १६१.९१ | १६०.१९ | १७२.८८ | १७०.०० |
| संच क्र. ८ | २६३.२४ | २६९.६९ | २८१.१७ | २८३.२५ |

टीपीसी ला असे निर्देश देण्यात आले, की त्यांनी दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील भांडवली खर्चासाठी लागणारा निधी उभारण्यासाठी वित्तीय संस्था किंवा अंतर्गत स्त्रोत निश्चित करुन ठेवावेत आणि उर्वरित आवश्यक असलेल्या इंधन पुरवठ्यासाठी जर करार केले नसतील तर त्यांनी असे करार करुन ठेवावेत.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता त्यांच्या व्यवसाय आराखड्यास मंजुरीसाठी सादर केलेली याचिका (सन २०१२ चे प्रकरण क्र. १३४)**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी) ची याचिका २७ नोव्हेंबर, २०१२ रोजी दाखल करुन घेण्यात आली व १० मे, २०१३ रोजी या प्रकरणी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने आपल्या २६ ऑगस्ट, २०१३ च्या आदेशाने, महावितरण कंपनीच्या व्यवसाय आराखड्यास मंजूरी देताना, महावितरण कंपनीला दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता बहु-वर्षीय वीज दराची याचिका सादर करताना खालील बाबींची पूर्तता करण्याचे निर्देश दिले:-

अ) प्रत्यक्ष भागविलेली मागणी अणि अनिर्बंधित मागणी या दोन्ही मागण्या विचारात घेऊन, मागणीचे अंदाज तयार करावेत व त्यानुसार, आपली वीज खरेदीची योजना आणि अंदाजित विक्रीची माहिती तयार करावी.

ब) थकबाकीच्या वसुलीच्या संदर्भात देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करावे आणि तिमाही अहवाल आयोगास सादर करावा.

क) वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चाच्या परताव्याबाबतचा तपशील सादर करावा.

ड) वेगवेगळ्या स्रोतांकडून अंदाजित वीज खरेदीचे प्रमाण आणि खर्च यासंबंधीची अद्ययावत माहिती विचारात घ्यावी.

ई) मत्तांच्या शिल्लक उपयोगिता कालावधीसंबधी जर बहु-विध वीज दराच्या विनियमांमध्ये उल्लेख केलेला नसेल तर, महावितरण कंपनी यासंबधीचा विचार घसाऱ्याची परिगणना करण्यासाठी कंपनी अधिनियमानुसार करील.

फ) कर्ज-निहाय अपेक्षित परतफेडीची माहिती सादर करावी.

ग) यापूर्वी कामातून बाद केलेल्या मत्तांचा तपशील आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीत कामातून बाद करावयाच्या मत्तांचा तपशील सादर करावा.

ह) मागील अनुभवाच्या आधारे चोरी करण्यात आलेल्या विजेच्या वसूलीची अंदाजित माहिती सादर करावी.

य) सन २०१२ च्या प्रकरण क्र. १३८ मधील २१ फेब्रुवारी २०१३ च्या आदेशाने मंजुर केलेला क्रॉस-सबसिडी अधिभार (सीएसएस) विचारात घेऊन, क्रॉस-सबसिडी अधिभार आणि मुक्त प्रवेश आकारांपासूनच्या उत्पन्नाची परिगणना करावी.

**आयोगाने मान्यता दिलेली नक्त एकूण महसूली गरज खालीलप्रमाणे आहे:-**

(रुपये कोटीत)

| तपशील | आ व २०१३-१४ | आ व २०१४-१५ | आ व २०१५-१६ |
|---|---|---|---|
| नक्त एकूण महसूली गरज | ५७,८३९ | ७०,८९८ | ८२,२१८ |

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडची आर्थिक वर्ष २०१०-११ साठी अंतिम समायोजन, आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ची एकूण महसुली गरज, आर्थिक वर्ष २०१२-१३ वीज दर निश्चित करण्यासाठी आणि आकारांच्या अनुसूचीत सुधारणा करण्यासाठी याचिका (सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ मधील पुरवणी आदेश )**

आयोगाने, सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ मधील दिनांक १६ ऑगस्ट २०१२ च्या आदेशाने, मा. विद्युत अपील न्यायाधिकारणाने २०१०च्या काही प्रकरणात दिलेले निर्देश आणि वीज दराच्या कार्यवाहीत प्राप्त झालेल्या सूचना विचारात घेऊन, "सार्वजनिक सेवा" नावाची एक वेगळी वीज दराची वर्गवारी निर्माण केली. त्यानंतर, ओशो इंटरनॅशनल फाउंडेशन आणि निओ सन्यास फाउंडेशन यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकांवर त्यांचा "सार्वजनिक सेवा" वर्गवारीत समावेश करण्यात यावा, असे मा. मुंबई उच्च न्यायालयाने निर्देश दिले. त्याप्रमाणे, आयोगाने आपल्या २२ मे २०१३ च्या पुरवणी आदेशाने "उच्च दाब-९: सार्वजनिक सेवा वर्गवारी" च्या व्याप्ती मध्ये सुधारणा करुन "सेवाधिष्ठीत असलेल्या धार्मिक संस्थांचा" समावेश केला.

**महावितरण कंपनीची टीओडी रिबेट मार्च २०१३ नंतर लागू राहू देण्यासाठी याचिका (सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ मधील सन २०१२ च्या प्रकरण क्र. १०७ मधील संकीर्ण अर्ज क्र. सन २०१३ चा ४२ )**

सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ मधील मूळ वीज दराच्या आदेशाच्या सन २०१२ च्या प्रकरण क्र. १०७ मधील पुनर्विलोकनाच्या वेळी मंजूर केलेला टीओडी रिबेट मार्च २०१३ नंतर पुढे चालु राहू देण्यास मुदत वाढ देण्यात यावी, अशी महावितरण कंपनीने संकीर्ण अर्जात विनंती केली. कोणत्याही देयक चक्रासाठी टीओडी रिबेट करिता टप्पा-निहाय माहिती ४५ दिवसांच्या कालावधीनंतर उपलब्ध होते, ही बाब विचारात घेऊन, ज्या ग्राहक वर्गवारींना टीओडी रिबेट लागू आहे त्यांच्याकरिता, आयोगाने आपल्या २ एप्रिल, २०१३ च्या आदेशाने, प्रति युनिट १०० पैसे पासून प्रति युनिट २५० पैसे वाढीव टीओडी रिबेट सप्टेंबर, २०१३ पर्यंत वाढवून दिला. महावितरण कंपनीला जानेवारी ते जून २०१३ या कालावधीपासून सुधारित टीओडी रिबेटनुसार खर्च लाभ विश्लेषण अहवाल दर सहा महिन्यांनी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**महावितरण कंपनीची टीओडी रिबेट सप्टेंबर २०१३ नंतर वाढवून देण्यासाठी याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. १०६ )**

आयोगाने आपल्या दि. ७ ऑक्टोबर, २०१३ च्या आदेशाने टीओडी रिबेटची व्याप्ती १ ऑक्टोबर, २०१३ पासून पुढील वीज दराच्या आदेशापर्यंत वाढवून दिली. खर्च लाभ विश्लेषण अहवालाच्या संबंधी महावितरण कंपनीला त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारित प्राथमिक अहवाल ४५ दिवसांच्या आत सादर करण्याचे आणि सविस्तर खर्च लाभ विश्लेषण अहवाल पुढील वीज दराच्या याचिकेत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**आर-इन्फ्राच्या वितरण व्यवसायाची आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ करिता अंतिम अचूक समायोजनासाठी याचिका (२०१२ चे प्रकरण क्र. १२४)**

आर-इन्फ्राने त्यांची याचिका ९ नोव्हेंबर, २०१२ रोजी सादर केली. सदर याचिका १८ जानेवारी, २०१३ रोजी दाखल करून घेण्यात आली आणि जाहीर सुनावणी २० फेब्रुवारी, २०१३ रोजी घेण्यात आली. अंतिम अचूक समायोजनेस ४ एप्रिल, २०१३ च्या आदेशाने मंजुरी देण्यात आली.

आयोगाने सन २०११ च्या प्रकरण क्र. १८० मध्ये रु.२४५१.९५ कोटी ऐवजी रु.१७९५.३७ कोटीची महसुली तूट मंजुर केली होती. त्यामुळे, रु.६५६.५८ कोटीच्या अतिरिक्त महसूली तुटीचा विचार करण्यात आला. वीज दर विनियम २००५ अंतर्गत, आर्थिक वर्ष २०११-१२ हे आर-इन्फ्राकरिता वीज दर निश्चितीकरणसाठी शेवटचे वर्ष होते. आयोगाने नमूद केले की, आयोग रु. २४५१.९५ कोटीची महसूली तूट आयोग नवीन बहू-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या अंतंगत वीज दर निश्चित करताना विचारात घेईल. आयोगाने इंटरनेट आणि ईसीएस प्रदानांवर देण्यात आलेली सूट (डिस्काउंट) महसूली तुटीतून वळती करण्याचा विचार केला नाही कारण आयोगाने दिलेल्या नकाराविरुध्द आर-इन्फ्राने अपील केले होते. आर्थिक वर्ष २०१०-११ करिता अंतिम अचूक समायोजन केल्यानंतर एकूण महसुली गरज रु. ४,२०२.२७ कोटी आहे. खालील अंतिम अचूक समायोजनास मंजूरी देण्यात आली :-

(रुपये कोटीत)

| तपशील | सूत्र | सन २०११ च्या प्रकरण क्र. १८० मधील मंजुरी | आर-इन्फ्रा ची अंदाजित महसूली तूट | आयोगाने मंजूर केलेली महसूली तूट |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्ष २००९-१०पर्यंतची एकूण महसूली तूट (सन २०११ चे प्रकरण क्र. १८०) | अ | १,५०३.९६ | १,५०३.९६ | १,५०३.९६ |
| आर्थिक वर्ष २०१०-११ मधील महसूली तूट | ब | ४३६.७३ | ५५१.४७ | ५२९.१३ |
| आर्थिक वर्ष २०११-१२ ची एकूण महसूली तूट | क=ड+ ई | १४५.०३ | ६०५.८४ | ४१८.८६ |
| आर-इन्फ्रा कडून अतिरिक्त भर | ड=ड१+ड२+ड३ | - | ९४.२ | ७५.६९ |
| आर्थिक वर्ष २०११-१२ मधील महसूली तूट / (शिल्लक) | इ | -१४५.३२ | ५११.६४ | ३४३.१७ |
| एकूण महसूली तूट | फ=अ+ब+क | १,७९५.३७ | २,६६१.२६ | २,४५१.९५ |

**बेस्ट उपक्रमाची आर्थिक वर्ष २०१०-११ आणि २०११-१२ करिता एकूण महसूली गरजेच्या अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता बहु-वर्षीय वीज दर निश्चितीकरणासाठी याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. २६)**

बेस्ट उपक्रमाने त्यांच्या ३१ डिसेंबर २००९ रोजी सादर केलेल्या याचिकेत (१) आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन, (२) आर्थिक वर्ष २००९-१० मधील वार्षिक कामगिरीचा आढावा आणि (३) आर्थिक वर्ष २०१०-११ च्या एकूण महसूली गरज आणि वीज दरास मंजुरी मागीतली होती. आयोगाने सदर याचिका २ मे २०१३ रोजी दाखल करून घेतली आणि १४ जून २०१३ रोजी जाहीर सुनावणी घेतली. आयोगाने आपल्या २८ ऑगस्ट २०१३ च्या आदेशाने खालील प्रमाणे आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ करिता एकूण महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधी करिता बहु-वर्षीय वीज दरास मंजुरी दिली.

| तपशील | आ व २०१३-१४ | आ व २०१४-१५ | आ व २०१५-१६ |
|---|---|---|---|
| विक्री (दशलक्ष युनीट) | ४७५८.३७ | ५२१६.१६ | ५७३४.६६ |
| विद्यमान वीज दराने मिळणारा महसुल (रू कोटीत) | ४३५६.५३ | ५२४७.९६ | ६३१५.२३ |
| वीज दरातून वसूल करावयाची महसुली तूट (रु कोटीत) | ३८७.६८ | ४५१.८६ | ५३१.९१ |
| वीज दर निश्चितीकरणासाठी पुरवठयाचा सरासरी खर्च (रु./ युनिट) | ९.९७ | १०.९३ | ११.९४ |

सदर आदेश सप्टेंबर, २०१३ ते मार्च २०१६ पर्यंत अमलात राहील. बेस्ट उपक्रमाला मध्यावधी कामगिरीच्या आढाव्यासाठी याचिका नोव्हेंबर, २०१४ पर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**टीपीसी च्या - वितरण व्यवसायाची आर्थिक वर्ष २०११-१२ करिता एकूण महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधी करिता बहू-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. १७९)**

टीपीसीची याचिका २१ जानेवारी, २०१३ रोजी दाखल करून घेण्यात आली आणि जाहीर सुनावणी १८ फेब्रुवारी, २०१३ रोजी घेण्यात आली. आयोगाने आपल्या २८ जून, २०१३ च्या आदेशाने खालीलप्रमाणे एकूण महसुली गरज आणि बहू-वर्षीय वीज दरास मान्यता दिली.

| तपशील | आव २०१२-१३ | आव २०१३-१४ | आव २०१४-१५ | आव २०१५-१६ |
|---|---|---|---|---|
| नियामक मत्तांच्या वसुलीसह एकूण वार्षिक महसूली गरज (रु. कोटीत) | ४२४२.२३ | ५०६९.०६ | ५३७८.२२ | ५७१४.९९ |
| विक्रि (दशलक्ष यूनिट्स) | ६५९२.५९ | ६९७४.०९ | ७६१०.९८ | ८३०५.६२ |
| विद्यमान वीज दराने मिळणारा महसूल (रु. कोटीत). | ३८५६.५६ | ३९५१.८० | ४८१२.९५ | ५८६४.५९ |
| वीज दरातून वसूल करावयाची महसूली तूट (रु. कोटीत) | | ४८०.०९ | ५९३.८७ | ६९०.९८ |
| वीज दर निश्चितीकरणासाठी पुरवठयाचा सरासरी खर्च (रु./ युनिट) | | ६.३५ | ७.१० | ७.८९ |

आयोगाने टीपीसीला मध्यावधी कामगिरीच्या आढाव्यासाठी याचिका नोव्हेंबर, २०१४ पर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले.

**आर-इन्फ्राच्या वितरण व्यवसायाची दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता (आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६) एकूण महसूली गरज आणि बहु-वर्षीय वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. ९)**

आर-इन्फ्रा ची याचिका २२ फेब्रुवारी २०१३ रोजी दाखल करुन घेण्यात आली आणि जाहीर सुणावणी ६ एप्रिल, २०१३ रोजी घेण्यात आली. आयोगाने आपल्या २२ सप्टेंबर २०१३ च्या आदेशाने आर्थिक वर्ष २०१२ -१३, आर्थिक वर्ष २०१३ -१४, आर्थिक वर्ष २०१४ -१५, आणि आर्थिक वर्ष २०१५ -१६ करिता अनुक्रमे रु. ४८९७ कोटी ,रु. ४५४८ कोटी, रु. ३७८१ कोटी आणि रु. ४४११ कोटी नक्त एकूण महसुली गरज (नियामक मत्तांच्या वसुलीचा परिणाम वगळून) मंजूर केली. या रकमा आर-इन्फ्राने मागील ३ वर्षाकरिता अंदाजित केलेल्या रकमांपेक्षा कमी होत्या. नियामक मत्तांची आर्थिक वर्ष २०१३ -१४, आर्थिक वर्ष २०१४ -१५, आर्थिक वर्ष २०१५ -१६ करिता अनुक्रमे प्रतिवर्षी वसुली रु. ९२४.८२ कोटी देखील मंजूर करण्यात आली.

आयोगाने, आर-इन्फ्राने आर्थिक वर्ष २०१३-१४ करिता मागिलेल्या सरासरी १२ टक्क्यांच्या वाढीऐवजी (नियामक मत्ता आकांरासह) वीज दरात सरासरी ०.१८ टक्के वाढ मंजूर केली व आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता सरासरी वीज दरात मागितलेल्या अनुक्रमे ६ टक्के आणि २४ टक्के वाढीऐवजी आयोगाने सरासरी वीज दरात अनुक्रमे १२ टक्के आणि ११ टक्के कपात केली.

**महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडची आर्थिक वर्ष २०१३ -१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता व्यवसाय आराखड्यास मंजुरीसाठी याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. १२८)**

महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड, एक पारेषण परवानाधारक, यांनी त्यांची याचिका २३ सप्टेंबर २०१३, रोजी सादर केली. आयोगाने २५ नोव्हेंबर २०१३, रोजी सुधारित याचिका दाखल करुन घेतली आणि १९ डिसेंबर २०१३, जाहीर सुनावणी आयोजित केली. आयोगाने आपल्या १५ जानेवारी २०१४ च्या आदेशाने व्यवसाय आराखड्यातील अंदाजांना एकूण महसुली गरजेसह खालीलप्रमाणे मंजुरी दिली.

| तपशील | आर्थिक वर्ष २०१३-१४ | आर्थिक वर्ष २०१४-१५ | आर्थिक वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|
| मंजूर एकूण महसुली गरज (रु. कोटीत) | ४५.४५ | ८१४.२५ | १०७६.१८ |

**महापारेषण कंपनीची आर्थिक वर्ष २०११-१२ करिता अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता वार्षिक कामगिरीचा आढावा, आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१४-१५ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता एकूण महसुली गरजेस मंजुरीसाठी याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. ३९)**

तांत्रिक वैधता बैठक झाल्यानंतर महापारेषण कंपनीने, त्यांची सुधारीत याचिका १५ जुलै, २०१३ रोजी सादर केली. सदर याचिका दाखल करुन घेण्यात आली आणि आयोगाने २९ ऑक्टोबर, २०१३ रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली. आयोगाने आपल्या १३ फेब्रुवारी, २०१४ च्या आदेशाने खालीलप्रमाणे

अचूक समायोजन आणि एकूण महसुली गरजेस मंजुरी दिली.

(रु. कोटीत)

| तपशील | अचूक समायोजन | वार्षिक कामगिरीचा आढावा | एकूण महसुली गरज | | |
|---|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्ष | आव २०११-१२ | आव २०१२-१३ | आव २०१३-१४ | आव २०१४-१५ | आव २०१५-१६ |
| पारेषण दरातून मिळणारी एकूण महसुली गरज | २५०२.८६ | ३३४५.९८ | ४२००.५५ | ४८८३.३७ | ५५३५.९५ |

**महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे आर्थिक वर्ष २०१४-१५ करिता कामकाज खर्चाचे अंदाजपत्रक (सन २०१३ चे प्रकरण क्र. १७८)**

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने (एमएसएलडीसी) आर्थिक वर्ष २०१४-१५ करिता कामकाज खर्चाचे अंदाजपत्रक, आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता अचूक समायोजन, आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ करिता वार्षिक कामगिरीचा आढावा, यांच्या मंजुरीसाठी याचिका २६ नोव्हेंबर, २०१३ रोजी दाखल केली. तांत्रिक वैधता बैठक झाल्यानंतर, एमएसएलडीसीने सुधारित याचिका १५ जानेवारी, २०१४ रोजी सादर केली. सदर याचिका दाखल करुन घेण्यात आली आणि जाहीर सुनावणी २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी घेण्यात आली. आयोगाने आपल्या ७ मार्च, २०१४ च्या आदेशाने खालीलप्रमाणे मंजुरी दिली:-

(रु. लाखात)

| तपशील | आयोगाने मंजूर केलेली रक्कम | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अचूक समायोजन आव २०१२-१३ | तात्पुरते अचूक समायोजन आव २०१३-१४ | एमएसएलडीसी चे आर्थिक वर्ष २०१४-१५ करिता अंदाजपत्रक | | |
| | | | मंजूर एसएलडीसी अंदाजपत्रक | अचूक समायोजन | मंजूर महसूल |
| कामकाज खर्च | २,१४०.६५ | २,४६६.१३ | ३,०१६.८० | (६१०.०८) | २,४०६.७२ |
| भांडवली खर्च | २२८.६१ | ७५८.६३ | १,०७६.१७ | (२१७.६३) | ८५८.५४ |
| एकूण एसएलडीसी अंदाजपत्रक | २,३६९.२६ | ३,२२४.७६ | ४,०९२.९७ | (८२७.७२) | ३,२६५.२५ |

**आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ करिता, मासिक कामकाज आकारांची आणि अर्ध-वार्षिक शुल्काची वसुली खालीलप्रमाणे करण्यास मंजुरी दिली:-**

| तपशील | मासिक कामकाज आकार (रु. लाख/ महिना) | अर्ध-वार्षिक एमएसडीसीएल चे शुल्क (रु. लाख/ अर्ध-वार्षिक) |
|---|---|---|
| महावितरण | १६३.९१ | ३५०.८२ |
| टीपीसी | १४.१४ | ३०.२६ |
| आर-इन्फ्रा | १२.५३ | २६.८२ |
| बेस्ट | ९.९९ | २१.३७ |
| **एकूण** | **२००.५६** | **४२९.२७** |

महाराष्ट्रातील राज्य भार प्रेषण केंद्राचे विविध शुल्क व आकार जसे की, नोंदणी/जोडणी शुल्क, शेड्यूलिंग आकार, पुनर्शेड्युलिंग आकार आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेश प्राक्रिया शुल्क हे सर्वसाधारणपणे अन्य राज्यांप्रमाणेच आहेत, याची आयोगाने नोंद घेतली. हे आकार, व्यवहारांच्या संख्येत झालेली वाढ आणि त्यामुळे परिणामी एसएलडीसीवर येऊन पडणारा भार, या पार्श्वभूमीवर आणि हे आकार सन २००५ पूर्वी निश्चित करण्यात आले होते आणि त्यात विद्यमान खर्च प्रतिबिंबित होण्याची गरज आहे. आयोगाने एप्रिल २०१४ पासून नोंदणी/ जोडणी शुल्क, आणि पुनर्शेडयूलिंग आकार यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा केली:-

| अ. क्र. | तपशील | विद्यमान आकार (रु.) | आयोगाने मान्यता दिलेले आकार (रु.) |
|---|---|---|---|
| १ | नोंदणी/ जोडणी आकार | (प्रति अर्ज) १०००० | (प्रति अर्ज) २०००० |
| २ | शेड्युलिंग आकार | (प्रति दिवस) १००० | (प्रति दिवस) ३००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पुनर्शेड्युलिंग आकार | (प्रति सूधारणा) ३००० | (प्रति सूधारणा) ३००० |
| ४ | अल्प-कालीन मुक्त प्रवेश अर्ज प्रक्रिया शुल्क | (प्रति अर्ज) ५००० | (प्रति अर्ज) ७५०० |

आयोगाने महावितरणला, महापारेषण कंपनीकडे गिरीश प्रधान समितीने केलेल्या शिफारशींनुसार कर्मचाऱ्यांकरिता प्रोत्साहन योजना कार्यान्वित करण्यासाठी पाठपुरावा करणे; आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रस्तावित केलेल्या रु. १ कोटीपेक्षा जास्त असलेल्या योजनांकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे; आर्थिक वर्ष २०१३-१४ करिता बिगर सविस्तर प्रकल्प अहवालांच्या योजनांकरिता खर्च लाभ विश्लेषण अहवाल सादर करणे आणि मंजूर अंदाजपत्रकाच्या मर्यादेत योजनांच्या अंमलबजावणीच्या शक्यतेचा आणि योजनांची अंमलबजावणी वेळीच होईल याची खात्री करण्यासाठी स्वीकारलेल्या प्रक्रियांचा आढावा घेणे आणि नियामकविषयक बाबी हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांची सक्षमता वाढविणे; या बाबींचा पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले.

**महानिर्मिती कंपनीची आर्थिक वर्ष २०११-१२ करिता अंतिम अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता बहु-वर्षीय वीज दरास मंजुरीसाठी याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. ५४)**

या प्रकरणी जाहीर सुनावणीनंतर आयोगाने निर्गमित केलेल्या ३ मार्च २०१४च्या आदेशातील महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:-

**आर्थिक वर्ष २०११-१२ करिता अचूक समायोजन**

काही निर्मिती केंद्रांची प्रत्यक्ष उपलब्धता आदेशामध्ये मंजूर केलेल्या निकषांपेक्षा कमी होती. अशा केंद्रांकरिता, आयोगाने आर्थिक वर्ष २०११-१२ करिता वार्षिक स्थिर आकारांची वसूली (एएफसी) यथाप्रमाण तत्वावर कमी केली. आर्थिक वर्ष २०११-१२ करिता एकूण तूट रु. ७५९.४७ कोटीला मान्यता देण्यात आली.

**आर्थिक वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ करिता बहु-वर्षीय वीज दर**

आयोगाने आर्थिक वर्ष २०१३-१४ करिता दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी वाढीशिवायच्या इंधन किंमती विचारात घेतल्या कारण बहू-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ मध्ये इंधन अधिभार समायोजन पध्दतीखाली इंधन किंमतींमधील तफावतीसाठी समायोजन करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

**नव्याने सूरु होणाऱ्या संचांकरिता तात्पूरता वीज दर**

आयोगाने व्यवसाय आराखडयाच्या आदेशात मंजूर केलेल्या प्रमाणकानुसार कामगिरीच्या मापदंडांवर आधारित तात्पुरत्या ऊर्जा आकारांची परिगणना केली. नियंत्रण कालावधीतील कामकाजाच्या पहिल्या वर्षी संबंधित संचाकरिता इंधनाच्या पोहचवणुकीसह किंमती नव्याने सुरु होणाऱ्या संचाकरिता विचारात घेण्यात आल्या. अशा संचांकरिता स्थिर आकारांच्या ८० टक्के इतका तात्पुरता वार्षिक स्थिर आकार (एएफसी) मंजूर करण्यात आला.

औष्णिक केंद्रांकरिता खालील वार्षिक स्थिर आकार मंजूर करण्यात आले:-

(रु. कोटीत)

| केंद्रांचे नाव | आव २०१३-१४ | आव २०१४-१५ | आव २०१५-१६ |
|---|---|---|---|
| **विद्यमान केंद्रे** | | | |
| भुसावळ | २०२.०८ | २००.९७ | २२७.४३ |
| चंद्रपूर | ७६५.४१ | ७६१.५६ | ८३०.७५ |
| खापरखेडा | ४४०.९७ | ४२३.२० | ४४०.०८ |
| कोराडी | २९२.१५ | २८४.७५ | ३७३.६२ |
| नाशिक | ३१०.७४ | ३०७.९४ | ३३२.९९ |
| परळी | २५०.९९ | २४६.३१ | २६८.२० |
| उरण | १५४.४२ | १४८.११ | १५३.३६ |
| **नवीन केंद्रे** | | | |
| पारस संच क्र. ३ आणि संच क्र. ४ करिता एकत्रित | ७२३.६२ | ५५२.९१ | ५४५.७९ |
| परळी संच क्र. ६ आणि संच क्र. ७ करिता एकत्रित | ९३०.७३ | ५५५.६२ | ५४५.८१ |
| खापरखेडा संच क्र. ५ | ६८८.४६ | ६८१.३० | ६६९.६९ |

**औष्णिक केंद्रांकरिता खालील ऊर्जा आकार (रुपये/ युनिट) मंजूर करण्यात आले:-**

| केंद्राचे नाव | आ व २०१३-१४ | आ व २०१४-१५ | आ व २०१५-१६ |
|---|---|---|---|
| **विद्यमान केंद्रे** | | | |
| भुसावळ | २.४५ | २.४३ | २.४१ |
| चंद्रपूर | १.८० | १.७९ | १.७९ |
| खापरखेडा | २.१३ | २.१४ | २.१४ |
| कोराडी | ३.२७ | ३.२४ | ३.१७ |
| नाशिक | ३.५० | ३.४९ | ३.४९ |
| परळी | २.७१ | २.७२ | २.७५ |
| उरण | २.२५ | २.२६ | २.२६ |
| **नवीन केंद्रे** | | | |
| पारस संच क्र. ३ आणि संच क्र. ४ करिता | १.७० | १.७० | १.७० |
| परळी संच क्र.६ आणि संच क्र. ७ करिता | २.२० | २.२० | २.२१ |
| खापरखेडा संच क्र. ५ | २.०६ | २.०६ | २.०६ |

आयोगाने आता मंजूर केलेल्या वीज दरानुसार महसुलामधील वसुलीयोग्य फरक १२ मासिक हप्त्यांत वसूल/समायोजन करण्यास महानिर्मिती कंपनीला परवानगी दिली. महानिर्मिती कंपनीला मध्यावधी कामगिरीच्या आढाव्याकरिता याचिका ३० नोव्हेंबर, २०१४ पर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

निर्मिती खर्चातील तफावत ही शेवटी ग्राहकांकडून वसूल करावयाची असल्यामुळे, महानिर्मिती कंपनीने महावितरण कंपनीला पाठविलेल्या देयकाच्या रकमेतील ऊर्जा आकारांच्या भागातील तफावत महावितरण कंपनी ग्राहकांकडून वसूल किंवा इंधन समायोजन आकारांच्या पध्दतीच्या माध्यमातून समायोजन करील आणि स्थिर आकारांचा भाग संबंधित ग्राहक वर्गवारीला लागू असलेल्या सरासरी आकारणी दराच्या यथा-प्रमाणात ग्राहकाकडून वसूल करील.

**महावितरण कंपनीची आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता अंतिम अचूक समायोजनासाठी याचिका (सन २०१४ च्या प्रकरण क्र. ३८ मधील अंतरिम आदेश)**

महावितरण कंपनीने, आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता अंतिम अचूक समायोजनासाठी, विलंबित भत्त्यांवरील अनुषंगिक खर्चास, समायोजित रकमेच्या अनुषंगिक खर्चासह अतिरिक्त ऊर्जा आकारांच्या वसूलीस, आणि समायोजित रकमेवर आधारित क्रॉस-सबसिडी अधिभार निश्चित करण्यासाठी, त्यांची याचिका २७ जानेवारी, २०१४ रोजी सादर केली. महावितरण कंपनीने ६ फेब्रुवारी २०१४ रोजी सादर केलेल्या सुधारित याचिकेत, अंतरिम आर्थिक दिलासा देण्याची देखील मागणी केली.

सबसिडी देणाऱ्या ग्राहकांच्या वर्गवारीमध्ये मिश्र वीज विक्रीतील असाधारण बदलामुळे महावितरण कंपनीला असामान्य आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्यामुळे, आयोगाने आपल्या ३ मार्च, २०१४ च्या आदेशाने महावितरण कंपनीला रुपये ५,०२२ कोटीचा अंतरिम दिलासा मंजूर केला, ज्यामध्ये आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ करिता प्रस्तावित अचूक समायोजनेवर आधारित महसूली तूट आणि अनुषांगिक खर्चांचा समावेश होता. या रकमेची वसुली अंतरिम आकार म्हणून १२ महिने करण्यात येईल आणि त्याची अंमलबजावणी मार्च २०१४ च्या ऊर्जा देयकापासून करण्यात येईल. आयोग या याचिकेत अंतिम निकाल देण्यासाठी सर्व सूचना आणि हरकती विचारात घेईल व महावितरण कंपनीने सादर केलेल्या निवेदनांच्या सविस्तर तपासणीसह महावितरण कंपनीने कळविलेल्या महसूली तूटीची, ज्यामुळे अंतरिम आर्थिक दिलासा देण्यात आला, फेर तपासणी करील.

## नूतनशील ऊर्जा

**आर-इन्फ्रा लिमिटेडने नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या संबंधात नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीच्या विनियम २०१० चे पालन आणि अंमलबजावणीसाठी दाखल केलेली याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. ८४)**

आर-इन्फ्रा लिमिटेडने, बिगर-सौर ऊर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता करण्यासाठी अतिरिक्त सौर-ऊर्जा खरेदी करण्यास परवानगी देण्याकरिता नूतनशील ऊर्जा

खरेदी बंधनाच्या विनियम २०१० मधील विनियम ७ लागू करण्याची अट शिथील करण्यासाठी, २७ जून, २०१३ रोजी याचिका दाखल केली. आयोगाने असे मत व्यक्त केले की, नूतनशील उर्जा खरेदी करण्याच्या बंधनाची पूर्तता करण्यासाठी यापूर्वी सौर–ऊर्जा आणि बिगर–सौर ऊर्जा यांच्यात एकमेकात आंतरबदल करण्यास, आर–इन्फ्राने सन २०१२ च्या प्रकरण क्र. १०९ मध्ये अशाच प्रकारच्या केलेल्या याचिकेत, आयोगाने सहमती व्यक्त केलेली नसल्याने, आयोगाने सध्याची याचिका ६ ऑगस्ट २०१३ च्या आदेशाने खारीज केली.

**सौर ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाची एकत्रित पूर्तता आर्थिक वर्ष २०१५–१६ पर्यंत करण्याबाबत टीपीसी ने दाखल केलेली याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. १५९)**

टीपीसीने, सौर ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाची एकत्रित पूर्तता आर्थिक वर्ष २०१५–१६ पर्यंत करण्याबाबत २३ ऑक्टोबर, २०१३ रोजी याचिका सादर केली. आयोगाने आपल्या दिनांक २० डिसेंबर २०१३ च्या आदेशात, नूतनशील ऊर्जा खरेदीच्या विनियमातील सौर ऊर्जा खरेदीचे विनिर्दिष्ट केलेले लक्ष्यांक आर्थिक वर्ष २०१०–११ ते आर्थिक वर्ष २०१२–१३ करिता शिथिल केले आणि टीपीसीला निर्देश दिले की, त्यांनी आर्थिक वर्ष २०१५–१६ पर्यंत सौर ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाची एकत्रित पूर्तता करावी.

**बेस्ट उपक्रम आणि वेलस्पन एनर्जी महाराष्ट्र प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात २० मेवॉ सौर वीज खरेदी करारास मान्यतेसाठी याचिका (सन २०१३चे प्रकरण क्र. ९२)**

बेस्टने याचिका २९ जूलै, २०१३ रोजी सादर केली. आयोगाने, नूतनशील ऊर्जा प्रकल्पाकरिता वीज दर विनियम २०१० विचारात घेऊन, सन २०१३च्या प्रकरण क्र.६ मध्ये, दिनांक २२ मार्च, २०१३ च्या आदेशाने, सुरु करण्यात यावयाच्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पाकरिता किंवा ज्यांनी आर्थिक वर्ष २०१३–१४ मध्ये वीज खरेदी करार केलेला आहे त्यांच्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पाकरिता, सामान्य वीज दर निश्चित केला. अशा सौर पीव्ही प्रकल्पांकरिता लेव्हलाइज्ड वीज दर २५ वर्षांसाठी रुपये ८.९८ प्रति युनिट इतका निश्चित करण्यात आला.

आयोगाने असे मत नोंदवले की, बेस्ट आणि वेलस्पन एनर्जी महाराष्ट्र प्रायव्हेट लिमिटेड यांच्यातील दीर्घ–कालीन वीज खरेदी करारातील वीज दर रु ८.५६ प्रति युनिट होता जो, आयोगाने मान्यता दिलेल्या दरापेक्षा कमी होता. तरी देखील, बेस्टच्या बहू–वर्षीय वीज दराच्या आदेशात हाच दर विचारात घेण्यात आला. त्यामुळे आयोगाने आपल्या २९ ऑक्टोबर, २०१३च्या आदेशाने २५ वर्षांसाठीच्या वीज खरेदी करारात त्याच दरास तत्त्वत: मंजुरी दिली.

## वीज खरेदी करार

**महानिर्मिती कंपनी आणि महावितरण कंपनी यांच्यातील १ एप्रिल, २००९ मधील वीज खरेदी करारतील पुरवणी क्र. २ ला मंजुरी (सन २०१३ चे प्रकरण क्र. ७८)**

महानिर्मिती कंपनीच्या विद्यमान निर्मिती केंद्रांकरिता, महानिर्मिती कंपनी आणि महावितरण कंपनी यांनी १ एप्रिल, २००९ रोजी वीज खरेदी करार केला होता. आयोगाने, सन २०१० च्या प्रकरण क्र. १०३ मध्ये, महानिर्मिती कंपनीला असे निर्देश दिले की त्यांनी उभारण्यात येणाऱ्या नवीन संचांकरिता, (म्हणजेच परळी संच क्र. ७ आणि पारस संच क्र. ४) विद्यमान वीज खरेदी करारामध्ये एक पुरवणी तयार करावी आणि महानिर्मिती कंपनीच्या २६ पैकी १२ प्रकल्पांचा समावेश विद्यमान वीज खरेदी करारामध्ये करण्यास मंजुरी दिली. त्यानंतरच्या पुढील आढावा याचिकेमध्ये, आयोगाने आपल्या सन २०११ च्या प्रकरण क्र. ७१ मधील ३० नोव्हेंबर, २००११ च्या आदेशाने, विद्यमान वीज खरेदी करारामध्ये आणखी ३ प्रकल्पांचा समावेश करण्यास मंजुरी दिली.

पारस संच क्र. ५ हा (६६० मेगावॅट) ५० टक्के जमीन प्रत्यक्ष ताब्यात असण्याची अट पूर्ण करु शकत नसल्यामुळे, या संचाचा समावेश करण्यास वरील दोन्हीपैकी कोणत्याही आदेशात मंजुरी न देण्यात आल्यामुळे, त्याचा समावेश करण्यात आला नाही. महावितरण कंपनीने विद्युत अपील न्यायाधिकरणापूढे केलेल्या अपिलात सादर केले की, त्यांनी पारस संच क्र. ५ ची क्षमता ६६० मेगावॅट पासून २५० मेगावॅट इतकी कमी करण्याचे ठरविले आहे आणि विद्युत अपील न्यायाधिकरणाने महानिर्मिती कंपनीला त्याप्रमाणे आयोगाकडे जाण्यास परवानगी दिली.

या पार्श्वभूमीवर, महानिर्मिती कंपनी आणि महापारेषण कंपनीने त्यांच्या विद्यमान वीज खरेदी करारात पुरवणी क्र. २ मधील पारस युनिट क्र. ५ ची क्षमता ६६० मेगावॅट पासून २५० मेगावॅट इतकी कमी करण्यास आणि नाशिक संच क्र. १ आणि २ वगळण्यास मंजुरी मागितली. याप्रकरणी कामकाज चालू असताना, त्यांनी दोंडाइचा वीज प्रकल्पाची (५×६६० मेवॉ) भर घातली. प्रस्तावित संचांनी/केंद्रानी लागू असलेल्या निकषांची पूर्तता केली असल्यामुळे आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने नाशिक संच निवृत्त करण्यास मंजुरी दिली असल्यामुळे, आयोगाने आपल्या २९ ऑक्टोबर, २०१३ च्या आदेशाने पुरवणीस मंजुरी दिली.

**बोली प्रक्रियेच्या प्रकरण १ टप्पा-१ अंर्तगत वीज खरेदी करण्यासाठी वीज दर स्वीकारण्याकरिता महावितरण कंपनीची याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. २४)**

महावितरण कंपनीने स्पर्धात्मक बोली मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकरण क्र. १ च्या मार्गाने वीज खरेदी करण्यासाठी स्पर्धात्मक बोली प्रक्रियेचा अवलंब केला. अर्हता दस्तावेजांसाठी विनंती सन २००६ मध्ये निर्गमित करण्यात आली आणि सन २००८ मध्ये आर्थिक प्रस्तावांचे मूल्यांकन करण्यात आले. महावितरण कंपनीने अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड (एपीएमएल) आणि लॅन्को महानदी पॉवर लिमिटेड यांच्याशी सन २००८ मध्ये वीज खरेदी करार केला. महावितरण कंपनीने अशा रितीने काढण्यात आलेला वीज दर स्वीकारण्यासाठी विद्यमान याचिका दाखल केली होती.

आयोगाने प्रस्तावित वीज दर स्वीकारताना, आपल्या १९ ऑगस्ट, २०१३ च्या आदेशात असे मत व्यक्त केले की, महावितरण कंपनीने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ मधील तरतुदींची आणि स्पर्धात्मक बोली मार्गदर्शक सूचनांची पूर्तता केली असून अशा रितीने काढण्यात आलेला वीज दर हा बाजारपेठेतील दरांनुसार आहे. महावितरण कंपनीने सन २००५ च्या प्रकरण क्र. २२ मधील दिनांक १७ ऑक्टोबर, २००६ च्या आदेशाने आयोगाची मंजुरी घेऊन दीर्घ-कालीन विजेची मागणी भागविण्यासाठी स्पर्धात्मक बोली प्रक्रिया सूरू केली होती. आयोगाने वीज खरेदी करावयाच्या प्रमाणास यथोचितपणे मान्यता दिली होती. आयोगाच्या सन २००८ च्या प्रकरण क्र. ५४ मधील निर्देशांनुसार वीज खरेदी करारात सुधारणा करण्यात आल्या असल्याची नोंद घेतली. आयोगाने त्यानुसार खालीलप्रमाणे मंजुरी दिली:-

| बोलीदार | वीज खरेदीचे परिमाण (मेवॉ) | लेव्हलाइज्ड वीज दर (रु. प्रति युनीट) |
|---|---|---|
| अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड | १३२० | २.६४२ |
| लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लिमिटेड<br>(पूर्वीची लॅन्को महानदी पॉवर प्रायव्हेट लिमिटेड) | ६८० | २.७०० |

**एपीएमएलने महावितरण कंपनी बरोबरच्या वादावर अभिनिर्णय देण्यासाठी आणि वीज खरेदी करार १६ फेब्रुवारी २०११ रोजी समाप्त करण्यात आल्यामूळे कामगिरीची हमी परत करण्याबाबत दाखल केलेली याचिका (सन २०१२ चे प्रकरण क्र. ६८ आणि २०१२ चा संकीर्ण अर्ज क्र. ४)**

एपीएमएलने त्यांची याचिका १६ जुलै,२०१२ रोजी सादर केली. आयोग अशा निर्णयाप्रत आला की, प्रकरण १ च्या मार्गाच्या बोली प्रक्रियेवर आधारित, दिनांक ८ सप्टेंबर, २००८ च्या महावितरण आणि एपीएमएल यांच्यामधील वीज खरेदी करारानुसार इंधनासाठी वा आवश्यक व्यवस्था करण्याची जबाबदारी एपीएमएलची आहे. आयोगाने पक्षकारांना वीज खरेदी करारातील अटींनुसार अतिरिक्त हमीसह कामगिरीच्या हमीची व्यवस्था पूर्ववत करण्याचे निर्देश दिले. आयोगाने याबाबत आपला निर्णय देताना असे नमूद केले की, या प्रकरणात समाविष्ट असलेल्या प्रश्नांबाबत जसे की, करारांचे पावित्र्य, विद्युत अधिनियम २००३ चे कलम ६३ आणि २५ वर्षाचा दीर्घ-मुदतीचा करार कार्यान्वित करताना त्यामधून उद्भवणाऱ्या समस्यांची आयोगाला पूर्णपणे जाणीव आहे. परंतु त्याच वेळी ग्राहक आणि वीज निर्माता दोघांच्या हिताच्या दृष्टिकोनातून विश्वासार्ह वीज पुरवठा, अडकून पडलेल्या मत्ता आणि कार्यरत नसणारे लेखे निर्माण होऊ न देणे आणि विद्युत क्षेत्रात गूंतवणुकदारांचा विश्वास वाढविणे आवश्यक आहे.

एपीएमएलला असे निर्देश देण्यात आले की त्यांनी, वाणीज्यिक कामकाजास सुरूवात झालेल्या दिनांकापासून, कोळसा खरेदीच्या ठिकाणापासून ते कोळश्याच्या बंकर्सपर्यंत, कोळश्याचे सविस्तर हिशोब ठेवावेत, आणि कोळशाचा हिशोब ठेवण्यासाठी त्यांनी अवलंब केलेल्या प्रक्रियेचा सविस्तर तपशील सादर करावा आणि त्यांच्या तिरोडा येथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संच २ आणि ३ करिता इंधन पुरवठा व्यवस्था पूर्ववत करण्यासाठी कोळसा मंत्रालय आणि अन्य संस्थांबरोबर प्रयत्न पुढेही चालू ठेवावेत.

## पारेषण

**आर-इन्फ्राच्या पारेषण यंत्रणेतून पारेषण आउटलेट्स करिता टीपीसीची (वितरण व्यवसाय) याचिका (सन २०१२ चे प्रकरण क्र. १२०)**

टीपीसीने त्यांची याचिका १९ डिसेंबर, २०१२ रोजी सादर केली आणि त्यात नमूद केले की, त्यांनी राज्य ग्रिड संहितेनूसार आर-इन्फ्राच्या २२० केव्ही रिसिव्हिंग उप-केंद्रातून ३३ केव्ही पातळीवर १६ पारेषण आउटलेट्स मिळण्याकरिता राज्य पारेषण कंपनीकडे अर्ज केला आहे. राज्य पारेषण कंपनीने सदर अर्ज आर-इन्फ्राकडे पाठविला असता, विद्यमान रिसिव्हिंग केंद्रामध्ये असे आउटलेट्स उपलब्ध नसण्याच्या कारणास्तव, आर-इन्फ्राने असे आउटलेट्स देण्यास नकार दिला.

या प्रकरणी तिसऱ्या सुनावणीच्या वेळी, राज्य पारेषण कंपनीला आयआयटी/व्हीजेटीआय यांच्याकडील विद्युत अभियांत्रिकी शाखेचा प्राध्यापक अध्यक्ष

म्हणून, आणि आर-इन्फ्रा, टीपीसी, एसएलडीसी आणि मविनिआ यांच्या कार्यालयातील तांत्रिक प्रतिनिधींची एक समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. ही समिती आउटलेट्सची उपलब्धता आणि पर्याय सुचविणार होती. समितीने आपला १३ मे, २०१३ रोजी सादर केला.

सदर समितीचा अहवाल विचारात घेऊन आयोगाने २३ ऑगस्ट, २०१३ रोजी पारित केलेल्या आदेशात असे नमूद केले की, आर-इन्फ्राच्या २२० केव्ही आरे, गोरेगाव, साकी आणि घोडबंदर उप-केंद्रांतून १०, ३३ केव्ही आउटलेट्स, टीपीसीला ग्राहकांकडून वाढती विजेची मागणी भागविण्यासाठी, पुरविता येणे शक्य आहे.. त्याशिवाय यंत्रणेची वाढती गरज भागविण्यासाठी, सर्व परवानाधारकांनी मुंबई पारेषण यंत्रणा बळकट करण्याचे काम त्वरेने पूर्ण करणे आवश्यक आहे. या परवानाधारकांनी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा आणि जाळ्याचा आणखी विकास करण्यासाठी राज्य पारेषण कंपनीने दिलेले निर्देश अनुसरणे आवश्यक आहे.

**अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने (एपीटीसीएल)ने त्यांच्या परवानाप्राप्त व्यवसायाच्या मत्तांवर कर्जाचा बोजा चढविण्यासाठी मान्यता देण्याकरिता सादर केलेली याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. १३२)**

एपीटीसीएलने त्यांची याचिका २७ सप्टेंबर, २०१३ रोजी सादर केली. आयोगाने आपल्या १९ डिसेंबर, २०१३ च्या आदेशात असे नमूद केले की पारेषण प्रकल्पात भांडवली गुंतवणूक खूप मोठ्या प्रमाणावर करावी लागते व त्यासाठी प्रचंड प्रमाणात कर्ज उभारावे लागते. त्यामुळे, परवानाधारकाला प्रकल्पाच्या मत्ता, दस्ताऐवज आणि मंजुऱ्या यांच्यावर तारण निर्माण करता आले पाहिजे. आयोगाने या प्रकरणी एपीएमएलला कर्जदाराच्या नावे प्रकल्पाच्या मत्ता गहाण ठेवून कर्जदाराच्या नावे गहाणखत तयार करण्यासाठी एपीएमएलला तत्त्वत: मंजुरी दिली. तथापि, आयोगाच्या मान्यतेशिवाय, परवाना कर्जदाराच्या किंवा त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीच्या नावे अभिहास्तांकित करता येणार नाही किंवा प्रकल्प हा विक्री, भाडे किंवा विनिमय तत्त्वावर किंवा अन्यथा हस्तांतरित करता येणार नाही.

## अन्य निवडक आदेश

**टीपीसी आणि आर-इन्फ्रा यांच्या वितरण व्यवसायाच्या सन २०११ च्या प्रकरण क्र. १५१ मधील त्रैमासिक प्रगती अहवालाचा आयोगाने स्वत:हून घेतलेला आढावा (सन २०१३ चे प्रकरण क्र. ८५)**

सन २०११ च्या प्रकरण क्र. १५१ मधील आयोगाच्या दिनांक २२ ऑगस्ट, २०१२ च्या आदेशाचा मुख्य हेतू, ज्यामुळे, इतर बाबीं शिवाय, मुंबईच्या काही भागात वितरणातील स्पर्धेशी संबंधित काही समस्या सोडविण्यात आल्या आहेत, खालीलप्रमाणे आहे:-

अ) आर-इन्फ्राकडून चेंजओव्हर आणि स्विचओव्हर झालेल्या ग्राहकांपैकी टीपीसीने जास्त वापर असलेल्या मोठ्या ग्राहकांची निवड करण्याची समस्या सोडवणे

ब) निवडलेल्या ११ समुहांमधील अगदी खालच्या ग्राहकांच्या सर्वात खालच्या वर्गवारीला टीपीसीच्या कमी वीज दराचा लाभ एका वर्षाच्या आत, टीपीसीचे थेट ग्राहक म्हणून, मिळेल याची खात्री करणे

क) ज्या २० समुहांमधील टीपीसीने त्यांचे जाळे उभारण्याचे काम केंद्रीत करणे आवश्यक होते त्यापैकी आयोगाने निवडलेल्या ११ समुहांमधील टीपीसीचे वितरण जाळे त्वरेने उभे करणे

सन २०१३ च्या प्रकरण क्र. ८५ मधील आयोगाचे आदेशाचे पालन अगदी काही थोड्या प्रमाणात किंवा अजिबात नाही अशा रितीने झाले असल्याचे (टीपीसी आणि आर-इन्फ्रा यांनी सादर केलेल्या त्रैमासिक अहवालांवरुन आणि अन्य माहितीवरुन) सूचित झाल्यामूळे आयोगाला या प्रकरणी हस्तक्षेप करुन स्वत:हून पुढाकार घेऊन कार्यवाही सुरु करणे आवश्यक झाले.

आयोगाने स्वत:हून पूढाकार घेऊन काढलेल्या दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३ च्या आदेशात नमूद केले की, निवडक ११ समुहातील विजेचा कमी वापर असणाऱ्या ग्राहकांना विजेचा पुरवठा टीपीसीकडून पुरेशा प्रमाणात करण्यात येत नसल्यामुळे त्यांना टीपीसीच्या वितरण जाळ्याला जोडलेल्या अन्य ग्राहकांप्रमाणे स्वस्त विजेचा लाभ घेता येत नाही. अशा रितीने टीपीसीला, जरी मुद्दाम नसले तरी, आयोगाच्या सन २०११ च्या प्रकरण क्र. १५१ मधील निर्देशांचे पालन करण्यात अपयश आले आणि त्यांनी पालन करु शकत नसल्याचे आयोगाला कळविले नाही. आयोगाने खालीलप्रमाणे निर्देश दिले:-

अ) वीज दराच्या प्रयोजनासाठी, निवड केलेल्या ११ समुहांमधील ०-३०० युनिट्सचा वापर असणाऱ्या निवासी ग्राहक वर्गवारीतील सर्व ग्राहकांना, ते टीपीसीचे थेट ग्राहक असल्याप्रमाणे, वागणूक देण्यात येईल.

ब) नोव्हेंबर, २०१३ पासून, टीपीसी अशा ग्राहकांना, आयोगाने टीपीसीच्या थेट ग्राहकांकरिता मान्यता दिलेला वीज दर लावेल; ज्यामध्ये स्थिर/मागणी आकार, ऊर्जा आकार आणि वहन आकार यांचा समावेश असेल, वहन आकारांमूळे टीपीसीला मिळणारी अंदाजित अतिरिक्त सूचक रोख रक्कम खालील तक्त्यात दाखविण्यात आली आहे:-

| तपशील | ११ समुहांमधील विक्री (दशलक्ष युनिट्स) | | वहन आकार (रुपये प्रति युनिट) | | एकूण रक्कम (रु. कोटीत) | |
|---|---|---|---|---|---|---|
| लघुदाब-१ निवासी | आ व २०१४ | आ व २०१५ | आ व २०१४ | आ व २०१५ | आ व २०१४ | आ व २०१५ |
| ०-१०० | ७३२ | ७४६ | १.८७ | २.०८ | १३७ | १५५ |
| १०१-३०० | ५३५ | ५१८ | १.८७ | २.०८ | १०० | १०८ |
| **एकूण (वार्षिक)** | **१२६८** | **१२६४** | | | **२३७** | **२६३** |
| **एकूण (मासिक)** | | | | | **१९.७६** | **२१.९१** |

या रकमा सूचक असून देयक तयार करताना प्रत्यक्ष ग्राहकांची संख्या आणि त्यांनी केलेला वापर याचा ताळमेळ टीपीसी आणि आर-इन्फ्रा यांच्यामध्ये करण्यात येईल व त्याआधारे देयक तयार करण्यात येईल.

क) हे ग्राहक टीपीसीचे थेट ग्राहक म्हणून मानण्यात येणार असल्यामुळे, टीपीसी त्यांची मागणी भागवण्यासाठी वीज खरेदी करील आणि अशी खरेदी केलेली वीज आणि आर-इन्फ्राला उचित व्होल्टेज पातळीवर वहनामुळे होणारी विजेची हानी मिळून होणारी एकूण वीज टीपीसी ग्रिडमध्ये अंत:क्षेपित करील.

ड) हे ग्राहक आर-इन्फ्राला जोडलेले असल्यामुळे, टीपीसी, आर-इन्फ्राच्या वायर्सचा वापर केल्यामुळे प्रति युनिट तत्त्वावर वहन आकार आणि नियामक मत्ता आकार अदा करील. टीपीसीने आर-इन्फ्राला यासंबंधात अदा करावयाची सूचक रक्कम खालील तक्त्यात दाखविण्यात आली आहे:-

| तपशील | ११ समुहांमधील विक्री (दशलक्ष युनिटस) | | वहन आकार (रुपये प्रति युनिट) | | नियामक मत्ता आकार (रुपये प्रति युनिट) | | एकूण रक्कम (रु. कोटीत) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लघूदाब-१ निवासी | आ व २०१४ | आ व २०१५ | आ व २०१४ | आ व २०१५ | आ व २०१४ | आ व २०१५ | आ व २०१४ | आ व २०१५ |
| ०-१०० | ७३२ | ७४६ | १.२२ | १.२४ | ०.४८ | ०.५७ | १२५ | १३५ |
| १०१-३०० | ५३५ | ५१८ | १.२२ | १.२४ | ०.८४ | ०.७४ | ११० | १०३ |
| **एकूण (वार्षिक)** | **१२६८** | **१२६४** | | | | | **२३५** | **२३८** |
| **एकूण (मासिक)** | | | | | | | **१९.५७** | **१९.८०** |

या रकमा सूचक असल्यामुळे देयक तयार करताना प्रत्यक्ष ग्राहकांची संख्या आणि त्यांनी केलेला वापर याचा ताळमेळ दोन परवानाधारकात करण्यात येईल व त्याआधारे देयक तयार करण्यात येईल.

ई) आर-इन्फ्राच्या वितरण जाळ्याचा वापर करण्यात येत असल्यामूळे, आर-इन्फ्रा वीज पुरवठ्याची सेवा पुरविण्यासाठी जबाबदार राहील व त्यासाठी आर-इन्फ्राला प्रति युनिट तत्वावर वीज पुरवठा सेवा आकार देय राहील आणि त्यांचा अंदाज आदेशामध्ये सूचक तत्त्वावर करण्यात येईल.

फ) या ग्राहकांना आर-इन्फ्रामधून टीपीसीकडे हस्तांतरण करण्यासाठी आवश्यक कागदोपत्री करावयाची कामे ५ समुहांकरिता डिसेंबर, २०१३ व उरलेल्या ६ समुहांकरिता मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण करण्यात येतील. कागदोपत्री करावयाची कामे पूर्ण होईपर्यंत, टीपीसीच्या थेट ग्राहकांकरिता वेगळी मंजुरी दिलेल्या वीज दराच्या आधारे आर-इन्फ्रा त्यांची देयके तयार करील.

ग) ही व्यवस्था, टीपीसी जोपर्यंत निवड केलेल्या ११ समुहांमध्ये स्वत:चे जाळे उभे करीत नाही किंवा या आदेशांत दिलेल्या निर्देशांचे पुनर्विलोकन करण्यात येत नाही तोपर्यंत, चालू राहील.

या सन २००१ च्या क्र. १५१ च्या आदेशातील अन्य सर्व निर्देश यापुढेही अमलात राहतील.

### आर-इन्फ्राने मुक्त प्रवेश ग्राहकांना आकारावयाचा क्रॉस-सबसिडी अधिभार निश्चित करण्यासाठी याचिका (सन २०१३ चे प्रकरण क्र. ३)

आर-इन्फ्राने त्यांची याचिका ७ जानेवारी, २०१३ रोजी दाखल केली. या प्रकरणात गुंतलेले प्रश्न विचारात घेऊन, आयोगाने बेस्ट, टीपीसी आणि राज्य शासनाच्या ऊर्जा, नियोजन आणि वित्त विभागांना प्रतिवादी करण्याचे निर्देश दिले. त्यांची तसेच काही ग्राहक प्रतिनिधींची मते विचारात घेऊन, आयोगाने आपल्या दि. १० मे, २०१३ च्या आदेशाने खालीलप्रमाणे क्रॉस-सबसिडी अधिभार निश्चित केला:-

| ग्राहक वर्गवारी | सरासरी आकारणी दर | भारांकित वीज खरेदीचा सरासरी खर्च | वहन हानि | पारेषण हानि | यंत्रणा हानि | वहन आकार | परिगणना केलेला क्रॉस सबसिडी अधिभार | मंजूर केलेला क्रॉस सबसिडी अधिभार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (रु./ प्रति युनिट) | | % | % | % | (रु./ प्रति युनिट) | (रु./ प्रति युनिट) | (रु./ प्रति युनिट) |
| **उच्चदाब ग्राहक (६६ केव्हीच्या वरील)** | | | | | | | | |
| उद्योग | ८.०६ | ५.४७ | ० | ४.२६ | ४.२६ | ०.०० | २.३६ | २.३६ |
| वाणिज्यिक | ९.०८ | ५.४७ | ० | ४.२६ | ४.२६ | ०.०० | ३.३८ | ३.३८ |
| गट गृह सोसायटी | ५.५७ | ५.४७ | ० | ४.२६ | ४.२६ | ०.०० | ०.१४ | ० |
| तात्पुरता पुरवठा | ११.०० | ५.४७ | ० | ४.२६ | ४.२६ | ०.०० | ५.३० | ५.३० |
| **उच्चदाब ग्राहक (६६ केव्हीच्या खालील)** | | | | | | | | |
| उद्योग | ८.०६ | ५.४७ | १.९४ | ४.२६ | ६.१२ | ०.४६ | १.८० | १.८० |
| वाणिज्यिक | ९.०८ | ५.४७ | १.९४ | ४.२६ | ६.१२ | ०.४६ | २.८२ | २.८२ |
| गट गृह सोसायटी | ५.५७ | ५.४७ | १.९४ | ४.२६ | ६.१२ | ०.४६ | ०.७० | ० |
| तात्पुरता पुरवठा | ११.०० | ५.४७ | १.९४ | ४.२६ | ६.१२ | ०.४६ | ४.७४ | ४.७४ |
| **लघु-दाब ग्राहक** | | | | | | ०.०० | | |
| बिगर घरगुती | | | | | | | | |
| २० किवॉ पर्यंत | ८.६६ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | १.६० | १.६० |
| २० किवॉ पर्यंत टीओडी पर्यंत | ८.५३ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | १.४७ | १.४७ |
| >२०किवॉ आणि ५० किवॉ < | ११.१५ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | ४.०९ | ४.०९ |
| ५० किवॉच्या वरील | ११.६८ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | ४.६३ | ४.६३ |
| **औद्योगिक** | | | | | ०.०० | | | |
| २० किवॉ पेक्षा कमी | ८.०२ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | ०.९७ | ०.९७ |
| **५० किवॉच्या वरील** | ८.०५ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | १.०० | १.०० |
| दारिद्रय रेषेखालील | ०.९० | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | -६.१५ | ०.०० |
| **निवासी** (सिंगल फेज) | | | | | | ०.०० | | |
| ०-१०० युनिट्स | ३.१३ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | -३.९३ | |
| १०१-३०० युनिट्स | ६.१४ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | -०.९१ | |
| ३०१-५०० युनिट्स | ९.५९ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | २.५३ | २.५३ |
| ५०० आणि त्यावरील | ११.०३ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | ३.९७ | ३.९७ |
| **निवासी** (सिंगल फेज) | | | | | ०.०० | | | |
| ०-१०० युनिट्स | ३.१९ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | -३.८७ | ० |
| १०१-३०० युनिट्स | ५.८८ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | -१.१८ | ० |
| ३०१-५०० युनिट्स | ९.५३ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | २.४८ | २.४८ |
| ५०० आणि त्यावरील | १०.८ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | ३.७५ | ३.५७ |
| कृषी | ०.८० | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | -६.२५ | ० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जाहिराती | १८.४६ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | ११.४० | ११.४० |
| रस्त्यावरील दिवे | ८.८९ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | १.८३ | १.८३ |
| तात्पूरता पुरवठा धार्मिक | ५.२१ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | १.८४ | ०.०० |
| तात्पुरता पुरवठा अन्य | १५.९ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | ८.८५ | ८.८५ |
| स्मशान आणि दफन भूमी | ३.८७ | ५.४७ | ९ | ४.२६ | १२.८८ | ०.८८ | ३.१९ | ०.०० |

**महावितरण कंपनीची मुक्त प्रवेश ग्राहकांवर आकारावयाचा क्रॉस-सबसिडी अधिभार पुन: निश्चित करण्यासाठी याचिका (सन २००३ चे प्रकरण क्र. १०७)**

महावितरण कंपनीने १६ सप्टेंबर, २०१३ रोजी दाखल केलेल्या याचिकेत त्यांनी सन २०१२ च्या प्रकरण क्र. १३८ मध्ये मंजूर केलेला क्रॉस सबसिडी अधिभार पुन: निश्चित करण्याची मागणी केली. या बाबतीत त्यांनी आपले म्हणणे मांडताना असे निवेदन केले की, सन २०१३ च्या प्रकरण क्र. २८ आणि ४४ मधील पारित केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी, आयोगाने, सन २०१३ च्या प्रकरण क्र. ९५ मध्ये पारित केलेल्या दि. ५ सप्टेंबर, २०१३ च्या आदेशात, महावितरण कंपनीने वसूल करावयाचे पुरवणी आकार, स्वत:हून निश्चित केले होते, ज्यामुळे सरासरी आकारणी दरात वाढ झाली.

आयोगाने, वरील परिणाम विचारात घेऊन, आपल्या दि. २९ ऑक्टोबर, २०१३ च्या आदेशान्वये क्रॉस सबसिडी अधिभार पुन: निश्चित करुन तो सप्टेंबर, २०१३ ते फेब्रुवारी , २०१४ या कालावधीकरिता लागू केला. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:-

अ) वीज दराच्या धोरणात नमूद केलेल्या सूत्रावर आधारित क्रॉस सबसिडी अधिभाराची परिगणना करण्यासाठी जी पध्दत आयोगाच्या सन २०१० च्या प्रकरण क्र. ४३ मधील ९ सप्टेंबर, २०११ च्या आदेशात अवलंबण्यात आली होती, तीच पध्दत कायम ठेवण्यात आली.

ब) सन २०१३ च्या प्रकरण क्र. ९५ मधील दि. ५ सप्टेंबर, २०१३ च्या आदेशातील तरतुदी नुसार एइसी-१ व एइसी-२ आणि तत्सम भाग टी,सी,एल आणि डी प्रमाणे महानिर्मिती कंपनीने महवितरण कंपनीकडून वसूल करावयाच्या अतिरिक्त रकमेच्या आधारे वर्गवारी-निहाय क्रॉस सबसिडी अधिभाराची परिगणना करण्यात आली आहे.

क) सन २०१० च्या प्रकरण क्र. ४३ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, नुतनशील ऊर्जा स्त्रोतांकडून विजेची खरेदी करणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांना, अन्य ग्राहकांना लागू असलेल्या क्रॉस-सबसिडी अधिभाराच्या २५ टक्के क्रॉस-सबसिडी अधिभार भरावा लागेल.

आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये आयोगास २२६ याचिका प्राप्त झाल्या आणि आयोगाने १७९ आदेश निर्गमित केले. आयोगाने या वर्षभरात निर्गमित केलेल्या आदेशांची यादी सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आली आहे.

# ग्राहक आधार कक्ष आणि ग्राहक गाऱ्हाणे निवारण यंत्रणा

विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(५) आणि ४२(६) आणि संबंधित विनियमांतंर्गत (ज्याची पहिली आवृत्ती, विद्युत अधिनियम २००३ अंमलात आल्यानंतर ६ महिन्यात, डिसेंबर, २००३ मध्ये अधिसूचित करण्यात आली होती) वितरण परवानाधारकांनी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच (सीजीआरएफ), ज्यामध्ये अध्यक्ष आणि दोन सदस्य आहेत, स्थापन केले आहेत. विद्युत लोकपाल यांची नियुक्ति आयोगाने केली आहे. या यंत्रणे अंर्तगत ग्राहकांना त्यांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण न्यायालयात न जाता करुन घेणे शक्य झाले आहे.

## ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

सध्या महाराष्ट्रात १४ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच स्थापन करण्यात आले असून त्यापैकी ११ मंच हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने स्थापन केलेले आहेत आणि उर्वरित मंच अन्य वितरण परवानाधारकांनी स्थापन केले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम २००६ अंर्तगत, सीजीआरएफचा एक सदस्य, जो ग्राहक संस्थाचे प्रतिनिधित्व करतो, आयोगाकडून नामनिर्देशित करण्यात येतो. परवानाधारकाकडून नियुक्त करण्यात यावयाच्या अध्यक्षांचे पात्रता निकष विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत. तिसरा सदस्य परवानाधारकाचे प्रतिनिधित्व करतो.

आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये, बेस्ट, आर-इन्फ्रा आणि महावितरण कंपनीच्या ७ परिमंडलांमधील ग्राहकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सीजीआरएफच्या सदस्यांची मुदत संपली. त्यांची फेर-नियुक्ती करण्यात आली किंवा त्यांच्या ऐवजी नवीन सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. अशीच कार्यवाही महावितरण कंपनीच्या नागपूर (ग्रामीण क्षेत्र) परिमंडल मंचाच्या आणि आर-इन्फ्राच्या मंचाच्या अधक्ष्यांच्या संबंधात करण्यात आली.

आर्थिक वर्ष २०१३-१४ मधील मंचाच्या कामगिरीची थोडक्यात माहिती खालील अ ते ड मधील तक्त्यांमध्ये देण्यात आली आहे:-

**तक्ता अ**

**महावितरण कंपनीच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांनी निवारण केलेली गाऱ्हाणी**

| अ क्र. | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे नाव (परिमंडल) | प्राप्त झालेल्या एकूण गाऱ्हाण्यांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | कार्यवाही योग्य गाऱ्हाण्यांची संख्या | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | २०१३-१४ च्या अखेरीस प्रलंबित गाऱ्हाण्यांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | परवाना धारकाच्या बाजूने निकाल दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | | | | |
| १ | अमरावती | १७९ | ० | १७९ | ६८ | ६९ | १३७ | ४२ | १०१ | ३६ |
| २ | औरंगाबाद | ७० | २ | ६८ | ३८ | २१ | ५९ | ९ | २६ | ३३ |
| ३ | भांडूप | ५० | ६ | ४४ | ३२ | ९ | ४१ | ३ | २३ | १८ |
| ४ | कल्याण | १५७ | १ | १५६ | ६९ | ६० | १२९ | २७ | ७५ | ५४ |
| ५ | कोल्हापूर | १०७ | ० | १०७ | ५० | १६ | ६६ | ४१ | ४२ | २४ |
| ६ | कोकण | ७४ | २१ | ५३ | २२ | २८ | ५० | ३ | ४५ | ५ |
| ७ | लातूर | ४४ | ० | ४४ | १९ | १२ | ३१ | १३ | १८ | १३ |
| ८ | नागपूर(ग्रामीण) | १४६ | ० | १४६ | ११६ | ४ | १२० | २६ | ८९ | ३१ |
| ९ | नागपूर(शहर) | ३२६ | ३ | ३२३ | २७२ | २० | २९२ | ३१ | ९५ | १९७ |
| १० | नाशिक | २२ | ० | २२ | ४८ | ० | ४८ | २७ | २९ | १९ |
| ११ | पुणे | ३१ | ० | ३१ | १५ | १२ | २७ | ४ | १० | १७ |
| | एकूण | १२०६ | ३३ | ११७३ | ७४९ | २५१ | १००० (८७.४५%) | २२६ | ५५३ (६२.५८%) | ४४७ (३७.११%) |

### तक्ता ब
### अन्य परवानाधारकांच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांना प्राप्त झालेली गाऱ्हाणी

| अ क्र. | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे नाव (परिमंडल) | प्राप्त झालेल्या एकूण गाऱ्हाण्यांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | कार्यवाही योग्य गाऱ्हाण्यांची संख्या | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | २०१३-१४ च्या अखेरीस प्रलंबित गाऱ्हाण्यांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | परवाना धारकाच्या बाजूने निकाल दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | | | | |
| १ | आर-इन्फ्रा | १६ | ० | १६ | ८ | ७ | १५ | १ | ७ | ८ |
| २ | टाटा पॉवर कं. | ११ | ० | ११ | ११ | ० | ११ | ० | ३ | ८ |
| ३ | बेस्ट | ४१ | ० | ४१ | २६ | ९ | ३५ | ६ | १८ | १७ |
| | एकूण | १२७४ | ३३ | १२४१ | ७९४ | २६७ | १०६१ (८७.३३%) | १८० | ५८१ (६२.०५%) | ४८० (३७.६६%) |

### तक्ता क
### ग्राहक वर्गवारीनुसार निवारण करण्यात आलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या

| गाऱ्हाण्यांची वर्गवारी / प्रकार | महावितरण | आर-इन्फ्रा | टाटा पॉवर कंपनी | बेस्ट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| निवासी | ४५१ | १० | ९ | १४ | ४८४ |
| वाणिज्यिक | ११२ | ५ | २ | २१ | १४० |
| कृषी | २१३ | ० | ० | ० | २१३ |
| औद्योगिक | २०९ | ० | ० | ० | २०९ |
| अन्य | २४ | ० | ० | ० | २४ |
| एकूण | १००९ | १५ | ११ | ३५ | १०७० |

### तक्ता ड
### विषयानुसार निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या

| गाऱ्हाण्यांची वर्गवारी / प्रकार | महावितरण | आर-इन्फ्रा | टाटा पॉवर कंपनी | बेस्ट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| देयकाशी संबंधित | ५२६ | ५ | ७ | १७ | ५५५ |
| सदोष मीटर | १०१ | ० | १ | १ | १०३ |
| तांत्रिक | २५ | ० | १ | ० | २६ |
| नवीन जोडणी | १९९ | २ | ० | ८ | २०९ |
| पुरवठ्याचा दर्जा | १२ | ० | ० | ० | १२ |
| सेवेशी संबंधित | ५५ | ० | ० | ० | ५५ |
| अन्य | ९१ | ८ | २ | ९ | ११० |
| एकूण | १००९ | १५ | ११ | ३५ | १०७० |

## विद्युत लोकपाल

विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयाची स्थापना २७ डिसेंबर, २००४ रोजी करण्यात आली. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांकडून गाऱ्हाण्यांचे निवारण न झाल्यामुळे बाधित झालेले ग्राहक आता विद्युत लोकपाल यांच्याकडे गाऱ्हाण्याच्या निवारणासाठी जाऊ शकतात. राज्यात मुंबई आणि नागपूर येथे दोन विद्युत लोकपाल कार्यरत आहेत.

### विद्युत लोकपाल (मुंबई)

डॉ. सुरेश जोशी हे विद्युत लोकपाल, मुंबई, म्हणून २० जानेवारी, २०११ ते १९ जानेवारी, २०१४ या कालावधीत कार्यरत होते. त्यानंतर हे पद भरण्यासाठी आयोगाने जाहिराती देऊन अर्ज मागविले व दरम्यानच्या काळात या पदाचा अतिरिक्त कार्यभार विद्युत लोकपाल, नागपूर, यांच्याकडे देण्यात आला.

विद्युत लोकपाल, मुंबई, यांच्या कार्यक्षेत्रात कोकण, पुणे व नाशिक हे महसुली विभाग येतात.

### विद्युत लोकपाल (नागपूर)

न्यायाधीश (सेवानिवृत्त) श्री. के. जे. रोही हे विद्युत लोकपाल, नागपूर, म्हणून १ जुलै २०११ पासून कार्यरत आहेत.

विद्युत लोकपाल, नागपूर, यांच्या कार्यक्षेत्रात अमरावती, औरंगाबाद व नागपूर हे महसुली विभाग येतात.

खालील तक्ता-इ मध्ये विद्युत लोकपाल यांनी आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये हाताळलेल्या अभिवेदनांची संख्या दाखविण्यात आली आहे.

**तक्ता इ**

| अ क्र. | विद्युत लोकपाल | प्राप्त झालेल्या अभिवेदनांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या अभिवेदनांची संख्या | कार्यवाही योग्य अभिवेदनांची संख्या | निवारण केलेल्या अभिवेदनांची संख्या | | निवारण केलेल्या अभिवेदनांची संख्या | २०१३-१४ च्या अखेरीस प्रलंबित अभिवेदनांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिलेल्या निकालांची संख्या | परवाना धारकाच्या बाजूने निकाल दिलेल्या निकालांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | | | | |
| १ | मुंबई | ११६ | २ | ११४ | ६१ | १८ | ७९ | ३५ | ३४ | ४५ |
| २ | नागपूर | १९५ | ० | १९५ | २६ | ११८ | १४४ | ५१ | ७४ | ७० |

## प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी

आयोगाने ग्राहक आधारासंबंधात घेतलेल्या पुढकारांचा एक भाग म्हणून आणि महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील ग्राहक प्रतिनिधींना आयोगाच्या कामकाजात समाविष्ट करुन घेण्याच्या उद्देशाने, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ अंतर्गत ५ संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी आणि १५ व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधींची नियुक्ती केली आहे.

**संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी खालीलप्रमाणे आहेत-**

| | | |
|---|---|---|
| १ | कोकण विभाग | ठाणे बेलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन |
| २ | उत्तर महाराष्ट्र विभाग | महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज व ॲग्रिकल्चर (नाशिक) |
| ३ | पश्चिम महाराष्ट्र विभाग | प्रयास एनर्जी ग्रुप |
| ४ | मराठवाडा विभाग | |
| ५ | विदर्भ विभाग | विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन |
| ६ | बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र | मुंबई ग्राहक पंचायत |

व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधी खालीलप्रमाणे आहेत-

| | व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधीचे नांवे | | व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधीचे नांवे |
|---|---|---|---|
| १ | श्री. व्यंकटेश एम. निर्मल<br>द्वारा: एन.पी.कदम, कृष्णा निवास, हनुमान मंदिराजवळ, दीप नगर, पूर्णा रोड, नांदेड - ४३१ ६०५ | ९ | श्री. अविनाश विनायक प्रभूणे<br>११३, सुवर्णवेध, पांडुरंग गावंडे लेआऊट, राणा प्रताप नगर, नागपूर - ४४० ०२२. |
| २ | श्री. शरदचंद्र प्रकाशचंद्र बाणाईत<br>२०, साहस कॉलनी, दुर्गा मंदिराच्या मागे, प्रताप नगर, नागपूर-४४० ०२२. | १० | श्री. शाम दशरथ पाटील<br>२६, अशोकनगर, जमुनागिरी रोड, धुळे - ४२४ ००१. |
| ३ | श्रीमती अनिता इंद्र ओस्तवाल<br>द्वारा: ओसवाल दवाखाना, डॉक्टर्स कॉलनी, बस स्टॅण्ड जवळ, परभणी - ४३१ ४०१. | ११ | श्री. सुहास आर. खांडेकर<br>श्रीधाम, रहाटे कॉलनी, जेल रोड, नागपूर - ४४० ०२२. |
| ४ | श्री. जगदीश / किरण विष्णूपंत पातूरकर<br>'किरण' टोपेनगर, पवनास्कर लेआऊट, अमरावती - ४४४ ६०२. | १२ | डॉ. रमाकांत डी. पटेल<br>एस. नं.: ४७४/१, प्लॉट नं.: १, प्रताप नगर, महावीर सोसायटी जवळ, मालेगांव, धुळे - ४२४ ००१. |
| ५ | ॲड. सिध्दार्थ बाळकृष्ण वर्मा<br>फ्लॅट नं.: ३, पटवर्धन अपार्टमेंट, पोद्दार हाऊस जवळ, पाटील लेन ३, कॉलेज रोड, नाशिक - ४२२ ००५. | १३ | डॉ. गोरख हरीभाऊ बऱ्हाटे<br>डॉ. भालगट हॉस्पिटलसमोर, जिल्हा बँक कॉलनी, वार्ड नं.७, श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगर - ४१३ ७०९. |
| ६ | श्री. श्रीधर वसंत व्यवहारे<br>१, श्रीराम अपार्टमेंट, महात्मा नगर, त्रिंबक रोड, नाशिक - ४२२ ००७. | १४ | श्री. सुनिल डेव्हिड सोनावणे<br>१३२६, मेरी कॉटेज, श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगर - ४१३ ७०९. |
| ७ | श्री. आशिष सुभाष चंदराणा<br>२१, श्रीकृपा कॉलनी, अकोला रोड, अकोट, जिल्हा-अकोला - ४४४ १०१ | १५ | श्री. एन. पोनरथनम<br>८०, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१. |
| ८ | श्री. हेमंत अरुणचंद्र कपाडीया<br>२५, शांतीनिकेतन, कॉलनी, शनी मंदीर जवळ, औरंगाबाद - ४३१ ००१. | | |

# विद्युत क्षेत्रात क्षमता वृध्दीसाठी पुढाकार

## बाह्य प्रशिक्षण

- आयोगाने वीज नियमनाबाबत एक सहा महिन्यांचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम मुंबई येथील जागतिक व्यापार संस्थेच्या सहकार्याने सुरु केला. या अभ्यासक्रमाच्या ८व्या सत्रात आयोगाने १२ अधिकारी नामनिर्देशित केले होते.
- आयोगाने आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये आपल्या अधिकाऱ्यांना विद्युत बाजारपेठा, वीज-दर तत्त्वज्ञान आणि प्रथा, नूतनशील वीज खरेदीच्या बंधनासंबंधीचे (आरपीओ) विनियम, मुक्त प्रवेश, वीज व्यापार आणि वीज दर इ. संबंधिच्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांना त्यांचे ज्ञान सतत अद्यावत करण्यासाठी पाठविले होते.

## खाते-निहाय परीक्षा

आयोगाने आपल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची खाते-निहाय परीक्षा जुलै आणि ऑगस्ट २०१३ मध्ये आयोजित केली होती. या परीक्षेला ३७ कर्मचारी बसले होते.

# वार्षिक लेखे - एक दृष्टीक्षेप

आयोगास महाराष्ट्र शासनाकडून दरवर्षी रुपये १ लाखांची लाक्षाणिक मदत मिळते. आयोगाच्या कार्यक्रमांवरील आणि कामकाजावरील खर्च हा मुख्यत: वार्षिक परवाना शुल्क, मविनिआ (शुल्क आणि आकार) विनियम, २००४ नुसार याचिकांवरील शुल्क, आणि राष्ट्रीयकृत बँकांकडे ठेवलेल्या मुदत ठेवींवर मिळाणाऱ्या व्याजातून भागविण्यात येतो. आर्थिक वर्ष २०१३-१४ साठीचा आय-व्यय लेखा सोबत परिशिष्ट-२ मध्ये देण्यात आला आहे.

आयोगास मिळणाऱ्या एकूण जमा रकमेत वार्षिक परवाना शुल्काचा वाटा सर्वात मोठा (७७ टक्के) आहे व त्यानंतर मुदत ठेवींवर मिळाणाऱ्या व्याजाचा (१९ टक्के) आहे. आयोगाचा वेतन, कार्यालयीन भाडे, प्रशिक्षण, सल्लागारांचे शुल्क इ. वरील खर्च हा आयोगास मिळणाऱ्या वार्षिक जमा रकमेतून भागविण्यात येतो आणि उरलेली शिल्लक रक्कम मुदत ठेवींमध्ये गुंतविण्यात येते.

आयोगकडून होणाऱ्या खर्चापैकी सर्वात मोठी खर्चाची बाब म्हणजे भाडे, दर व करांवरील खर्च जी (३४ टक्के) जागतिक व्यापार केंद्राला कार्यालयीन जागेच्या भाड्यासाठी देण्यात येते. त्यानंतर येणारी दुसरी मोठी खर्चाची बाब म्हणजे आयोगाला नियामक कार्यासंबंधी मदत व सल्ला देणाऱ्या सल्लागारांना द्याव्या लागणाऱ्या शुल्कावरील खर्चाची आहे (२७ टक्के) व त्यानंतर वेतनावरील खर्चाची बाब (२१ टक्के) येते.

त्याशिवाय, आयोगाच्या विद्युत लोकपाल यांची मुंबई व नागपूर अशी २ कार्यालये आहेत. त्यांचा वेतन आणि अन्य सर्व खर्च हा संपूर्णपणे आयोगाकडून करण्यात येतो आणि तो एकूण खर्चाच्या ८ टक्के इतका येतो.

आयोगाची ३१ मार्च, २०१४ अखेरची मुदत ठेवीमधील एकत्रित गुंतवणूक रु. ९५.३० कोटी आहे.

आर्थिक वर्ष २०१३ मध्ये एकूण जमा रक्कम रु. ४९.७८ कोटी होती व एकूण खर्च रु. १९.३१ कोटी होता. एकूण नक्त शिल्लक रु. ३०.४७ कोटी ही मुदत ठेवींमध्ये गुंतविण्यात आली आहे. प्राप्त झालेली रक्कम व खर्च झालेली रक्कम खालील तक्त्यात टक्केवारीत दाखविण्यात आली आहे.




RUPEE GOES OUT
VEHICLE EXPENSES 1%
OFFICE EXPENDITURE 3%
TOURS & TRAVELING 2%
OTHER EXPENSES 2%
Repairs and Maintenance 1%
ADVERTISEMENT AND PUBLICITY 2%
GRANTS PAID 7%
PROFESSIONAL FEES 27%
SALARY & WAGES 21%
RENT, RATES & TAXES 34%

## परिशिष्ट-१

### सन २०१३-१४ मध्ये आयोगाने पारित केलेले आदेश

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१२ चा १२३ | ०५.११.२०१२ | २५.०२.२०१३ | ०२.०४.२०१३ | आर-इंन्फ्रा-पारेषण कंपनीदने मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ च्या तरतुदी अंतर्गत आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२च्या अचूक समायोजनेसाठी दाखल केलेली याचिका |
| २ | २०१२च्या १०७ आणि २०१२ च्या १९ मधील २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. ४२ | २२.०३.२०१३ | ०१.०४.२०१३ | ०२.०४.२०१३ | महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीने टीओडी रिबेट मार्च २०१३ नंतर देखील लागू ठेवण्यासाठी केलेली याचिका |
| ३ | २०१२ चा १२४ | ०९.११.२०१३ | २०.०२.२०१३ | ०४.०४.२०१३ | आर-इन्फ्रा-वितरण ने आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ च्या अंतिम अचूक समायोजनेसाठी दाखल केलेली याचिका |
| ४ | २०१३ चा ३० | २५.०२.२०१३ | १८.०३.२०१३ | १७.०४.२०१३ | बेस्ट उपक्रमाने मविनिआ (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० मध्ये आर्थिक वर्ष २०१०-११ व आर्थिक वर्ष २०११-१२ या वर्षांकरिता ठरवून दिलल्या नुतनशील ऊर्जा खरेदीच्या लक्षांकाची पूर्तता व पडताळणी करण्याच्या प्रकरणी आयोगाने सन २०१२ च्या प्रकरण क्र. १०० मध्ये दिलेल्या २६ डिसेंबर, २०१२ च्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी बेस्ट उपक्रमाने दाखल केलेली पुनर्विलोकन याचिका |
| ५ | २०१२ चा १३५ | १०.१२.२०१२ | २७.१२.२०१२<br>०३.०३.२०१३ | २६.०४.२०१३ | विद्युत लोकपाल, मुंबई यांनी सन २०१२ च्या अभिवेदन क्र. ७२ मध्ये पारित केलेल्या दि. ३१.१०.२०१२ च्या आदेशाची पूर्तता न केल्याबाबत महावितरण कंपनी विरूध्द विद्युत अधिनियम, २००३ कलम १४२ खाली दाखल करण्यात आलेली तक्रार |
| ६ | २०१३ चा ०७ | आयोग स्वत: | ०१.०४.२०१३ | २६.०४.२०१३ | मे. विजय ऑईल इंडस्ट्रिज, अकोला, यांनी महावितरण कंपनीविरुध्द दाखल केलेल्या सन २०१२ च्या तक्रार क्र. १७ मध्ये, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, अमरावती परिमंडल, यांनी दि. ०४.०८.२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशाची पुर्तता न केल्याप्रकरणी आयोगाने स्वत: सुरु केलेली कार्यवाही |
| ७ | २०१३ चा ३२ | ०१.०३.२०१३ | १२.०३.२०१३ | ३०.०४.२०१३ | महानिर्मिती कंपनीला महावितरण कंपनीने देय असलेल्या अतिरिक्त रकमांची वसूली त्यांच्या ग्राहकांकडून करण्याच्या पध्दतीसंबंधी आणि सन २०१२ च्या प्रकरण क्र. ७७ मधील दि. ०८.०२.२०१३ च्या आदेशाबाबत महावितरण कंपनीने दाखल केलेली याचिका |
| ८ | २०१२ चा ५८ | ०७.०६.२०१२ | ०२.०८.२०१२<br>१३.०८.२०१२<br>०२.११.२०१२ | ०३.०५.२०१३ | याचिकादाराला कोणतीही पूर्वसूचना न देता आणि कोणतीही नुकसानभरपाई न देता याचिकादाराच्या जागेवर अतिउच्च दाब डबल सर्किट ४०० केव्ही विद्युत वाहिन्या टाकण्याबाबत आणि मनोरा क्र. ३२ उभारण्याच्या महापारेषण कंपनीच्या कथित बेकायदेशीर कृत्यांना आव्हान देण्यासाठी, श्री. शिवाजी विठ्ठल सस्ते यांनी विद्युत अधिनियम, २००३, च्या कलम ६७ (४) अंतर्गत दाखल केलेली याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ९ | २०१३ चा ३ | ०८.०१.२०१३ | १५.०१.२०१३<br>०८.०२.२०१३ | १०.०५.२०१३ | आर-इन्फ्रा-वितरण कंपनीने, मुक्त प्रवेश ग्राहकांवर लावावयाचा क्रॉस सबसिडी अधिभार निश्चित करण्यासाठी मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम १३ अंतर्गत, दाखल केलेली याचिका |
| १० | २०१३ चा ५६ | आयोग स्वत: | आयोग स्वत: | १३.०५.२०१३ | राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकरिता आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या बहुवर्षीय वीज दराच्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता पारेषण दर निश्चित करण्यासाठी आयोगाने स्वत: सुरु केलेली कार्यवाही |
| ११ | २०१२ चा ४६ | ११.०५.२०१२ | २२.०६.२०१२<br>०३.०८.२०१२<br>११.०९.२०१२ | १३.०५.२०१३ | मविनिआ (नुतनशील ऊर्जेच्या दर निश्चित करणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मधील विनियम ८ अंतर्गत पहिल्या नियंत्रण कालाधतील तिसऱ्या वर्षाकरिता सामान्य वीज दर निश्चित करण्यासाठी आयोगाने सन २०१२ च्या प्रकरण क्र. १० मध्ये दि. ३० मार्च २०१२ रोजी स्वत:हून पारित केलेल्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी महा को-जनरेशन ग्रीन पॉवर प्रोड्यूसर्स असोसिएशन ने दाखल केलेली याचिका |
| १२ | २०१२ चा ४९ | ०९.०५.२०१३ | २२.०६.२०१२<br>०३.०८.२०१२<br>११.०९.२०१२ | १३.०५.२०१३ | मविनिआ (नुतनशील ऊर्जेच्या दर निश्चित करणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मधील विनियम ८ अंतर्गत पहिल्या नियंत्रण कालाधतील तिसऱ्या वर्षाकरिता सामान्य वीज दर निश्चित करण्यासाठी आयोगाने सन २०१२ च्या प्रकरण क्र. १० मध्ये दि. ३० मार्च २०१२ रोजी स्वत:हून पारित केलेल्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. ने दाखल केलेली याचिका |
| १३ | २०१२ चा ६६ | १२.०७.२०१२ | २२.०६.२०१२<br>०३.०८.२०१२<br>११.०९.२०१२ | १३.०५.२०१३ | महाराष्ट्र राज्यातील अ-खनिज इंधनावर अधारित सह-निर्मिती विद्युत प्रकल्पांच्या वीज दर आणि वीज दराच्या रचनेचे पूर्नविलाकन करण्यासाठी जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाने दाखल केलेली याचिका |
| १४ | २०१३ चा १० | २९.०१.२०१३ | ०८.०२.२०१३ | १४.०५.२०१३ | कोळशावर आधारित निर्मिती प्रकल्पात उभयपक्षी तत्त्वावर मुक्त प्रवेश घेण्यासाठी महावितरण कंपनीकडून दिलासा मिळण्याकरीता मे. बीओसी इंडीया लि. ने दाखल केलेली याचिका |
| १५ | २०१३ चा ४७ | ०३.०४.२०१३ | १६.०५.२०१३ | २२.०५.२०१३ | विलंब भरणा आकार आणि थकबाकीवरील व्याजावर अतिरिक्त विद्युत शुल्क लागू करण्यासंबंधी स्पष्टीकरण/निर्देश मागण्यासाठी याचिका |
| १६ | २०१२ चा १९ (पुरवणी आदेश) | आयोग स्वत: | आयोग स्वत: | २२.०५.२०१३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०१०-११ च्या अंतिम अचूक समायोजनासाठी आर्थिक वर्ष २०११-१२ च्या एकूण महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या वीज दर निश्चितीसाठी आणि अनुसूचीत सुधारणा करण्यासाठी, दाखल केलेली याचिका |
| १७ | २०१३ चा १३ | ०१.०२.२०१३ | ०२.०४.२०१३<br>१७.०४.२०१३ | २२.०५.२०१३ | मे. आदर्श हॅचरिज आणि फार्म प्रा. लि. ने, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण यांनी दि. १९.०३.२०१२ दिलेल्या आदेशाची पूर्तता न केल्या प्रकरणी दाखल केलेली याचिका |
| १८ | २०१३ चा १४ | ०१.०२.२०१३ | ०२.०४.२०१३<br>१७.०४.२०१३ | २२.०५.२०१३ | मे. आयडियल हॅचरिज आणि फार्म प्रा. लि. ने, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण यांनी दि. १९.०३.२०१२ दिलेल्या आदेशाची पूर्तता न केल्या प्रकरणी दाखल केलेली याचिका |
| १९ | २०१३ चा २९ | २५.०५.२०१३ | १८.०५.२०१३<br>०३.०५.२०१३ | २२.०५.२०१३ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण परिमंडल, कल्याण, यांनी दि. १५.१२.२०१२ रोजी परित केलेल्या आदेशाची पूर्तता न केल्याप्रकरणी महावितरण कंपनीविरूध्द विद्युत अधिनियम, २००३, कलम १४२ खाली दाखल करण्यात आलेली याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| २० | २०१३ चा ५० | ०९.०४.२०१३ | १३.०५.२०१३ | २३.०५.२०१३ | सन २०१३ च्या प्रकरण क्र. ४८ मधील सन २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. ७, आणि सन २०१३ च्या प्रकरण क्र. ५० मधील, सन २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. ८ |
| २१ | २०१३ चा ४८ | ०५.०४.२०१३ | १३.०५.२०१३ | २३.०५.२०१३ | सन २०१३ चे प्रकरण क्र. ४८ मधील सन २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. ७, आणि सन २०१३ च्या प्रकरण क्र. ५० मधील, सन २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. ८ |
| २२ | २०१२ चा ११९ | १९.१०.२०१२ | १२.१२.२०१२<br>२८.०१.२०१३<br>२९.०४.२०१३ | २३.०५.२०१३ | मयूरेश इंजिअरिंग प्रा.लि., कोल्हापूर, यांनी महावितरण कंपनी विरुध्द, विद्युत लोकपाल, मुंबई, यांनी दि.२३ ऑगस्ट, २०१२ रोजी पारित केलेल्या आदेशाची पुर्तता न केल्याबाबत, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ अंतर्गत, दाखल केलेली याचिका |
| २३ | २०१३ चा ५६<br>(शुध्दिकरणात्मक आदेश) | आयोग स्वत: | आयोग स्वत: | २३.०५.२०१३ | राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकरीता आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या बहु-वर्षीय वीज दराच्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरीता पारेषण दर निश्चित करण्यासाठी आयोगाने स्वत: सुरु केलेली कार्यवाही |
| २४ | २०१३ चा ४१ | २१.०३.२०१३ | १६.०४.२०१३ | २८.०५.२०१३ | मे. नागरिका एक्स्पोर्टस् लि., यांनी इंडियन एनर्जी एक्स्चेंज मार्फत वीज पुरवठा घेण्याकरीता महावितरण कंपनीने मुक्त प्रवेश घेण्यास परवानगी नाकारल्याबद्दल त्यांच्याकडून दिलासा मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेली याचिका |
| २५ | २०१३ चा ४३ | २२.०३.२०१३ | २९.०४.२०१३ | २८.०५.२०१३ | सन २०१२ च्या प्रकरण क्र.७७ मध्ये आयोगाने दि.०८ फेब्रुवारी २०१३ रोजी पारित केलेल्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि., ने दाखल केलेली याचिका |
| २६ | २०१३ चा २० | १३.०२.२०१३ | ०४.०४.२०१३ | ०५.०६.२०१३ | आर्थिक वर्ष २००४-०५ ते आर्थिक वर्ष २००८-०९ या कालावधीत बेस्टला त्यांच्या वाहतूक व्यवसायातून आलेल्या तुटीचा समावेश आणि ती मान्य करण्याबाबतच्या सन २०१२ च्या प्रकरण क्र. ८० मधील आयोगाच्या दि. २६ डिसेंबर, २०१२ च्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी दाखल करण्यात याचिका |
| २७ | २०१३ चा २१ | १३.०२.२०१३ | ०४.०४.२०१३ | ०५.०६.२०१३ | आर्थिक वर्ष २००४-०५ ते आर्थिक वर्ष २००८-०९ या कालावधीत बेस्टला त्यांच्या वाहतूक व्यवसायातून आलेल्या तूटीचा समावेश आणि ती मान्य करण्याबाबतच्या सन २०१२ च्या प्रकरण क्र.८० मधील आयोगाच्या दि. २६ डिसेंबर, २०१२ च्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी दाखल करण्यात आलेली याचिका |
| २८ | २०१३ चा २२ | १४.०२.२०१३ | ०६.०३.२०१३<br>१६.०४.२०१३ | ०५.०६.२०१३ | बेस्ट उपक्रमाची, "ग्राहकांच्या विनंतीनुसार जोडणी खंडीत करणे" आणि "ग्राहकांच्या विनंतीनुसार सेवा पुरविण्याच्या ठिकाणात बदल करणे" या बाबींची वर्गवारी "संकीर्ण आणि सर्वसाधारण आकारामध्ये" करण्यासाठीच्या "आकारांच्या अनुसूचीला" मंजूरी देण्याबाबत सन २०१२ च्या प्रकरण क्र. ९० मधील दि. २८ डिसेंबर, २०१२ च्या आयोगाच्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी बृन्हमुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमा (बेस्ट) ची याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| २९ | २०१२ चा ३८ | २३.०४.२०१२ | १६.०५.२०१२<br>०४.०७.२०१२<br>०८.०८.२०१२<br>२५.१०.२०१२<br>२७.११.२०१२<br>१०.१२.२०१२<br>०१.०४.२०१३ | ०५.०६.२०१३ | (अ) वीज खरेदी कराराच्या खंड ८.४.१ च्या संदर्भात पत-पत्र उघडणे आणि (ब) वितरण परवानाधारकाने मध्यम कालीन मुक्त प्रवेश घेण्यात प्रतिवादीला आलेल्या हेतुपुरसर अपयशासह दि.०४.०६.२०१० च्या वीज खरेदी करारातील अटींनुसार रकमा अदा करण्यात वितरण परवानाधारकाला आलेले हेतू पुरस्सर आणि बुध्दीपुरस्सर अपयश |
| ३० | २०११ चा १७७ | ०१.१२.२०११ | १८.०२.२०१३ | ०५.०६.२०१३ | आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५.१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरीता बहू-वर्षीय वीज दर आणि आर्थिक वर्ष २०११-१२ साठी एकूण महसूली गरजेस मंजुरी देण्यासाठी टाटा पॉवर कंपनी लि., च्या निर्मिती व्यवसायाची याचिका |
| ३१ | २०१३ चा ४० | १९.०३.२०१३ | १६.०४.२०१३ | १०.०६.२०१३ | विद्युत ग्राहकांसंबधी आयोगाने पारित केलेले वीज दराचे आदेश आणि विनियम यांचे पालन न केल्या प्रकरणी महावितरण कंपनी विरुध्द विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ५५ (३) आणि कलम १४२ अंतर्गत फॅवेक्स एॅरोमॅट्स इंडिया लि., अंबरवेट, ता.मुळशी, यांनी दाखल केलेली तक्रार |
| ३२ | २०१३ चा ४५ | २१.०३.२०१३ | १६.०४.२०१३ | १०.०६.२०१३ | ग्राहक गाऱ्हाणे मंच, कोल्हापूर परिमंडल, यांनी दि. २९ जानेवारी, २०१३ रोजी पारित केलेल्या आदेशाची पूर्तता न केल्याप्रकरणी मे. कॅलस बायोटेक प्रा. लि., खांडगाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर आणि मे. सीमा बायोटेक, तळसंदे, ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर यांची तक्रार |
| ३३ | २०१३ चा ३७ | १४.०३.२०१३ | ०५.०४.२०१३ | १२.०६.२०१३ | कृषी जोडणी न दिल्या प्रकरणी महावितरण कंपनीविरुध्द कारवाई करण्यासाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४३(३), १२८, १२९ आणि १३० अंतर्गत श्रीमती ताराबाई डहाके यांची तक्रार |
| ३४ | २०१२ चा १४१ | २६.१२.२०१२ | ०५.०४.२०१३ | १३.०६.२०१३ | आर-इन्फ्रा पारेषण व्यवसायाची आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरीता बहु-वर्षीय वीज दराच्या तत्त्वानुसार एकूण महसूली गरजेस मंजुरीसाठी, दाखल करण्यात आलेली याचिका |
| ३५ | २०१३ चा ६१ | २९.०४.२०१३ | २२.०५.२०१३<br>२९.०५.२०१३ | १३.०६.२०१३ | इंडियन एनर्जी एक्स्चेंजकडून वीज पुरवठा घेण्यासाठी महावितरण कंपनीने मुक्त प्रवेश घेण्यास परवानगी नाकारल्यामुळे त्यांच्यविरुध्द दिलासा मिळण्यासाठी मे. यु. पी. ट्विगा फायबर ग्लास लि., ने दाखल केलेली याचिका |
| ३६ | २०१३ चा ०१ | ३१.१२.२०१२ | ०५.०४.२०१३ | १३.०६.२०१३ | बहु-वर्षीय वीज दराच्या आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसूली गरज मंजुरीसाठी आणि वीज दर निश्चितीकरणासाठी आणि या आर-इन्फ्रा लि., च्या निर्मिती व्यवसायाने दाखल केलेली याचिका |
| ३७ | २०१३ चा ६६ | ०९.०५.२०१३ | २९.०५.२०१३<br>०५.०६.२०१३<br>१२.०६.२०१३ | २६.०६.२०१३ | इंडियन एनर्जी एक्स्चेंजकडून वीज पुरवठा घेण्यासाठी महावितरण कंपनीने मुक्त प्रवेश घेण्यास परवानगी नाकारल्यामुळे मे. श्री शारदा इस्पात लि., यांनी महावितरण कंपनीविरुध्द दिलासा मिळण्यासाठी दाखल केलेली याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | २०११ चा १७९ | ०१.१२.२०११ | १८.०२.१२ | २८.०६.२०१३ | आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरीता बहु-वर्षीय वीज दरास आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता एकूण महसूली गरजेस मंजूरीसाठी द टाटा पॉवर कंपनी लि., च्या वितरण व्यवसायाची याचिका |
| ३९ | २०१३ चा ५३ | १६.०४.२०१३ | ०९.०५.२०१३<br>२३.०५.२०१३ | ०३.०७.२०१३ | इंडियन एनर्जी एक्स्चेंजकडून वीज पुरवठा घेण्यासाठी महावितरण कंपनीने मुक्त प्रवेश घेण्यास परवानगी नाकारल्यामुळे मे. पीयागिवो व्हेहिकल्स प्रा. लि., यांनी महावितरण कंपनीविरुध्द दिलासा मिळण्यासाठी दाखल केलेली याचिका |
| ४० | २०१३ चा ६३ | ०६.०५.२०१३ | १३.०६.२०१३ | १५.०७.२०१३ | महाराष्ट्र बायोमास एनर्जी डेव्हलपमेंट असोसिएशन यांनी सन २०१३ च्या प्रकरण क्र. ६ मध्ये आयोगाने दि. २२ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी दाखल केलेली याचिका |
| ४१ | २०१३ चा ६० | २९.०४.२०१३ | २८.०५.२०१३ | १५.०७.२०१३ | श्रीमती अरुणाबाई शिवसिंग परदेशी यांनी विद्युत अधिनियम,२००३ च्या तरतूदींची आणि त्याखाली करण्यात आलेल्या विनियमांची कथित पुर्तता न केल्या प्रकरणी आणि आर्थिक वर्ष २०१२ च्या प्रकरण क्र. ११ मध्ये आयोगाने याचिकाकर्त्याला दिलेल्या परवानगीमुळे पारेषण वाहिन्या टाकताना नुकसानभरपाईची रक्कम अदा न केल्यामुळे, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६७ (४) कलम १४२ आणि १४९ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यासाठी केलेली याचिका |
| ४२ | २०१२ चा ८८ | १२४.०८.२०१२ | ११.१०.२०१२<br>१०.१२.२०१२<br>२३.०१.२०१३<br>०८.०२.२०१३<br>२०.०२.२०१३ | १६.०७.२०१३ | देयक चक्रात उच्च-दाब-एक एक्सप्रेस फीडर (अखंडित पुरवठा) या ग्राहक वर्गवारीला अतिरिक्त विद्युत आकार लागू करण्याबद्दल स्पष्टीकरण मागण्यासाठी मे. कालिका स्टील आणि ऍलॉइज प्रा.लि., ची याचिका |
| ४३ | २०१२ चा ११८ | १७.१०.२०१२ | ०९.११.२०१२<br>२२.११.२०१२<br>०४.०४.२०१३<br>२०.०४.२०१३<br>०२.०५.२०१३ | १६.०७.२०१३ | दर महिन्याला ३०० युनिट्सपेक्षा विजेचा कमी वापर असणाऱ्या विद्युत ग्राहकांच्या संबंधात आयोगाने दिलेल्या निर्देशांचे पालन न केल्या प्रकरणी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांविरुध्द विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ आणि १४६ अंतर्गत महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनने दाखल केलेली याचिका |
| ४४ | २०१३ चा ३५ | ०७.०५.२०१३ | १२.०३.२०१३<br>१५.०५.२०१३<br>२८.०५.२०१३ | १९.०७.२०१३ | मविनिआ (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० आणि केंद्रीय विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र) विनियम, २०१० संबंधित स्पष्टीकरण मागण्यासाठी मे. बजाज फिन्सरी लि., यांनी दाखल केलेली याचिका |
| ४५ | २०१३ चा ७६ | ०५.०६.२०१३ | ११.०२.२०१३<br>२६.०६.२०१३ | १९.०७.२०१३ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (बी) आणि मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मधील विनियम २५च्या तरतुदींच्या अंतर्गत एकत्रीकरण करारास मंजुरीसाठी आणि सन २०१३ च्या प्रकरण क्र. २ मधील आयोगाच्या दि. २० फेब्रुवारी, २०१३ च्या आदेशाला अनुसरुन विर्दभ इंडस्ट्रिज पॉवर लि., यांच्या युनिट क्र. १ मधून ३०० मेगावॉटच्या वीज खरेदी करारास मंजूरी मागण्यासाठी विर्दभ इंडस्ट्रिज पॉवर लि., आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी सादर केलेली याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | २०१२ चा १५ | १७.०१.२०१२ | १३.०३.२०१३<br>१५.०५.२०१३ | २२.०७.२०१३ | स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या प्रकरण क्र. १ आधारित वीज दराच्या अंतर्गत बोली प्रक्रियेचा दुसरा टप्पा सुरु करण्यासाठी आणि दीर्घ-कालीन तत्वावर वीज खरेदी करण्यासाठी, बांधा, वापरा आणि हस्तांतरण करण्याच्या तत्वावर आधारित कोडाळी पंप्ड स्टोअरेज योजनेच्या विकासात खाजगी क्षेत्राच्या सहभागासाठी याचिकाकर्त्याने हाती घेतलेल्या बोली प्रक्रियेच्या पूर्ण झालेल्या पहिल्या टप्प्यास मंजूरी देण्यासाठी जलसंपदा विभागाने दाखल केलेली याचिका |
| ४७ | २०१३ चा ४९ | | १३.०३.२०१३<br>१५.०५.२०१३ | २२.०७.२०१३ | मविनिआ (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० मध्ये आर्थिक वर्ष २०१०-११ व आर्थिक वर्ष २०११-१२ करीता नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या ठरवून दिलेल्या लक्षांकांची स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांनी केलेली पूर्तता आणि पडताळणी करण्यासाठी याचिका |
| ४८ | २०१३ चा ८२ | १७.०६.१३ | २२.०७.१३ | ०६.०८.२०१३ | याचिकाकर्त्याला वीज दराची उच्च-दाब-४ वर्गवारी लागू करण्याबाबत आणि यापुढील देयके उच्च-दाब-४ या वीज दराच्या वर्गवारीनुसार वीज वापराची देयके निर्गमित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., ला निर्देश देण्यासाठी आणि स्पष्टीकरण मागण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) विद्युत अधिनियम, २००३च्या कलम ६१, ६२ आणि कलम ८६ अंत्रात दाखल केलेली याचिका |
| ४९ | २०१३ चा ८४ | २७.०६.२०१३ | २७.०७.२०१३ | ०६.०८.२०१३ | मविनिआ (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० मधील नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्षांकासंबंधातील विनियम ७, १८ आणि २० च्या बाबतीत आर-इन्फ्रा लि., ने दाखल केलेली याचिका |
| ५० | २०१३ चा १२ | ३१.०१.२०१३ | २१.०२.२०१३<br>२२.०५.२०१३ | ०७.०८.२०१३ | स्व-वापरासाठीच्या विजेचा वापर बँकींगच्या तरतुदीसह करण्यासाठी काक्रापर अणु विद्यूत केंद्र (केएपीएस) ते जड जल प्रकल्प, थळ येथे १७ मेगावॉट विजेचे वहन करण्यास मान्यता देण्यासाठी आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेशाऐवजी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमार्फत दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाकरीता भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागाच्या जड जल मंडळकडून याचिका |
| ५१ | २०१३ चा ७४ | ३०.०५.२०१४ | ०५.०७.२०१३ | ०७.०८.२०१३ | आयोगाने सन २०१२ च्या प्रकरण क्र. ४० मध्ये १ नोव्हेंबर,२०१२ रोजी दिलेल्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी द टाटा पॉवर लि., च्या निर्मिती व्यवसायाकडून याचिका |
| ५२ | २०१२ चा ७९ | ०८.०८.२०१२ | ०१.१०.२०१२<br>०२.११.२०१२<br>२७.११.२०१२<br>०२.०१.२०१३<br>१२.०२.२०१३<br>२२.०५.२०१३<br>२७.०६.२०१३ | ०७.०८.२०१३ | सन २००५ च्या प्रकरण क्र. ७० मधील आयोगाचा दि.८ सप्टेंबर, २००६ च्या आदेशाचा कथित भंग केल्याप्रकरणी मे. कायेगाव पेपर मिल्स लि., यांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ आणि १४९ अंतर्गत महावितरण कंपनीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे मागणी करण्यासाठी दाखल केलेली तक्रार |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ५३ | २०१३ चा ५७ | २६.०४.२०१३ | १९.०६.२०१३ | ०७.०८.२०१३ | पोल्ट्री/ हॅचरिजच्या संबंधात संशोधन आणि विकासामध्ये गुंतलेल्या विद्युत संच्याकरीता वीज दराचे योग्य वर्गवारीकरण करण्यासाठी आणि लघु-दाब/उच्च-दाब कृषी वर्गवारी लागू करण्यासाठी आणि महावितरण कंपनीने अयोग्य औद्योगिक आणि/किंवा वाणिज्यिक वीज दर लागू करणे थांबविण्यासाठी, व्यंकटेश्वर हॅचरिज प्रा.लि., (पी डी आर सी विभाग) यांनी दाखल केलेली याचिका |
| ५४ | २०१३ चा ३१ | २५.०२.२०१३ | २९.०४.२०१३<br>०३.०७.२०१३<br>१६.०७.२०१३ | ०७.०८.२०१३ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८७, ८८, १३९, १४०, १४२, १४६, १४९, १५० आणि १५१ अंतर्गत आर-इन्फ्रा ने अधिनियम, नियम, विनियम आणि आयोगाचे तसेच अंतर्गत ग्राहक गाऱ्हाणे निवारण कक्षाने दिलेल्या निर्देशांचे पालन न करण्याबाबत श्री. एस कुमार सुंदरम यांनी दाखल केलेली याचिका |
| ५५ | २०१३ चा १६ | ०८.०२.२०१३ | ०६.०३.२०१३<br>२२.०५.२०१३<br>१२.०६.२०१३<br>१५.०६.२०१३ | १३.०८.२०१३ | मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ मधील खंड ३.१ मध्ये सुधारणा / शिथील करुन विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम २(४७), ४२ (३), ८६ (सी) आणि ८६(ई) अंतर्गत मे. कुलकर्णी पॉवर टुल्स लि., यांनी स्व-वापरासाठी मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी दाखल केलेली याचिका |
| ५६ | २०१२ चा ३९ | २३.०४.२०१२ | १६.०५.२०१२<br>०४.०७.२०१३<br>०८.०८.२०१२<br>२५.१०.२०१२<br>१०.१२.२०१२<br>०३.०३.२०१३ | १३.०८.२०१३ | दि.०४.०६.२०१० च्या वीज खरेदी करारातील शर्तीनुसार कायद्यात झालेल्या बदलांमुळे वितरण परवानाधारकाला रकमा अदा करण्यात आलेले हेतू पुरस्सर आणि बुध्दीपुरस्सर अपयशाच्या परिणाम स्वरुप निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यामधील वादासंबंधी वर्धा पॉवर कंपनी लि., यांनी विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम ८६ (१) (बी) आणि ८६ (१) (एफ) अंतर्गत दाखल केलेली याचिका |
| ५७ | २०१२ चा १३६ | आयोग स्वत: | १४.०१.२०१३<br>३०.०१.२०१३<br>०४.०४.२०१३<br>११.०५.२०१३ | १६.०८.२०१३ | आयोगाने सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ मध्ये दिलेल्या दि. १६.०८.२०१२ च्या आदेशाविरुध्द विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे दाखल करण्यात आलेल्या सन २०१२ चे अपील क्र.२२५, सन २०१२ चे अपील क्र. २२६ सन २०१२ चे अपील क्र. २३० आणि सन २०१२ चे अपील क्र. २६४ मध्ये देण्यात आलेल्या दि. १९ डिसेंबर,२०१२ रोजीच्या निकालाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आयोगाने स्वत:हून आयोजित केलेली सुनावणी |
| ५८ | २०११ चा १६१ | २३.११.२०११ | ०९.१२.२०११<br>०६.०१.२०१२<br>२५.०१.२०१२<br>१५.०२.२०१२<br>२४.०२.२०१२<br>१८.०५.२०१२<br>०५.०७.२०१२<br>२१.०३.२०१३<br>२५.०४.२०१३<br>२६.०४.२०१३ | १६.०८.२०१३ | विद्युत अधिनियम, २००३ खालील सर्वोच्च स्थितीचा गैरवापर केल्याविरुध्द आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या तरतूदीसह मविनिआ (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम ३ आणि मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम ३ अंतर्गत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आलेल्या अपयशा विरुध्द मे. वर्धा पॉवर कंपनी लि., यांनी दाखल केलेली याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ५९ | २०१३ चा ६९ | १५.०५.२०१३ | १९.०६.२०१३ | १६.०८.२०१३ | आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ च्या अचूक समायोजन प्रकरणी आयोगाने सन २०१२ च्या प्रकरण क्र. १२४ मध्ये दिलेल्या दि.०४.०४.२०१३ च्या आदेशाच्या पुर्नविलोकनासाठी, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि., च्या वितरण व्यवसायाने दाखल केलेली याचिका |
| ६० | २०१३ चा ७० | १५.०५.२०१३ | ०१.०७.२०१३ | १६.०८.२०१३ | द टाटा पॉवर कंपनी लि., च्या पारेषण व्यवसायाने, आयोगाने सन २०११ च्या प्रकरण क्र. १७८ मध्ये दि. ३० मार्च २०१३ रोजी दिलेल्या आदेशाच्या पुर्नविलोकनासाठी दाखल केलेली याचिका |
| ६१ | २०१३ चा ८३ | १०.०४.२०१३ | २९.०७.२०१३ | १६.०८.२०१३ | श्री.मधुकर शेषराव काळे यांनी विद्युत लोकपाल, नागपूर, यांनी अभिवेदन क्र.७१/२० मध्ये पारित केलेल्या आदेशाविरुध्द दाखल केलेले अपील |
| ६२ | २०१३ चा २७ | १८.०२.२०१३ | ३०.०५.१३ | १६.०८.२०१३ | जयगड पॉवर ट्रान्स्को लि., यांनी आर्थिक वर्ष २०११-१२ च्या एकूण महसूली गरजेच्या अचूक समायोजनासाठी, आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीतील बहु-वर्षीय वीज दराच्या तत्वानुसार एकूण महसूली गरजेस मान्यतेसाठी दाखल केलेली याचिका |
| ६३ | २०१३ चा ६२ | ०३.०५.२०१३ | २८.०५.२०१३<br>२६.०७.२०१३<br>०६.०८.२०१३ | १६.०८.२०१३ | श्री.मुरलीधर तुकाराम दौंडकर आणि अन्य सहा यांनी उप विभागीय दंडाधिकारी यांनी विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम ६८ आणि इंडियन टेलीग्राफ ऍक्ट १८८५ च्या कलम १० आणि कलम १६ आणि परवानाधारकाच्या कामकाजासंबंधीचे नियम २००६ च्या कलम ३ अंतर्गत पारित केलेल्या आक्षेपित आदेशाच्या पुर्नविलोकनासाठी दाखल केलेली याचिका आणि सर्व संबंधित दस्तावेज शोधण्यासाठी आणि त्यांची मागणी करण्यासाठी विद्युत अधिनियम,२००३ कलम ९४ (१) (बी) खाली दाखल केलेला अर्ज |
| ६४ | २०१३ चा २४ | १७.१०.२००८ | ०३.०४.२०१३<br>०९.०५.२०१३<br>२९.०५.२०१३<br>३१.०५.२०१३<br>१०.०६.२०१३ | १९.०८.२०१३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., ने प्रकरण क्र.१, टप्पा क्र.१ च्या बोली प्रक्रियेतर्गत वीज खरेदीकरीता वीज दर स्वीकारण्यासाठी दाखल केलेली याचिका |
| ६५ | २०१३ चा ६७ | १३.१२.२०१२ | ३१.०५.२०१३<br>०२.०७.२०१३<br>१९.०७.२०१३ | २०.०८.२०१३ | मविनिआ (वितरण परवानाधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ मधील आयोगाच्या निर्देशांचे महावितरण कंपनीने पालन न केल्याबाबत |
| ६६ | २०११ चा १५१ | २१.१०.२०११ | ११.०७.२०१३<br>२९.०७.२०१३ | २०.०८.२०१३ | रिलायन्स इन्फ्रा लि. च्या वितरण व्यवसायाने रिलायन्स इन्फ्रा लि. च्या (वितरण) आणि तिच्या आर्थिक वर्धनक्षमतेवर परिणाम करणाऱ्या काही मुद्यांबाबत दिलासा मागण्यासाठी दाखल केलेली याचिका |
| ६७ | २०१२ च्या प्रकरण क्र. ६८मधील सन २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. ४ | १६.०७.२०१२ | २२.०८.२०१२<br>११.१०.२०१२<br>०९.११.२०१२<br>२१.१२.२०१२<br>३१.१२.२०१२<br>१८.०१.२०१३<br>२३.०१.२०१३ | २१.०८.२०१३ | अदानी पॉवर महाराष्ट्र लि., यांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ अंतर्गत वादावर अभिनिर्णय देण्यासाठी आणि १६ फेब्रुवारी, २०११ चा वीज खरेदी करार समाप्त करण्यात आल्यामुळे कृतीची हमी परत करण्याबाबत दाखल केलेली याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ६८ | २०१३ चा ९ | २९.०१.२०१३ | ०६.०४.२०१३ | २२.०८.२०१३ | आर-इन्फ्रा लि., च्या वितरण व्यवसायाने एकूण महसूली गरज मंजूरीसाठी आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या बहु-वर्षीय वीज दराच्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरीता बहु-वर्षीय वीज दर निश्चित करण्यासाठी दाखल केलेली याचिका |
| ६९ | २०१२ चा ८९ | २९.०८.२०१२ | २०.०९.२०१२<br>२२.१०.२०१२<br>२६.११.२०१२<br>०२.०४.२०१३<br>१२.०६.२०१३<br>१५.०७.२०१३<br>२२.०७.२०१३ | २३.०८.२०१३ | मे. ऊर्जांकुर श्री दत्त पॉवर कंपनी लि., यांची, निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वादाच्या प्रकरणी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (एफ) अंतर्गत दाखल दाखल करण्यात आलेली याचिका |
| ७० | २०१२ चा १२० | १९.१०.२०१२ | २३.११.२०१२<br>१५.०१.२०१३<br>२१.०१.२०१३ | २३.०८.२०१३ | द टाटा पॉवर कंपनी लि., च्या वितरण व्यवसायाची, आर-इन्फ्रच्या पारेषण यंत्रणेतील पारेषण आऊटलेट्स पाहिजे असल्यासंबंधी याचिका |
| ७१ | सन २०१० च्या प्रकरण क्र. ८५ मधील सन २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. ३ | २४.०१.२०१३ | ११.०२.२०१३ | २३.०८.२०१३ | विद्युत अपील न्यायाधीकरणाने सन २०११ च्या अपील क्र. ३९ मध्ये दि. १६ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या निकालास अनुसरुन देय असलेल्या भरपाई / आकार निश्चित करण्यासाठी सन २०१२ च्या प्रकरण क्र. २४ मध्ये दि.१५ ऑक्टोबर, २०१२ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशा बाबत |
| ७२ | सन २०१३ च्या प्रकरण क्र. २३ मधील सन २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. १० | ०४.०२.२०१३ | १२.०४.२०१३<br>०९.०५.२०१३<br>१३.०५.२०१३<br>२७.०६.२०१३<br>२३.०७.२०१३ | २३.०८.२०१३ | एएमएनइपीएलच्या ६१.५ मेगावॉट विद्युत प्रकल्पाच्या एका संचामधून निर्माण झालेल्या निश्चित विजेच्या विक्रीसाठी वीज दर निश्चित करण्यासाठी आणि भांडवली खर्चास मंजूरी देण्यासाठी अभिजीत एमएडीसी प्रा लि., (एएमएनइपीएल), नागपूर आणि सन २०१३ च्या प्रकरण क्र. २३ मधील सन २०१३ चा संकीर्ण अर्ज क्र. १०: एएमएनइपीएलच्या ६१.५ मेगावॉट विद्युत प्रकल्पाच्या एक संचामधून निर्माण झालेल्या निश्चित विजेच्या विक्रीसाठी अंतरिम वीज दर निश्चित करण्यासाठी एएमएनइपीएल चा अर्ज आणि महाराष्ट्र एअर पोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि., (एमएडीसी) मध्यस्थीसाठी अर्ज |
| ७३ | २०१२ चा ७ | १२.०१.२०१२ | ३०.०७.२०१३ | २३.०८.२०१३ | औरंगाबाद येथे उभारण्यात येणाऱ्या ४.८७ मेगावॉट क्षमतेच्या नगरपालिका घन कचऱ्यातून वीज निर्मिती प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महाराष्ट्रातील वितरण परवानाधारकांना पुरविण्यासाठी वीज दर निश्चित करण्याकरीता मे. रोकेम ग्रीन एनर्जी प्रा.लि.,यांनी दाखल केलेली याचिका |
| ७४ | २०१२ चा १३४ | ३०.११.२०१२ | १०.०५.२०१३ | २६.०८.२०१३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., यांनी बहु-वर्षीय वीज दराच्या आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीच्या व्यवसाय आराखड्यास मंजूरीसाठी दाखल केलेली याचिका |
| ७५ | २०१३ चा ५५ | १२.०२.२०१३ | १९.०६.२०१३ | २६.०८.२०१३ | सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ मधील आयोगाच्या दि. १६ ऑगस्ट, २०१२ च्या आदेशात दुरुस्ती करण्यासाठी डॉ. एन.डी.पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशन यांनी दाखल केलेली याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ७६ | २०१२ चा ११७ | १७.१०.२०१२ | १४.१२.२०१२<br>१३.०२.२०१३<br>२५.०४.२०१३<br>२६.०४.२०१३<br>२४.०५.२०१३<br>२९.०५.२०१३<br>०३.०७.२०१३ | २८.०८.२०१३ | वर्धा पॉवर कंपनी लि. च्या मुक्त प्रवेश घेणाऱ्या स्व-वापरासाठीची वीज वापरणाऱ्या ग्राहकांवर महावितरण कंपनीने लादलेल्या क्रॉस सबसिडी अधिभारा विरुध्द वर्धा पॉवर कंपनी लि.ची याचिका |
| ७७ | २०१३ चा २६ | १४.०२.२०१३ | १४.०६.२०१३ | २८.०८.२०१३ | बृन्हमुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) यांची आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ करीता एकूण महसूली गरजेच्या समायोजनास आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीकरीता बहु-वर्षीय वीज दरास मंजुरीसाठी याचिका |
| ७८ | २०१३ चा ८८ | १७.०६.२०१३ | ०६.०८.२०१३ | २८.०८.२०१३ | गोंदिया जिल्ह्यातील राईस मिल्स औद्योगिक जोडणीची सध्याची १०७ एचपी कमी दाब ३ फेज ४ वायर यंत्रणेच्या संलग्न भाराची मर्यादा २०१ एचपी (१८७ केव्हीए) पर्यंत वाढविण्यासाठी राईस मिलर्स असोसिएशन आणि हरी शेलॅक इंडस्ट्रिज यांची याचिका |
| ७९ | २०१३ चा ३४ | ०७.०३.२०१३ | १२.०४.२०१३<br>१२.०६.१३<br>२२.०७.१३ | २८.०८.२०१३ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि., (राज्य पारेषण कंपनी) ने इ एम सी ओ एनर्जी लि., च्या वरोरा प्रकल्पापासून २०० मेगावॅट विजेच्या वहनाला ग्रीड जोडणी थेट फक्त राज्य पारेषण कंपनी मार्फतच मंजूर करण्यासाठी त्यांना निर्देश देण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची दाखल केलेली याचिका |
| ८० | २०१२ चा १२६ | २०.११.२०१२ | २४.१२.२०१२<br>३१.०१.२०१३<br>१५.०४.२०१३<br>०५.०६.२०१३<br>२२.०७.२०१३ | ३०.०८.२०१३ | लोधीवली विद्युत प्रकल्पातून ४० मेगावॅट राखीव वीज पुरवठयास परवानगी देण्यास द टाटा पॉवर कंपनी लि., च्या वितरण व्यवसायाने दाखल केलेली याचिका |
| ८१ | २०१३ चा २८ | २२.०५.१३ | २४.०६.२०१३<br>१६.०७.२०१३ | ०३.०९.२०१३ | महानिर्मिती कंपनीच्या पारस संच क्र.४ आणि परळी संच क्र.७च्या आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ साठीच्या एकूण महसूली गरजेस मान्यता देण्यासाठी आणि वीज दर निश्चित करण्यासाठी सन २०११ च्या प्रकरण क्र. ६९ मधील दि.२२.१२.२०११ च्या आयोगाच्या आदेशाच्या विरुध्द विद्युत अपील न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या सन २०१२ अपील क्र. ३४ मध्ये विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि महानिर्मिती कंपनीच्या आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २००९-१० च्या समायोजनेच्या सन २०११ च्या प्रकरण क्र. १०७ मधील आयोगाच्या दि. ३०.१२.२०११ च्या आदेशाविरुध्द विद्युत अपील न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या सन २०१२ अपील क्र. ४७ मध्ये विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने दाखल केलेली याचिका |

| अ. क्र. | प्रकरण क्र. | याचिकेचा दिनांक | सुनावनीचा दिनांक | आदेशाचा दिनांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ८२ | सन २०१२ च्या प्रकरण क्र. १२१ मधील सन २०१२ चा संकीर्ण अर्ज क्र. ६ | ०१.११.२०१२ | ०५.१२.२०१२<br>११.०२.२०१३<br>१६.०५.२०१३<br>२४.०५.२०१३ | ०३.०९.२०१३ | महावितरण कंपनीने वापरलेल्या मत्तासाठी भरपाई / आकारांची मागणी करण्यासाठी मुळा प्रवरा को.ऑप सोसायटी लि., यांनी दाखल केलेल्या सन २०१२ च्या प्रकरण क्र. २४ मधील दि.१५.१०.२०१२ च्या आयोगाच्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी दाखल केलेली याचिका |
| ८३ | २०१३ चा ४४ | २५.०३.२०१३ | १६.०७.२०१३ | ०४.०९.२०१३ | आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता खापरखेडा केंद्र. ५ चा भांडवली खर्च आणि वीज दर निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि., ने दाखल केलेली याचिका |
| ८४ | २०१३ चा ९५ | आयोग स्वत: | आयोग स्वत: | ०५.०९.२०१३ | अन्य आदेश अंमलात आणण्यासाठी महावितरण कंपनीचे पुरवणी आकार निश्चित करण्याकरीता आयोगाने स्वत:हून सुरु केलेली कार्यवाही |
| ८५ | २०१३ चा १०६ | १६.०९.२०१३ | २७.०९.२०१३ | ०७.१०.२०१३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., ने दि. ३०.०९.२०१३ नंतर देखील टी ओ डी रिबेट लागू करण्यासाठी दाखल केलेली याचिका |
| ८६ | २०१३ चा ९० | १९.०७.२०१३ | २६.०९.२०१३ | ०९.१०.२०१३ | आर्थिक वर्ष २०११-१२ च्या अचूक समायोजनासाठी आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरीता बहु-वर्षीय वीज दर निश्चित करण्यासाठी दाखल केलेल्या सन २०११ च्या प्रकरण क्र.१७७ मधील आयोगाच्या दि.०५.०६.२०१३ च्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी दि टाटा पॉवर कंपनी लि., च्या निर्मिती व्यवसायाने दाखल केलेली याचिका |
| ८७ | २०१३ चा ८९ | ०९.०७.२०१३ | ०६.०८.२०१३ | ०९.१०.२०१३ | इंडियन एनर्जी एक्स्चेंज मार्फत मुक्त प्रवेश घेण्यासाठी महावितरणविरुध्द दिलासा मिळण्यासाठी श्रीनिवास इंजिनिअरिंग ऑटो कंपनी प्रा .लि., यांनी दाखल केलेली याचिका |
| ८८ | २०१३ चा ९४ | ०९.०७.२०१३ | २५.०९.२०१३ | १५.१०.२०१३ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण परिमंडल, यांनी दि. ०६ मे २०१३ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याबद्दल महावितरण कंपनी विरुध्द मे. बलबीर ॲलॉयिझ प्रा.लि., मुरबाड, यांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ आणि १४६ अंतर्गत दाखल केलेली याचिका |
| ८९ | २०१३ चा ११६ | ११.०९.२०१३ | २७.०९.२०१३ | १७.१०.२०१३ | राज्यातील सर्व कमी दाब आणि उच्च-दाब औद्योगिक ग्राहकांना रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत २५० पैसे प्रति युनिट या दराने टी ओ डी रिबेट कायमस्वरुपी राहू देण्याबाबत आणि विद्यमान दि.०२.०४.२०१३ च्या आदेशाला, पुढील आदेश पारित होईपर्यंत, मुदतवाढ देण्यासाठी श्री. बुलंद इक्बाल निहाल अहमद, मालेगाव, यांनी दाखल केलेली याचिका |
| ९० | २०१३ चा ७३ | १७.०५.२०१३ | २४.०६.२०१३ | २९.१०.२०१३ | महानिर्मिती कंपनीकडून आलेली देयके महानिर्मिती कंपनीने प्रदान करण्यासाठी महावितरण कंपनीला उचित निर्देश देण्याबाबत विद्युत अधिनियम, २००३ कलम ६२, कलम ८६ च्या खंड १ (एफ) आणि कलम १८१ अंतर्गत दाखल करण्यात आलेली याचिका |
| ९१ | २०१३ चा ७५ | ३१.०५.२०१३ | ०५.०७.२०१३<br>०५.०८.२०१३<br>०३.१०.२०१३ | २९.१०.२०१३ | मे.टाटा पॉवर कंपनी लि., ने त्यांच्या पवन ऊर्जा प्रकल्पांनी वापरलेल्या सहाय्यकारी विजेसाठी वेगळी वीज दराची वर्गवारी देण्याकरीता दाखल केलेली याचिका |
